



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, मंगळवार ३१ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





## अमेरिकेच्या हल्ल्यात दिल्लीला येणारे विमान उध्दवस्त

**तेल अवीव/तेहरान/वॉशिंग्टन/ वृत्तसंस्था :** आज अमेरिका-इस्त्रायल-इराण युद्धाचा ३१ वा दिवस आहे. सोमवारी, इराणमध्ये अमेरिकेने केलेल्या हल्ल्यात महान एअरलाइन्सच्या विमानाचे नुकसान झाले. हे विमान मशहद विमानतळावर उभे होते आणि नवी दिल्लीत येणार होते. त्याचा उद्देश भारतातून औषधे आणि इतर अत्यावश्यक मदत साहित्य वाहून नेण्याचा होता.दुसरीकडे, युरोपियन युनियनने (EU) इराणवरील मानवाधिकार-संबंधित निर्बंध आणखी एका वर्षासाठी वाढवले आहेत. हे निर्बंध आता १३ एप्रिल २०२७ पर्यंत लागू राहतील. युरोपियन युनियनने म्हटले आहे की, या निर्बंधांच्या अधीन असलेल्या व्यक्ती आणि संस्थांना युरोपीय देशांमध्ये प्रवास करण्यास बंदी घालण्यात येईल आणि त्यांची मालमत्ता जप्त किंवा गोठवली जाईल. याव्यतिरिक्त, इराणला अशी उपकरणे पाठवण्यास मनाई केली जाईल, ज्यांचा वापर लोकांवर पाळत ठेवण्यासाठी किंवा त्यांना दडपण्यासाठी केला जाउ शकतो. कुवैतमध्ये वीज आणि पाण्याच्या प्लांटवर झालेल्या (पान २ वर)



# ट्रम्प यांची विध्वंसाची भाषा

**माघार घेउ, पण इराणच्या तेल विहिरी, जल शुद्धिकरण प्रकल्प, खार्ग बेटही नष्ट करणार**



**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था** 'इराणमधील नव्या राजवटीसोबत चर्चा सुरू आहे. लवकरच करार होईल आणि होर्मुझ सामुद्रधुनी खुली केली जाईल. पण, असे झाले नाहीतर अमेरिकाइराणमधील मुक्काम संपवण्यापूर्वी इराणला उद्धवस्त करेल. त्यांच्या तेल विहिरी, खार्ग बेट आणि इतकंच नाही, त्यांचे जलशुद्धिकरण प्रकल्पही उडवू', अशी थेट धमकी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला दिली आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रूथ सोशल या सोशल मीडिया साईटवर एक पोस्ट करत इराणसोबत सुरू असलेल्या चर्चेबद्दल माहिती दिली आहे. ट्रम्प यांनी लवकरच करार होईल, असा दावा केला आहे. (पान २ वर)

## नितीश कुमारांचा राजीनामा

**पाटना/वृत्तसंस्था :** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी आज अखेर विधान परिषद सदस्य (एमएलसी) पदाचा राजीनामा दिला आहे. नुकतेच ते राज्यसभेवर निवडून गेले, ज्यामुळे नियमानुसार त्यांना आमदारकी सोडणे आवश्यक होते. विशेष म्हणजे, राजीनामा देउनही ते पुढील काही दिवस मुख्यमंत्री पदावर कायम राहणार आहेत. अशा परिस्थितीत, बिहारचा पुढील मुख्यमंत्री कोण होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नितीश कुमार पुढील काही दिवसांत मुख्यमंत्री पदाचाही राजीनामा देउ शकतात, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. मात्र नियमांनुसार ते अजून सहा महिने मुख्यमंत्री पदावर राहू शकतात. राज्यसभेवर निवडून आल्यानंतर त्यांना विधान परिषद सदस्यत्वाचा राजीनामा देणे बंधनकारक होते.




त्यामुळे त्यांनी आमदारकी सोडली असले तरी मुख्यमंत्रिपद कधी सोडणार याबाबत अजूनही सस्पेन्स कायम आहे. रविवार संध्याकाळपासूनच नितीश कुमार राजीनामा देणार असल्याच्या चर्चांना सुरु वात झाली होती. त्यानंतर जेडीयूचे अनेक वरिष्ठ नेते मुख्यमंत्री निवासस्थानी भेटीसाठी पोहोचले. त्यामध्ये जेडीयूचे राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष संजय कुमार झा, मंत्री विजय कुमार चौधरी, विजेंद्र यादव आणि अशोक चौधरी यांचा समावेश होता. नितीश कुमारांनी एमएलसी पदाचा राजीनामा दिल्यानंतर आता बिहारच्या राजकारणात मुख्यमंत्री पदाबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. ते मुख्यमंत्री पद कधी सोडणार किंवा पुढील राजकीय निर्णय काय असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**महाराष्ट्रात खरात प्रकरणाची पुनरावृत्ती**

# 40 महिलांचे लैंगिक शोषण

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात पुन्हा एकदा हादरवणारे प्रकरण समोर आले असून नवी मुंबईत एका भामट्याने तब्बल ४० महिलांची फसवणूक आणि लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. नाशिकमधील अशोक खरात प्रकरणानंतर हे दुसरे मोठे प्रकरण असल्याने राज्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आदर्श म्हात्रे (वय ३५) असे या आरोपीचे नाव असून तो स्वत:ला कधी इस्त्रोचा शास्त्रज्ञ तर कधी आयपीएस-आयएएस अधिकारी असल्याचे भासवून महिलांना जाळ्यात ओढत होता.

आदर्शची काम करण्याची पद्धत अत्यंत नियोजनबद्ध होती. तो मॅट्रिमोनी संकेतस्थळांवरून अशा महिलांचा शोध घ्यायचा ज्या अविवाहित, घटस्फोटीत किंवा विधवा आहेत. विशेषत: आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि वर्षाला २५ ते ३५ लाख रुपये कमावणा-या महिलांवर तो लक्ष (पान २ वर)



## खरातच्या विळख्यात बडे अधिकारी; मंत्रालयातील ब्लॅक मनी पांढरा करण्याचा अड्डा? विजय वडेट्टीवारांचा आरोप

**गडचिरोली /प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकीय आणि प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडवून देणा-या खरात प्रकरणावरून काँग्रेसचे विधिमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. या प्रकरणात केवळ भोंदूगिरीच नाही, तर मंत्रालयातील बड्या अधिका-यांचे काळे पैसे पांढरे करण्याचे मोठे रॅकेट कार्यरत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. गडचिरोली येथे माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी या प्रकरणाची व्याप्ती केवळ अंधश्रद्धेपुरती मर्यादित नसून ती लैंगिक शोषण आणि भ्रष्टाचाराच्या मुळापर्यंत गेलेली असल्याचे आरोप केले.

**प्रशासकीय अधिका-यांचे कनेक्शन आणि भोंदूगिरी-** वडेट्टीवार म्हणाले की, समोर आलेल्या शेकडो व्हिडिओंमध्ये अनेक सुशिक्षित महिला आणि प्रशासकीय अधिका-यांच्या पत्नी आहेत. कायद्याच्या चौकटीमुळे नावे उघड करता येत नसली, तरी या भोंदूगिरीला खतपाणी घालण्याचे काम खुद्द जबाबदार अधिका-यांनीच केले आहे. अंधश्रद्धा निर्मूलन कायद्याचे रक्षकच जेव्हा अशा भोंदूबाबांच्या आश्रयाला जातात, तेव्हा कायद्याचे धिंडवडे निघतात. खुर्चीवर बसून कायद्याचे उल्लंघन करणा-या अशा अधिका-यांवर तात्काळ गुन्हे दाखल व्हायला हवेत, अशी मागणी त्यांनी केली.



**लैंगिक शोषण आणि हनीट्रॅपची भीती ?-** या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे महिलांच्या शोषणाबाबतचा वडेट्टीवारांचा दावा. खरात हा केवळ स्वतापुरता मर्यादित नव्हता, तर तिथे मुली पुरवल्या जात होत्या आणि अनेकांचा यामध्ये वापर केला जात होता, असे त्यांनी सांगितले. मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी, आयएएस आणि आयपीएस दर्जाचे अधिकारी त्याचे भक्त होते. खरातवर गुन्हा दाखल होण्याच्या अवघ्या दोन दिवस आधी काही बडे अधिकारी त्याच्यासोबत हाटेलमध्ये काय करत होते, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

**नार्को टेस्टची मागणी-** प्रशासकीय यंत्रणेच्या अपयशावर बोट ठेवताना ते म्हणाले की, राज्याचे इंटेलिजन्स विभाग झोपले होते का, इतक्या मोठ्या प्रमाणावर भोंदूगिरी आणि गैरप्रकार सुरू असताना प्रशासनाला याची पुसटशी कल्पना कशी लागली नाही, हा मोठा प्रश्न आहे. या प्रकरणात ब्लॅक मनी व्हाईट करण्याचे मोठे व्यवहार झाल्याचा संशय व्यक्तकरत, वडेट्टीवार (पान २ वर)

**15 वर्षीय वैभव सूर्यवंशीचा धमाका!**

## पहिल्या चेंडूपासून तुटून पडला; फक्त 15 चेंडूत ठोकली फिफ्टी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** राजस्थान रायल्सचा युवा सलामीवीर वैभव सूर्यवंशी याने नव्या हंगामाची सुरु वातही एकदम धमाकेदार अंदाजात केली आहे. चेन्नई सुपर किंग्सच्या ताफ्यातील मॅट हेन्रीच्या पहिल्याच चेंडूवर त्याने मोठा फटका खेळला. या चेंडूवर झेलची एक संधी निर्माण झाली होती, पण क्वचच्या क्षेत्ररक्षकांना त्याचा फायदा घेता आला नाही. परिणामी वैभव सूर्यवंशीच्या नावे चौकाराची नोंद झाली. हाच आक्रमक अंदाज कायम ठेवत १५ वर्षीय वैभव सूर्यवंशी याने बॅक टू बॅक षटकार मारत १५ चेंडूत अर्धशतक साजरे केले. राजस्थान रायल्सच्या संघाकडून हे दुसरे सर्वात जलद अर्धशतक ठरले. वैभव सूर्यवंशी ही खेळी आणखी मोठी करेल, असे वाटत असताना अंशुल कंबोज याने त्याच्या वादळी खेळीला ब्रेक लावला. सरफराज खान याने उत्तम झेल घेत युवा बॅटरला तंबूचा (पान २ वर)



## येत्या तीन महिन्यांत 'पीएनजी' साठी अर्ज न केल्यास 'एलपीजी' सिलिंडर बंद

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील ज्या शहरी भागांमध्ये पाइपद्वारे गॅस (पीएनजी) जोडणीची सुविधा उपलब्ध आहे, तिथे नागरिकांनी येत्या तीन महिन्यांत अर्ज करणे बंधनकारक आहे. पीएनजी वाहिनी कार्यान्वित असूनही नागरिक अर्ज करत नसल्यास, त्या भागातील घरगुती गॅस (एलपीजी) सिलिंडरचा पुरवठा बंद केला जाउ शकतो, असा इशारा अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी सोमवारी दिला. मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील इंधन पुरावठ्याबाबत सरकारची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. भुजबळ म्हणाले, जागतिक स्तरावर युद्धजन्य परिस्थिती असली, तरी भारतात इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता अफवांवर विश्वास ठेवू नये. रशिया आणि व्हेनेझुएला यांसारख्या देशांकडून नियमितपणे इंधन पुरवठा होत असून, भारतीय जहाजांची ये-जा सुरू असल्याने तुटवड्याची कोणतीही शक्यता नसल्याचे भुजबळ यांनी नमूद केले. बाजारातील मागणी लक्षात घेता सरकारने व्यावसायिक वापरासाठीच्या गॅस पुरवठ्यात ५० टक्क्यांपर्यंत वाढ केली आहे. एलपीजीचा साठाही मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आला असून, पुरवठा साखळी सुरळीत ठेवण्यासाठी युद्धपातळीवर उपाययोजना केल्या जात आहेत. ज्या नागरिकांनी पीएनजीसाठी अर्ज केला आहे, मात्र अद्याप त्यांच्यापर्यंत वाहिनी पोहोचलेली नाही, अशा ग्राहकांचा एलपीजी पुरवठा कोणत्याही परिस्थितीत खंडित केला जाणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.



रेशनवर तीन महिन्यांचे धान्य मिळणार इंधन पुरवठ्यासोबतच रेशन धान्याबाबतही सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. राज्यात धान्याचा पुरेसा साठा असून, नागरिकांना आता तीन महिन्यांचे धान्य एकाच वेळी घेण्याची मुभा देण्यात आली आहे. याशिवाय, जिथे गॅसची सुविधा कमी आहे, तिथे केरोसीन उपलब्ध करून दिले जाणार आहे. पीएनजी वाहिनी टाकण्यासाठी आता स्वतंत्र परवानग्यांची गरज भासणार नाही, सरकारच ही प्रक्रिया सुलभ करणार आहे. पीएनजी हा सुरक्षित आणि स्वस्त पर्याय असून त्याचा विस्तार करणे काळाची गरज आहे. (पान २ वर)

## 1 एप्रिलपासून फास्टॅग वार्षिक पास महागणार!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने १ एप्रिल २०२६ पासून फास्टॅग चा वार्षिक दर वाढवण्याची घोषणा केली आहे. गेल्या वर्षी ३ हजार रुपयांना लाँच करण्यात आलेला वार्षिक पास एक प्रीपेड टोल प्लॅन आहे, ज्यामध्ये २०० टोल क्रासिंग किंवा एक वर्षाचा प्रवास (जे आधी होईल ते) करण्याची सुविधा दिली जाते.पुढच्या महिन्यामासून फास्टॅगचा वार्षिक पासच्या दरात ७५ रुपयांची वाढ होईल, म्हणजेच या पाससाठी आता ३०७५ रुपये मोजावे लागतील. या दरवाढीची घोषणा करताना रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने ही दरवाढ राष्ट्रीय महामार्ग शुल्क (दर निश्चिती आणि संकलन) नियम, २००८ च्या तरतुदींनुसार करण्यात आली असल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच, या वार्षिक पासचे ५६ लाखांहून अधिक वापरकर्ते असून, खासगी वाहन मालकांकडून या पासचा वापर मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचेही सांगण्यात आले आहे.राष्ट्रीय महामार्ग आणि राष्ट्रीय द्रुतगती मार्गावरील सुमारे ११५० टोल नाक्यांवर या वार्षिक पास सुविधेचा लाभ घेउ इच्छिणा-या आणि वैध फास्टॅग असलेल्या पात्र नान कमर्शियल वाहनांसाठी हे सुधारित दर लागू होतील, अशी माहिती NHAI कडून देण्यात आली आहे.




## न्या. गवई यांच्या अखेरच्या निर्देशाला हरताळ, महाराष्ट्र, मध्य प्रदेशातच 'शांतता क्षेत्र'

**नागपूर/प्रतिनिधी :** माजी सरन्यायाधीश न्या. भूषण रामकृष्ण गवई यांनी त्यांच्या कार्यकाळाच्या शेवटच्या टप्प्यात देशातील सर्व व्याघ्र अभयारण्यात संरक्षित क्षेत्राच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रासह व्याघ्र अभयारण्याचे संपूर्ण क्षेत्र 'शांतता क्षेत्र' म्हणून अधिसूचित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. मात्र, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेश वगळता इतर राज्यांनी हे निर्देश गांभीर्याने घेतले नाही. त्यामुळे इतर राज्ये वन्यप्राण्यांच्या बाबतीत गंभीर नाहीत का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.अलीकडच्या काही वर्षात देशातील सर्वच व्याघ्र अभयारण्यात वन्यजीवांच्या संरक्षण आणि संवर्धनापेक्षा पर्यटनावर अधिक भर देण्यात येत आहे. मध्य प्रदेश, महाराष्ट्रातील व्याघ्र अभयारण्यदेखील त्यात आहेत. ज्या ठिकाणी वाघ दिसेल, त्याठिकाणी पर्यटनाचे प्रवेशद्वार उभारले जात आहेत. त्यामुळे वाघांच्या व इतरही वन्यप्राण्यांच्या अधिवासात सातत्याने वाहनांचे आवाज, पर्यटकांची वर्दळ आहे. त्याचा परिणाम वन्यप्राण्यांच्या मानसिकेतवर होत असून ते प्राणी बाहेर पडत आहेत. परिणामी मानव-वन्यजीव संघर्ष वाढत चालला आहे.



तत्कालीन सरन्यायाधीश न्या. गवई यांनी वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनापेक्षा पर्यटनावर अधिक लक्ष केंद्रित करणा-या व्याघ्र अभयारण्याबाबत अनेकदा नाराजी व्यक्तकेली होती. नोव्हेंबर २०२५ मध्ये त्यांच्या सेवानिवृत्तीला काही दिवस बाकी असताना त्यांनी एका प्रकरणात संपूर्ण राखीव क्षेत्र (पर्यावरण संवेदनशील क्षेत्रासह) ध्वनी प्रदूषण (नियमन आणि नियंत्रण) नियम, २००० अंतर्गत तीन महिन्यांच्या आत शांतता क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, एकाही राज्याने त्यांचे हे निर्देश गांभीर्याने घेतले नाही. तीन महिने उलटून देखील मध्य प्रदेश व महाराष्ट्र वगळता इतर राज्यांमध्ये त्यादृष्टीने कोणत्याच हालचाली नाही.

**न्यायालयाच्या निकालाकडे दुर्लक्ष-** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे पालन करण्याच्या सूचना राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने देशातील सर्व व्याघ्र प्रकल्पांना दिल्या. व्याघ्र अभयारण्याच्या अधिका-यांना शांतता क्षेत्र राखण्याचे आणि संबंधित कायद्यानुसार कार्य करण्याचे नियमन लागू करण्याचे अधिकार असतील अशा सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, या निर्देशाला हरताळ फासण्याचे काम पेंच व्याघ्रप्रकल्पात काही महिन्यांपूर्वी उघडकीस आले. त्याचीही दखल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने घेतली आणि स्वत:हून जनहित याचिका दाखल केली.

**प्रस्ताव केंद्राकडे-** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाचे अनेक राज्यांमध्ये पालन करण्यात आलेले नाही. तर महाराष्ट्रातील सर्व व्याघ्र अभयारण्यांमध्ये शांतता क्षेत्र निश्चित करण्याचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवण्यात आल्याचे राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एम.एस. रेड्डी यांनी सांगितले. मध्य प्रदेशात देखील व्याघ्र अभयारण्यात शांतता क्षेत्र निश्चित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही सुरू आहे.

## भोंदू ऋषीकेश वैद्यची पूजा साहित्याची मागणी; न्यायालयाने अर्ज फेटाळला

**पुणे :** दैवी शक्तीचा संचार असल्याची बतावणी करून पुण्यातील एका महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी पोलीस कोठडीत असलेला भोंदू ऋषीकेश वैद्य याने कोठडीत पूजा साहित्य देण्याची विनंती वकिलांमार्फत न्यायालयाकडे केली. पूजा साहित्य मिळवण्यासाठी सादर करण्यात आलेला अर्ज न्यायालयाने फेटाळून लावला. भोंदू ऋषीकेश श्रीकांत वैद्य (वय ३९, रा. वसई, जि. पालघर) याला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने पिंपरीतून अटक केली. पीडित महिला मूळची (पान २ वर)



## चांदीच्या दरात मोठी घसरण; सोन्याचा दर 1.46 लाखांवर

**जळगाव/प्रतिनिधी-** शहरातील सुवर्ण बाजारपेठेत अनेक दिवसांपासून सोनं, चांदीच्या दरात मोठी चढ-उतार होत असून, लग्नसराई तसेच सणासुदीसाठी दागिने खरेदीच्या विचारात असलेले ग्राहक संभ्रमात पडले आहेत. सोनं आणि चांदीचे दर जोपर्यंत स्थिर होत नाही, तोपर्यंत बाजारपेठेतील उलाढाल सुरळीत होण्याची चिन्हे नसल्याने सुवर्ण व्यावसायिकांच्या चिंतेत वाढ झाली आहे. आज जळगावच्या बाजारात सोन्याचे दर १,४६,५०० रुपयांवर जाउन पोहोचले आहे. तर चांदीचे दर हे २, ३१,००० रुपयांवर जाउन पोचले आहेत. आखाती देशांमध्ये सुरु असलेल्या युद्धाचा परिणाम सोन चांदीवर झालेला पाहायला मिळतो आहे. शनिवारच्या तुलनेत जळगावमधील सुवर्ण बाजारपेठेत सोमवारी सोने आणि चांदीच्या किमती किंचित बदल झाला असून ब-यापैकी स्थिर राहिलं आहे. सलग वाढीनंतर आलेली ही स्थिरता बाजारासाठी दिलासादायक ठरली जात असून, ग्राहक आणि व्यापा-यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. काल म्हणजेच रविवारी २९ मार्च रोजी सोन्याचे दर १,४६,००० होते, आणि चांदीचे दर २,३३,००० इतके होते. तर आज म्हणजेच सोमवारी ३० मार्च रोजी सोन्याचे दर १,४६,५०० इतके आहे, तर चांदीचे दर २,३३,००० इतके आहे. म्हणजेच रविवारच्या (पान २ वर)



## महाराष्ट्रात अवकाळी पाउस आणि गारपिटीचा कहर

**मुंबई/प्रतिनिधी :** अवकाळी पावसाबाबतचा हवामान विभागाचा अंदाज ब-याच दिवसांनी खरा ठरला असून सोमवारी दुपारनंतर महाराष्ट्रामध्ये अनेक भागांमध्ये अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. गारपिटीचा मारा व पडणारा पाउस यामुळे शहरी व ग्रामीण भागातील प्रत्येक जण सुरुवातीची काही मिनिटे सुखावला असला तरी अवकाळी पाउस सतत पडू लागल्याने ठिकठिकाणी पाणी साचण्याच्या घटनांनी व शेतातील पिकांच्या नुकसानीने राज्यातील शेतकरी चिंतातूर झाला आहे.

राज्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असतानाच अचानक अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. दुपारच्या वेळेतच मुसळधार पाउस, गारपिट आणि वादळी वा-यांनी अनेक जिल्ह्यांना तडाखा दिला असून शेतक-यांचे मोठे नुकसान झाले आहे. पुढील ४८ तास राज्यासाठी धोक्याचे असल्याचा इशारा देण्यात आला आहे. पुणे शहरासह भोर तालुक्यात जोरदार पाउस आणि गारपिट झाली. उत्रौली परिसरात वादळी वा-यासह गारांचा अक्षरशः सडा पडला. अचानक आलेल्या या पावसामुळे उष्णतेपासून काहीसा दिलासा मिळाला असला, तरी काढणीला आलेल्या ज्वारी, गहू आणि हरभरा पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.



हडपसर शहराच्या पूर्व भागातील हडपसर, मांजरी आणि महंमदवाडी परिसरात दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अवकाळी पावसाने हजेरी लावली. सुरुवातीला आकाशात दाट ढग जमा होउन विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. काही ठिकाणी जोरदार वा-यासह सरी कोसळल्याने कामावरून घरी परतणा-या चाकरमान्यांची तारांबळ उडाली. औद्योगिक वसाहत, पुणे सोलापूर महामार्ग, मांजरी, शेवाळेवाडी, साडेसतरानळी, ससाणेनगर, रामटेकडी, शंकरमठ, वैदुवाडी, महंमदवाडी परिसरातील मुख्य व अंतर्गत रस्त्यांवर सखल भागात पाणी साचले होते. खोदलेल्या रस्त्यांच्या परिसरात चिखल व पाण्याची डबकी तयार झाली. त्यातून प्रवास करताना प्रवाशांना कसरत करावी लागली.वादळी वारा व पावसामुळे मगरपट्टा रस्त्याजवळील विशाल पार्क जवळ झाड कोसळल्याची घटना घडली.

जुन्नर तालुक्यात आंबा, गहू, कांदा पिकांचे मोठे नुकसान (पान २ वर)



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# आयडिएशन कॉम्पिटिशन ३.० विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना चालना देणारी ठरेल -मंत्री लोढा








**मुंबई/प्रतिनिधी :** कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून नवकल्पनांना प्रोत्साहन देणारी आयडिएशन काम्पिटिशन ३.० ही उद्योजकतेकडे वाटचाल करण्याची व नवकल्पनांना चालना देणारा उपक्रम ठरेल असे कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. वर्ल्ड ट्रेड सेंटर येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण सोसायटी आणि आयस्पार्क फांउडेशन यांच्या पुढाकाराने आयडिएशन काम्पीटीशन ३.० ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या कार्यक्रमात मंत्री लोढा बोलत होते.

अपर मुख्य सचिव मनिषा वर्मा यांनी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत नवकल्पनांना चालना देणा-या विविध उपक्रमांची माहिती यावेळी दिली. राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत पाटील यांनी राज्य नाविन्यता सोसायटी मार्फत राबविण्यात येणा-या योजनांची माहिती दिली.रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डा. अपूर्वा पालकर यांनी इनक्युबिशेनसाठी आवश्यक असलेली सर्व मदत विद्यापीठाच्या वतीने दिली जाईल. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि वाढता सहभाग पाहून स्टार्टअप इकोसिस्टमला मिळणारे बळ स्पष्ट होत आहे असेही त्या म्हणाल्या.रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या सहकार्याने, आयडिएशन काम्पिटिशन ३.० आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील ८ जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. ५० हून अधिक महाविद्यालयांमधील १३० गटांनी या स्पर्धेत सहभाग घेतला या स्पर्धेतून तीन विजेते लवकरच घोषित केले जाणार आहेत.विद्यार्थ्यांमधील नाविन्यपूर्णतेला प्रोत्साहन देणे, त्यांना जोपासणे आणि वास्तविक जगातील आव्हानांवर उद्योजकीय उपाय विकसित करण्यासाठी सक्षम करणे, हे या स्पर्धेचे उद्दिष्ट आहे.२०२४ मध्ये सुरू झालेली ही स्पर्धा विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण आणि उद्योजकीय संस्कृती रुजवण्यासाठी तयार करण्यात आली आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या सर्जनशील कल्पनांचे रूपांतर शाश्वत उद्योगांमध्ये करण्यास मदत केली जाते. हा उपक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनांचे रूपांतर प्रभावी स्टार्टअपमध्ये करण्यासाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देतो, ज्यामध्ये त्यांना मार्गदर्शन, निधीच्या संधी आणि इनक्युबेशन सपोर्ट मिळतो. आयडिएशन काम्पिटिशन ३.० हे 'प्री-इनक्युबेशन प्रोग्रामच्या माध्यमातून या संकल्पनेला पुढे नेत हा कार्यक्रम अगदी सुरुवातीच्या कल्पनेपासून ते सक्षम स्टार्टअप विकसित करण्यापर्यंत मदत करतो. यामध्ये नाविन्यपूर्णता, समस्या निवारण आणि उद्योजकीय विचारसरणीवर भर दिला जातो, ज्यामुळे विद्यार्थ्यांना आवश्यक साधने आणि इकोसिस्टम सपोर्ट मिळतो.या कार्यक्रमातून वैचारिक स्तरावर संरचित उद्योजकता प्रशिक्षण देण्यात येते. तज्ज्ञ मार्गदर्शक आणि उद्योग क्षेत्रातील व्यावसायिकांसह सखोल स्टार्टअप बूटकॅम्प, इतर नाविन्यपूर्ण विचारवंत आणि संस्थापकांसोबत सहयोग आणि नेटवर्किंगच्या संधी मिळते. स्पर्धा पूर्ण केल्यावर सहभागाचे ई-प्रमाणपत्र मिळते. आश्वासक कल्पनांसाठी 'सीड ग्रांट' स्वरूपात निधी मिळवण्याची संधीही मिळत असून, मुंबई येथील आय स्पार्क इनक्युबिशन फाऊंडेशन मध्ये इनक्युबेशनसाठी पात्र होण्याची संधी मिळणार आहे.

# जो शस्त्र उचलेल त्याला किंमत मोजावी लागेल-केंद्रीय गृहमंत्री

## ■ डाव्यांनी निष्पाप लोकांना अंधारात ठेवले ■ आता बस्तरमधून लाल दहशतवाद जवळजवळ संपला



नवी दिल्ली-केंद्रीय गृहमंत्री अमित शहा लोकसभेत नक्षलमुक्त भारतासाठी सरकारच्या प्रयत्नांवर उत्तर देत आहेत. शहा म्हणाले- आदिवासींना अनेक वर्षांपासून त्यांच्या समस्या समोर याव्यात असे वाटत होते, पण अनेक वर्षे त्यांना संधी दिली गेली नाही. शहा म्हणाले- १९७० ते २०२६ पर्यंत चाललेल्या नक्षलवादाच्या घटनाक्रमावर आज संसदेत चर्चा होत आहे. जे लोक नक्षलवादाचे समर्थन करतात, त्यांना मी विचारू इच्छितो की, हे सर्व १९७० पासून आतापर्यंत का झाले नाही?

गृहमंत्री म्हणाले- मी काँग्रेसला विचारू इच्छितो की, ७५ वर्षांपैकी ६० वर्षे तुम्ही राज्य केले, मग आदिवासी विकासापासून का वंचित राहिले? ६० वर्षे घरे, शाळा, मोबाईल टावर पोहोचू दिले नाहीत आणि आता हिशोब मागत आहात. स्वतःच्या अंतर्मनात डोकावून बघा.सोमवारी संसदेत नक्षलवादावर चर्चा होत आहे. ही चर्चा सरकारने दिलेल्या अंतिम मुदतीपूर्वी एक दिवस आधी होत आहे. शहा यांनी अनेकदा ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद पूर्णपणे संपवण्याची घोषणा केली आहे.

बस्तरमधून नक्षलवाद पूर्णपणे संपुष्टात आला आहे: बस्तरमधून नक्षलवाद जवळजवळ पूर्णपणे संपुष्टात आला आहे. बस्तरमधील प्रत्येक गावात शाळा उघडण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली. या भागातील प्रत्येक गावात शिधावाटपाची दुकाने उघडण्यासाठी मोहीम सुरू करण्यात आली. प्रत्येक तहसील आणि पंचायतीमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि सामुदायिक आरोग्य केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. लोकांना आधार कार्ड आणि शिधावाटप कार्ड देण्यात आले आहेत, नक्षलवादाचे समर्थन करणा-यांना प्रश्न: जे येथे नक्षलवादाचे समर्थन करत होते, त्यांना मला फक्त विचारायचे आहे की, लोकांना अद्याप हे फायदे का मिळाले नाहीत? 'लाल दहशती'ची छाया या प्रदेशावर पडल्यामुळे बस्तरचे लोक मागे राहिले होते आणि त्यामुळेच विकास त्यांच्यापर्यंत पोहोचू शकला नाही. आज ती छाया दूर झाली आहे आणि बस्तर आता विकासाच्या मार्गावर आहे. काँग्रेस ६० वर्षे सत्तेत होती: ७० पैकी ६० वर्षे काँग्रेस सत्तेत होती, मग विकास का झाला नाही? तुम्ही विचारत आहात की विकास का झाला नाही. मी सविस्तरपणे समजावून सांगतो. तिथे लाखो लोक वर्षानुवर्षे गरिबीत जगत होते आणि कोणालाही त्याची पर्वा नव्हती. २०,००० तरुण मारले गेले, अनेक जण अपंग झाले आणि विकास त्यांच्यापर्यंत पोहोचला नाही. जबाबदार कोण? देशातील सर्वात मोठ्या पंचायतीने यावर चिंतन करायला नको का? नक्षलवादाचे मूळ कारण विकासाची मागणी नसून, इंदिरा गांधींनी अध्यक्षीय निवडणुकीमुळे स्वीकारलेली एक विचारसरणी आहे. मनमोहन सिंग म्हणाले होते- माओवादी ही देशाची सर्वात मोठी समस्या: पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी मान्य केले की जम्मू आणि काश्मीर आणि ईशान्य भारताच्या तुलनेत माओवादी ही देशातील सर्वात मोठी अंतर्गत सुरक्षा समस्या आहे. २०१४ मध्ये बदल झाले. कलम ३७० रद्द करण्यात आले, कलम ३५अ हटवण्यात आले, राम मंदिर बांधण्यात आले, सीएए कायदा लागू झाला आणि महिलांना विधानमंडळात ३३ऽ आरक्षण मिळाले. हे सर्व नरेंद्र मोदींच्या १२ वर्षांच्या कार्यकाळात घडले. विरोधकांचा लोकशाहीवर विश्वास नाही. इथले अनेक लोक गेल्या तीन तासांपासून म्हणत आहेत की, अन्याय झाला तर आम्ही न्यायाविरुद्ध लढत आहोत, पण लढण्याची पद्धत काय? आम्ही ब्रिटिशांच्या राजवटीखाली नाही, काही लोकांनी आमची तुलना भगतसिंग आणि भगवान बिरसा मुंडा यांच्याशी केली आहे. ही काय हिम्मत आहे. भगतसिंग आणि बिरसा मुंडा ब्रिटिशांविरुद्ध लढले आणि तुम्ही त्यांची तुलना अशा लोकांशी करत आहात ज्यांनी संविधान मोडले, शस्त्रे उचलली आणि निष्पाप लोकांची हत्या केली. ते आपल्याच लोकांचे रक्तसांडायलाही मागेपुढे पाहत नाहीत. त्यांचे आदर्श तिलका मांझी, बिरसा मुंडा, सुभाष बाबू किंवा भगतसिंग नाहीत. त्यांचे आदर्श माओ आहेत. ते हे आदर्श परदेशातूनही आणतात.

पान १ व १० वरून

## अमेरिकेच्या हल्ल्यात दिल्लीला

हल्ल्यानंतर आग लागली होती. या हल्ल्यात एका भारतीय नागरिकाचा मृत्यू झाला आहे. इराणने रविवारी दक्षिण इस्रायलमधील रामत होवाव या केमिकल प्लांटवर क्षेपणास्त्राने हल्ला केला.इराणने रविवारी व्हिडिओ जारी करून इस्रायलच्या औद्योगिक परिसरात झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांचे प्रदर्शन केले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प इराणविरुद्ध जमिनी कारवाई करण्याचा आदेश देउ शकतात. अमेरिकन वृत्तपत्र द वाल स्ट्रीट जर्नलच्या अहवालानुसार, ट्रम्प इराणजवळ असलेले युरेनियम आपल्या ताब्यात घेउ इच्छितात.इराणकडे सुमारे ४०० किलो समृद्ध (एनरिच्ड) युरेनियम आहे, ज्याचा वापर अणुबाम्ब बनवण्यासाठी केला जाउ शकतो. ट्रम्प यांनी आपल्या सहका-यांना सांगितले आहे की, इराणला हे युरेनियम सोडावेच लागेल. जर चर्चेतून मार्ग निघाला नाही, तर ते जबरदस्तीनेही घेतले जाउ शकते.दरम्यान, अमेरिका मध्य पूर्वेत सुमारे १०,००० अतिरिक्त सैनिक पाठवण्याची योजना आखत आहे. यापैकी ३,५०० हून अधिक सैनिक आधीच तेथे पोहोचले आहेत.युरेनियम हा एक असा पदार्थ आहे, ज्याचा उपयोग अणुउर्जा आणि अणुब?म्ब दोन्ही निर्माण करण्यासाठी केला जाउ शकतो. फरक फक्त तो किती प्रमाणात समृद्ध केला गेला आहे, यात असतो.

## ट्रम्प यांची विध्वंसाची

त्याचबरोबर होर्मुझ सामुद्रधुनी व्यवसायासाठी खुली केली गेली नाही,तर सैन्य माघारीपूर्वी सगळं नष्ट करू असेही म्हटले आहे.

**ट्रम्प म्हणाले, लवकरच करार होईल-** ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, 'इराणमधील आमची लष्करी कारवाई थांबवण्यासाठी अमेरिका एका नवीन आणि अधिक समजूतदार अशा राजवटीसोबत गंभीर चर्चा करत आहे. यात मोठी प्रगतीही झाली आहे, परंतु जर कोणत्याही कारणास्तव लवकरच करार होउ शकला नाही (जो बहुधा होईलच).'

**जल शुद्धीकरण प्रकल्पही उद्ध्वस्त करू**-डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढे म्हटले आहे की, 'आणि जर होर्मुझची सामुद्रधुनी तातडीने 'व्यापारासाठी खुली' केली गेली नाही, तर आम्ही इराणमधील आमचा छानसा 'मुक्काम' संपवू, पण त्यापूर्वी त्यांचे सर्व वीज निर्मिती प्रकल्प, तेलाच्या विहिरी आणि खार्ग बेट (आणि शक्यतो समुद्राचे पाणी गोडे करणारे सर्व प्रकल्प, ज्यांना आम्ही हेतुपुरस्सर अद्याप 'हात लावलेला' नाही) उडवून देउन आणि पूर्णपणे नष्ट करू', असा इशारा ट्रम्प यांनी दिला आहे. 'जुन्या राजवटीच्या ४७ वर्षांच्या 'दहशतीच्या काळात' इराणने निर्घृणपणे केलेल्या हत्या आणि मारलेल्या आमच्या अनेक सैनिकांचा आणि इतरांचा हा बदला असेल', असेही ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे.

**इराणच्या होर्मुझ सामुद्रधुनीवर टोल लावण्याच्या हालचाली-**एकीकडे ट्रम्प यांच्याकडून होर्मुझ सामुद्रधुनी लवकरात लवकर खुली करण्यासाठी दबाव आणला जात असताना आणि धमक्या दिल्या जात असतानाच इराणमध्ये मात्र वेगळंच सुरू आहे. इराण आता होर्मुझ सामुद्रधुनीतून ये-जा करणा-या जहाजांकडून टोल वसूल करणार आहे. इराणी खासदार अलादीन बोरु जेर्दी यांनी सांगितले की, होर्मुझ सामुद्रधुनीशी संबंधित नवीन संसदीय योजनेला लवकरात लवकर मंजुरी दिली जाणार आहे. या नव्या योजनेनुसार, इराणच्या परवानगीशिवाय कोणत्याही जहाजाला होर्मुझ पार करता येणार नाही. होर्मुझ सामुद्रधुनी पार करणा-या जहाजांकडून इराण टोल वसूल करण्याची तयारी करत आहे. कारण सुरक्षा ठेवण्यासाठी आणि इथून जाणा-या जहाजांना सेवा देण्यासाठी खर्च होत आहे. त्यामुळेच टोल वसुलीसाठी एक मार्गदर्शन नियमावली तयार करणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

## 40 महिलांचे लैंगिक

केंद्रित करायचा. स्वतःची श्रीमंती दाखवण्यासाठी तो आलिशान गाड्यांचा वापर करायचा आणि पंचतारांकित हॉटेलमध्ये भेटी आयोजित करून विश्वास संपादन करायचा.

महिला त्याच्यावर विश्वास ठेवू लागल्यानंतर तो प्रेमाचे नाटक करत त्यांच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित करायचा. त्यानंतर भावनिक दबाव टाकून त्यांच्या नावावर ३५ ते ४० लाख रुपयांचे कर्ज काढायला लावायचा. मिळालेली रक्कम तो आपल्या नातेवाईकांच्या खात्यावर वळवून स्वतः मात्र मौजमजा करण्यासाठी गोव्यासारख्या ठिकाणी पळून जायचा. फसवणूक पूर्ण होताच तो मोबाईल नंबर बंद करून संपर्क तोडायचा.या प्रकरणात आतापर्यंत ४० गुन्हे दाखल झाले असून अजून सुमारे ५० महिलांनी सामाजिक बदनामीच्या भीतीने तक्रार देण्यास नकार दिल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. या आरोपीचे गुन्हे नवी मुंबईपुरते मर्यादित नसून ठाणे, पुणे, नागपूर, नांदेड, नाशिक तसेच कर्नाटकातही त्याचा पसारा असल्याचे समोर आले आहे.

तपासात आणखी एक धक्कादायक बाब उघड झाली असून आरोपी विविध बनावट नावांनी वावरत होता. स्वप्नील वारूळ, हेमंत गायकर, रुद्रेश गोंधळी, जयेश सोनवणे, जयेश नाईक, आदित्य म्हात्रे आणि तन्मय म्हात्रे अशी त्याची अनेक ओळखी होत्या. या घटनेमुळे पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून मॅट्रिमोनी साइटवर ओळख झालेल्या व्यक्तींची खातरजमा केल्याशिवाय कोणतेही आर्थिक व्यवहार करू नयेत, असा इशारा दिला आहे.

## खरातच्या विळख्यात बडे अधिकारी;

यांनी संबंधित सर्व संशयित अधिका-यांचे मोबाईल आणि सीडीआर तपासण्याची मागणी केली आहे. गरज पडल्यास या प्रकरणातील मुख्य सूत्रधारांची नार्को टेस्ट करावी, जेणेकरून मंत्रालयापर्यंत पोहोचलेली ही मुळे उखडून टाकता येतील, असेही ते म्हणाले.

**पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा-** हा महाराष्ट्र फुले-शाहू-आंबेडकरांचा आहे. संत तुकाराम आणि गाडगे महाराजांनी आयुष्यभर भोंदूगिरीवर प्रहार केला. अशा राज्यात जर प्रशासनातील लोकच भोंदूगिरीला खतपाणी घालत असतील, तर ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे, अशा शब्दांत त्यांनी आपला संताप व्यक्त केला.

## पहिल्या चेंडूपासून तुटून पडला;

रस्ता दाखवला. त्याआधी युवा बॅटरनं बिनधास्त अंदाजातील फटकेबाजीसह मैफील लुटत सामना संघाच्या बाजूनं सेट केला होता. त्याने या सामन्यात ४ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने १७ चेंडूत ५२ धावांची खेळी केली.

**राजस्थानकडून सर्वात जलद अर्धशतकाचा रेकीर्ड**

राजस्थान र?यल्सच्या संघाकडून सर्वात जलद अर्धशतकाचा विक्रम हा यशस्वी जैस्वालच्या नावे आहे. २०२३ च्या हंगामात त्याने कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध अवघ्या १३ चेंडूत अर्धशतक ठोकले होते. या यादीत तिस-या क्रमांकावर पुन्हा एकदा वैभव सूर्यवंशीचं नाव दिसते. गत हंगामात जलद शतकी खेळीचा विक्रम नोंदवताना त्याने गुजरात टायटन्सविरुद्ध १७ चेंडूत अर्धशतक साजरे केले होते. या यादीत जोस बटलर १८ चेंडूतील अर्धशतकासह चौथ्या क्रमांकावर आहे. आणि चौथ्या क्रमांकावर पुन्हा एकदा वैभव सूर्यवंशीचं नाव आहे.

**यशस्वी जैस्वालसोबत दमदार भागीदारी-**

चेन्नई सुपर किंग्सनं ठेवलेल्या १२८ धावांचा पाठलाग करताना यशस्वी जैस्वालच्या साथीनं वैभव सूर्यवंशीनं संघाला दमदार सुरुवात करुन दिली. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी ३८ चेंडूत ७५ धावांची भागीदारी रचली.

## येत्या तीन महिन्यांत 'पीएनजी'

त्यामुळे उपलब्ध सुविधा असलेल्या भागातील नागरिकांनी तातडीने अर्ज करावेत, असे आवाहन मंत्री भुजबळ यांनी केले. त्याचप्रमाणे राज्यात कोणत्याही प्रकारचा लाकडाउन लागू होणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## भोंदू ऋषीकेश वैद्यची पूजा

पुण्यातील आहे. नाशिकमधील भोंदू अशोक खरात याने महिलांना जाळ्यात ओढून बलात्कार केल्याची घटना उघडकीस आल्यानंतर पुण्यातील पीडित महिलेने पोलिसांकडे धाव घेउन तक्रार दिली. वैद्य याला अटक करण्यात आल्यानंतर लष्कर न्यायालयातील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी बी. एस. जगदाळे यांनी त्याला ६ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

पोलीस कोठडीत असलेल्या वैद्य याने पोलीस कोठडीत पूजा साहित्य मिळावे, असा विनंती अर्ज त्याचे वकील ?ड. साजिद शहा यांच्या मार्फत न्यायालयात सादर केला. मात्र, न्यायालयाने त्याचा अर्ज दाखल करून घेतला नाही. वैद्य याला पूजेचे साहित्य उपलब्ध करून द्यावे, अशा तोंडी सूचना न्यायालयाने दिल्या. मात्र, तपास अधिकारी आणि सरकारी वकिलांनी सुरक्षेच्या कारणास्तव त्याचा अर्ज फेटाळून लावण्याची विनंती न्यायालयाकडे केली. त्यानंतर न्यायालयाने वैद्यचा अर्ज फेटाळून लावला.

## चांदीच्या दरात मोठी घसरण;

तुलनेने चांदी आज २ हजारांनी घसरली आणि सोन फक्त ५०० रुपयांनी वाढलेलं पाहायला मिळत आहे. लग्नसराईच्या दिवसांमध्ये सराफा बाजारात मोठी गर्दी पाहायला मिळायची. मात्र, यंदा वाढत्या किमतींमुळे बाजारपेठेत तुलनेने गर्दी पाहायला मिळते आहे. सोने-चांदीचे दर आवाक्याबाहेर गेल्याने सर्वसामान्य ग्राहकांमध्ये चिंता वाढली असून, खरेदी-विक्रीचे व्यवहार मर्यादित प्रमाणात होत असल्याचेही चित्र आहे.

## महाराष्ट्रात अवकाळी पाउस

: जुन्नर शहरासह मीना नदीच्या खो-यात वादळी वा-यासह गारपीट व अवकाळी पावसाने शेतक-यांची धांदल उडाली. या गारपिटीने शेतक-यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जवळपास एक तासाहून झालेल्या या पावसाने आंबा, गहू व कांदा पिकाचे मोठे नुकसान झाले असून तातडीने पंचनामे करण्याची मागणी सरपंच अमोल भुजबळ, कुलदीप नायकोडी यांसह शेतक-यांकडून केली जात आहे. जुन्नर तालुक्यातील आंब्याचे आगार म्हणून ओळख असलेल्या काले, येणेरे, बेलसर, वडज , दातखिळेवाडी, पारुंडे, कुसूर, चिंचोली या परिसरात झालेल्या गारपिटीमुळे तसेच वादळामुळे आंबा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. वादळी वा-यामुळे कै-या मोठ्या प्रमाणात पडल्याचे दिसून आले. वादळी वारा व गारपिटीमुळे आंबा उत्पादकांच्या उल्यासुरल्या अपेक्षांवर देखील पाणी पडले आहे. आंबा उत्पादकांचे अर्थकारण संकटात सापडले असून शासनाने आंबा उत्पादकांना दिलासा द्यावा अशी मागणी केली जात आहे.

धुळे, नाशिक जिल्ह्यात गारांचा खच : धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातही अवकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसामुळे कांदा, मका, गहू आणि हरभरा पिकांवर परिणाम होण्याची शक्यता शेतक-यांनी व्यक्त केली आहे. नाशिकमध्येही जोरदार वा-यासह पाउस आणि गारपीट झाली. अनेक भागांत गारांचा खच साचल्याचे चित्र दिसून आले. या अचानक आलेल्या अस्मानी संकटामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. सिन्नर परिसरातही पावसाची नोंद झाली.

## अमरावतीत अवकाळी पावसाची

शक्यता वर्तवली होती आणि त्यानुसार आज सायंकाळी शहरात पावसाने हजेरी लावली. पुढील काही दिवस वातावरण ढगाळ राहण्याची शक्यता असून अधूनमधून हलक्या सरी कोसळू शकतात, असा अंदाज हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

## मनपा अधिकाऱ्यांनी केले सुθीम

सूचना क्रमांक १८० चे तारांकित प्रश्नाचे लेखी उत्तर देत असताना स्पष्ट केले की ही जागा मनपाची आरक्षित आहे. या जागेवर शाळेचे आरक्षण आहे. या जागेवर शाळा निर्माण करणे आहे. असे लेखी विधानपरिषदेत त्या सभागृहामध्ये देण्यात आले होते. तरीही नवसारी येथील आरक्षित शाळेच्या मैदानावर तसेच शासन करारनामा भंग करून नियमबाह्य पद्धतीने सदर जागेवर विकसित करण्याकरिता एका खाजगी कंत्राटदाराला ठेका देण्यात आला होता. शासनाची व मार्केटमध्ये खरेदी करण्यात आलेल्या दुकानदाराची फसवणूक करण्यात आलेली आहे. या तिन्ही प्रकरणात जनहित याचिका दाखल केली आहे. याचिकेची उच्च न्यायालयाने दखल घेऊन कार्यवाही करण्याचे आदेश राज्याचे नगर विकास विभागाचे प्रधान सचिव यांना दिले आहे. अतिरिक्त आयुक्त देशमुख व संसनर विभागाचे टिपी सागर वानखडे यांना पिटीशन व उच्च न्यायालयाचे आदेशाची सत्यप्रत देऊन संपूर्ण प्रकरणाची माहिती देण्यात आली होती, परंतु कोणतीही कार्यवाही नाही झाली. म्हणून संबंधित सर्व अधिकाऱ्यांवर न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व बांधकाम करण्यासाठी दिलेली परवानगी रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.

पत्रकार परिषदेमध्ये मुन्ना राठोड यांच्या सोबत समीर जवंजाळ उपस्थित होते.

## नमो उद्यानावर नगरसेवकांची

सर्व सुविधायुक्त उद्यान उभारणे कठीण असल्याचे मत व्यक्त होत आहे.

गेल्या तीन महिन्यांत जागा निश्चित न होणे म्हणजे विकासाच्या नावाखाली जनतेची दिशाभूल केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. जर वेळेत निर्णय झाला असता, तर १ कोटींचा निधी वाया गेला नसता, अशीही चर्चा शहरात रंगली आहे.

प्रभाग क्रमांक ३ मधील नागरिकांनी नमो उद्यानासाठी लेखी निवेदन देत पाठिंबा दर्शवला आहे, अशी माहिती नगरसेविका अ?ड. कीर्ती इमले यांनी दिली.त्यांच्या मते, नमो उद्यानात महिलांसाठी सुरक्षा व्यवस्था, ण्ण्ऊ्र, शौचालय, ओपन जिम, ज्येष्ठ नागरिकांसाठी ध्यान केंद्र, बसण्याची व्यवस्था, तसेच मुलांसाठी खेळणी व झुले अशा अनेक सुविधा उपलब्ध होणार आहेत. नमो उद्यान हे शहरासाठी मोठी संधी असताना, सत्ताधारी व विरोधकांतील वादामुळे हा प्रकल्प रखडण्याची शक्यता आहे. आता तरी सर्वांनी एकत्र येऊन निर्णय घेतला नाही, तर निधी परत जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## अर्जुन नगरात कचऱ्याच्या ढिगाराला

आगीने रौद्ररूप धारण केले. आगीचा लोळ रस्त्यापर्यंत दिसत होता. अग्निशमन विभागाने वेळीचात पोहोचून आग आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

## आमदार θाविण तायडे यांच्या

जाहीर करण्यात आला असून त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. या प्रकल्पामुळे सिंचनाची सुविधा उपलब्ध होऊन शेतीला चालना मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

## चारचाकी वाहनातून साडे सहा

तक्रार दाखल केली.यानंतर परतवाडा पोलीस स्टेशन चे ठाणेदार सुरेश म्हस्के यांच्या नेतृत्वात अधिकारी - कर्मचारी घटनास्थळी दाखल होऊन पुढील तपास करीत आहे.या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. परिसरात असलेले सीसीटीव्ही कॅमेरे तपासून या घटनेचा तपास सुरू आहे .

## वेगवेगळ्या घटनेत वृद्ध आणि

पोलिसांनी घटना स्थळावर पोहोचून पंचनामा केला आणि आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला. तसेच बडनेरा पोलीस स्टेशन हद्दीत येणाऱ्या अकोली परिसरातील संरक्षण कॉलनीमध्ये हरी सिद्धी माता मंदिराजवळ राहणाऱ्या गणेश अवघाते यांचे भाऊ ,वहिनी आणि आई अकोली मध्ये राहणाऱ्या बहिणीच्या घरी गेले होते. गणेश अवधाते घरी एकटेच होते. यावेळी त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. घरातील लोक जेव्हा परत आले तर दार आतून बंद होते. घरच्यांनी दार वाजवले पण कोणताही प्रतिसाद नाही मिळाला. शेवटी दरवाजा तोडून सर्व आत गेले तर गणेश फासावर लटकताना दिसला. हे पाहून सर्वांना धक्का बसला. याची माहिती त्यांनी तात्काळ बनडेरा पोलिसांना दिली. पोलिसांनी घटना स्थळावर पोहोचून पंचनामा केला आणि मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवला. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे.

## भोंदू खरातसह राजकीय नेत्यांवर

मयूर सरपे, वैशाली चरपे ,सुषमा कुलकर्णी, विजय कुलकर्णी, गोविंद रोहनकर, ?ड. संजय वानखडे, दिपाली ठाकरे, धनंजय ठाकरे, प्रो. शरदराव पुसदकर, श्रीकृष्ण धोटे ,मनीष नानोटी, नारायण मुंडे ,प्रकाश कळसकर, प्रदीप पाटील, प्रवीण वासनिक ,मनीष पाटील, गजानन जीरापुरे, संजय सर्वटकर, माया धंदे, गणेश गहूकर ,दीक्षा गहूकर, बाळासाहेब देसाई, प्रकाश इंगळे, संजय धाकडे, सुनिता रायबोले, गोविंद जाजू, देवराव बावणे, सुधीर लसणकर ,डॉ. वैभवकुमार निमकर ,प्रवीणचंद्र मेश्राम ,अशोक गव्हाणे, माया वाकोडे, सुषमा कुलकर्णी, हरीश येवले, आशिष कडू, संजय वाघुळे ,संजयराव गलफट, दीपक तायडे, रवींद्र खाकसे, डॉ.रवींद्र खंडारे, प्रवीण वासनीक ,प्रतिभा मेश्राम, दिनेश मेश्राम, नागोराव कोडापे, शंकरराव अत्तुरकर, मधुकर इरपाते ,जानरावजी मसराम आदींचा सहभाग होता.

## ११ वर्षीय मुलीवर लैंगिक

या वेळी फिर्यादी यांच्या परिचिताने ११२ वर कॉल करून पोलिसांना तातडीने माहिती दिली. फिर्यादीने पोलिसांना सांगितले की, आरोपी त्यांना 'आय लव यू' असे म्हणतो आणि वारंवार घाणेरडे इशारे करतो. पोलिसांनी प्रकरणी बीएनएस कलम ७४, ७५, ३५१, ३५२ तसेच पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. घटनेने परिसरात खळबळ माजली असून स्थानिक नागरिकांनी मुलींच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, ३१ मार्च २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# ‘पन्नास खोके’च्या घोषणांनी पेटले सभागृह ; विकासाच्या चर्चेला राजकीय धुरळ्याने गिळले

## मनपाच्या अर्थसंकल्पीय सभेत हंगामा ; १६ नगरसेवक निलंबित, पोलिसांच्या मदतीने बाहेर काढले

*अकोला : शहराच्या भविष्यास दिशा देणारी आणि सुमारे दीड हजार कोटींच्या अर्थसंकल्पावर सखोल चर्चा अपेक्षित असलेली महानगरपालिकेची विशेष सभा सोमवारी अभूतपूर्व गोंधळ, घोषणाबाजी आणि निलंबनाच्या कारवाईमुळे पूर्णपणे वादग्रस्त ठरली. विकासाच्या मुद्द्यांवर चर्चा होण्याऐवजी सत्ताधारी आणि विरोधकांतील आरोप-प्रत्यारोपांनी सभागृह तापले, आणि अखेर १६ विरोधी नगरसेवकांना पुढील तीन सभांसाठी निलंबित करण्याचा निर्णय घेतल्याने वातावरण अधिकच तणावपूर्ण बनले. परिस्थिती इतकी बिघडली की पोलिसांना पाचारण करून नगरसेवकांना बाहेर काढावे लागले.*



महापौर शारदा खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा सुरू होताच स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी सन २०२६-२७ चा अर्थसंकल्प सादर केला. शहरातील पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सेवा, कर संकलन यांसारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर चर्चा अपेक्षित होती. मात्र, सुरुवातीलाच वादाचा ठिणगा पडला.

वंचित बहुजन आघाडीचे स्वीकृत नगरसेवक सुनील इन्नानी बोलण्यासाठी उभे राहताच सत्ताधारी बाकांवरून ‘पन्नास खोके, एकदम ओके’ अशा घोषणांनी सभागृह दणाणून गेले. या घोषणांवर विरोधकांनी संतप्त प्रतिक्रिया देत सभागृहाच्या मध्यभागी येत जोरदार घोषणाबाजी सुरू केली. विरोधी पक्षनेते डॉ. झीशान हुसेन, पराग गवई, निलेश देव, आझाद खान, फजलू पेहलवान, शंकर लंघोटे आदी नगरसेवकांनी घोषणाबाजी करणाऱ्यांकडून माफीची मागणी केली. मात्र, दोन्ही बाजूंनी आक्रमक भूमिका घेतल्याने गोंधळ आणखी चिघळला.

या गदारोळात शहराच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर चर्चा होऊच शकली नाही. रस्त्यांची दुरवस्था, पाणीटंचाई, कचरा व्यवस्थापन, आरोग्य सेवा, पथदिवे यांसारखे प्रश्न बाजूलाच पडले आणि सभागृहात केवळ राजकीय संघर्षाचेच चित्र दिसून आले.

### “ निलंबित १६ नगरसेवक

मोहम्मद फजलु अब्दुल करीम (प्रभाग १ ड), आझादखान अलियारखान (प्रभाग १७ ड), पराग रामकृष्ण गवई (प्रभाग १४ क), निलेश रामकृष्ण देव (प्रभाग ३ ड), शेख शमशु कमर शेख साबीर (प्रभाग १४), डॉ. जिशान हुसैन (प्रभाग ११ ड), विजय रामदास इंगळे (प्रभाग २० अ), शंकर भाऊराव लंघोटे (स्वीकृत सदस्य), निलोफरखान सोहेलखान (प्रभाग १ क), आकाश श्रीकृष्ण कवडे (स्वीकृत सदस्य), अभय अशोक खुमकर (प्रभाग ४ ड), जैनबबी शेख इब्राहिम (प्रभाग ११ अ), अशिया परवीन मोहम्मंद शारिक (प्रभाग १८ क), उज्वला प्रविण पातोडे (प्रभाग १४ अ), सुवर्णरेखा विजय जाधव (प्रभाग ७ अ), जयश्री महेंद्र बहादुरकर (प्रभाग १४ ब).

### “ घोषणाबाजीवर कारवाईचा प्रश्न

सभागृहात ‘पन्नास खोके, एकदम ओके’ अशा घोषणा देऊन वातावरण पेटवणाऱ्यांवर कोणतीही कारवाई न करता केवळ विरोधी नगरसेवकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याने संताप व्यक्त होत आहे. वादाला सुरुवात करणाऱ्यांना मोकळे सोडून इतरांवर कारवाई करणे हा अन्याय असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. घोषणाबाजी करणाऱ्यांवरही कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**ठिय्या आंदोलनानंतर निलंबन :** माफी न मिळाल्याने विरोधी नगरसेवकांनी सभागृहात ठिय्या आंदोलन छेडले. कामकाज ठप्प झाल्यानंतर महापौरांनी कडक पाऊल उचलत विरोधी गटातील १६ नगरसेवकांना पुढील तीन सभांसाठी निलंबित करण्याचा आदेश दिला. या निर्णयाचा तीव्र निषेध करत ‘लोकशाहीची गळचेपी’ असल्याचा आरोप केला.

### “ पत्रकारांनाही रोखले; ठिय्या आंदोलन

सभागृहातील गोंधळादरम्यान पत्रकारांना प्रवेश नाकारण्यात आल्याने प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी महापौर कक्षासमोर ठिय्या आंदोलन केले. पुढील सभांमध्ये एका प्रतिनिधीस कॅमेऱ्यासह प्रवेश देण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

........................

### “ पोलिसांच्या मदतीने कारवाई

निलंबित नगरसेवकांनी सभागृह सोडण्यास नकार दिल्याने प्रशासनाने पोलिसांना बोलावले. पोलिस बंदोबस्तात नगरसेवकांना बाहेर काढण्यात आले. या कारवाईदरम्यान काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले आणि महापालिकेच्या इतिहासात दुर्मिळ ठरावी अशी परिस्थिती निर्माण झाली.

# श्री १००८ भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सव उत्साहात साजरा



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील दिगंबर जैन मंदिर येथील जन्म कल्याणक महोत्सव शांततेत पार ज्ञान, दर्शन, चारित्र्य, अहिंसा, शां ती, जगा आणि जगू द्या, अपरिग्रह यांची सबंध जगाला शिकवण देणारे जैन संप्रदायाचे २४ वे तिर्थंकर श्री १००८ भगवान महावीर स्वामींचा जन्मकल्याणक महोत्सव ३० मार्च सोमवार ला मालेगांव येथे शांततेत पार पडला मालेगांव परिसरातील सकल जैन समाजाच्या बंधू भगिनींनी स्थानिक मुख्य मार्गावरील श्री १००८ भगवान महावीरांचा शांततेचा संदेश देणारी मिरवणूक शहराच्या मुख्य मार्गावरून काढण्यात आली या मिरवणुकीत सर्व समाजाच्या बंधू भगिनी तसेच बालगोपाल मोठ्या संख्येने सहभागी झाले होते यावेळी मालेगांव चे उदयोगपती अभिषेक मुंदडा , मालेगाव नगरपंचायत चे नगराध्यक्ष ओमप्रकाश खुरसडे , उपाध्यक्ष राधा खवले व नगरसेवक गणेश अहिर , नगरसेवक सन्नी घुगे , नगरसेवक अभि घुगे , नगरसेवक अंकुश गुजरे , नगरसेवक संजय सारडा व माजी नगराध्यक्ष अरुण बळी, बाळा सावंत , गफ्फार शाह , उदय तोंडे , विशाल बनचरे , महेश भुतडा व इत्यादी पदाधिकारी यांनी श्री १००८ भगवान महावीर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले श्री १००८ भगवान महावीर यांची मिरवणूक पहिल्यांदा गुरुदेवांच्या सान्निध्यात अतिशय भक्तिमय वातावरणात मिरवणुकी दरम्यान परिधान केलेल्या लहान मुला-मुलींनी आकर्षक देखावे साकारले होते. या उपक्रमास शहरवासीयांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला श्री १००८ भगवान महावीरांचा संदेश देणारी मिरवणूक जैन मंदीर पासुन माळी वेटाळ ,खवले वेटाळ, पांडे वेटाळ , मराठी शाळा समोरून , शिव चौक, गांधी चौक, मेडीकल चौक, जुने बसस्टॉप ,पोलीस स्टेशन समोरून, जोगदंड हॉस्पीटल, दुर्गा चौक , जैन मंदीर जवळ पोहोचली या मिरवणुकी दरम्यान ठिकठिकाणी थंड पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती मिरवणूक जैन मंदिरात आल्यानंतर तिथे श्री १००८ भगवान महावीर प्रतिमेचा अभिषेक करण्यात आला त्यानंतर उपाध्याय मुनिश्री १०८ विश्रुत सागर महाराज , मुनिश्री १०८ निर्वेग सागर महाराज यांनी प्रवचन करण्यात आले आयोजित कार्यक्रमात श्री १००८ भगवान महावीर भगवंताची आरती करण्यात आली व तसेच महाप्रसाद सहभोजनाचा कार्यक्रम सकल जैन समाजातर्फे आयोजित करण्यात आला.


## जाहिर सुचना

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, श्री विठ्ठल रुख्माई संस्थान कारंजा ता. कारंजा जि. वाशिम ह्या संस्थेचे मौजे कामठवाडा, ता. कारंजा जि.वाशिम येथील शेत सर्व्हे नं.७१ क्षेत्रफळ ९.१५ हे.आर. सन २०२६-२०२७ ह्या कालावधीकरिता खरिप पिक घेण्यासाठी तात्पुरत्या भाडेपट्ट्याने देण्यासाठी जाहिर लिलाव दिनांक ०५/०४/२०२६ रविवार रोजी सकाळी ठिक १० वाजता घेण्यात येईल. इच्छुक बोलीधारकांनी लिलावाच्या वेळेच्या १५ मिनिटे आधी लिलावाचे स्थळ श्री गोविंद महाराज संस्थान जवळ, मौजा कामठवाडा तालुका कारंजा जिल्हा वाशीम येथे उपस्थित राहावे.

**लिलावाच्या अटी व शर्ती**

१) अनामत रक्कम रु.१००००/- (अक्षरी दहा हजार रुपये) भरून लिलावात भाग घेता येईल.
२) अंतिम बोली धारकास बोली मंजुर झाल्यानंतर २५ऽ रक्कम तात्काळ जमा करावी लागेल, ज्यांची बोली कमी रकमेची असेल त्यांची अनामत रक्कम लिलावानंतर परत करण्यात येईल.
३) उर्वरित रक्कम लिलावाच्या दिनांकापासून एक आठवडयाच्या आत जमा करावी लागेल.
४) बोलीधारकास स्व खर्चाने करारनामा करून द्यावा लागेल. करारनाम्यावर गावातील दोन प्रतिष्ठित व्यक्तींना साक्षदार म्हणून सही करण्यास उपस्थित करावे लागेल.
५) लिलावाच्या तारखेपासून ते ३१ मार्च २०२७ हा कालावधी शेत वहितीचा राहील.
६) शेत पडीत ठेवल्यास करार रद्द समजण्यात येईल. अंतिम बोली मंजुर रक्कम परत मिळणार नाही.
७) संस्थानचे शेतातील झाड/वृक्ष याचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावी लागेल.
८) ई पिक नोंदणी संस्थानचे प्रतिनिधी शेतात येवून करतील.
९) मौजा कामठवाडा पासुन ६ किलोमिटरचे परिसरातील शेतकरी / वहितदार लिलावात भाग घेऊ शकतील.
१०) २०२५-२६ मध्ये झालेल्या जाहीर लिलावातील अंतिम बोलीतील रकमे पासुन लिलावास सुरुवात होइल
११) उपस्थिती अभावी लिलाव तहकुब झाल्यास पूर्व सुचना देऊन पुन्हा घेण्यात येईल.
१२) कोणतेही कारण न देता लिलाव रद्द करण्याचा अधिकार संस्थानतर्फे राखून ठेवण्यात येत आहे

दिनांक :- ३०/०३/२०२६

**विश्वस्त मंडळ**
**श्री विठ्ठल रुख्माई संस्थान**
**कारंजा ता. कारंजा जिल्हा वाशीम**

## जाहीर नोटीस

सर्वत्र जनतेस नोटीस द्वारे कळविण्यात येते की , आमचे पक्षकार श्रद्धेय नटराज कला, क्रीडा, शिक्षण व बहुउद्देशीय संस्था, वारखेड ता. तेल्हारा, जि. अकोला रजिस्टर नं. महा. ०५/ २००९/एफ.-१२८७८ यांनी आकाश शिक्षण संस्था अकोला तालुका जिल्हा अकोला महा / ४५०७ / एफ- ३७१२ द्वारा संचलित होली एंजल होरायझन इंग्लिश प्रायमरी स्कूल, तेल्हारा (इंग्रजी माध्यम वर्ग१ ली ते ५ वी) कायम विनाअनुदानित तत्त्वावरील (राज्य मंडळ यु-डायस नंबर २७०५०७०४८२०) ही शाळा कायदेशीररित्या हस्तांतरित करून घेण्याचे ठरविले आहे. करिता वरील जाहीर सूचनेबाबत किंवा सदर शाळा हस्तांतरणाबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत त्यांना लेखी हरकत सर्व कागदपत्र पुराव्यासहित खालील नमूद केलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष हजर राहून नोंदवावी. अन्यथा कसल्याही प्रकारची हरकत नसल्याचे गृहीत धरून आमचे पक्षकार सदर शाळेची हस्तांतरणाची प्रक्रिया कायदेशीर रित्या पूर्ण करतील. त्यानंतर कोणतेही प्रकारची हरकत गृहीत धरल्या जाणार नाही.याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
**ॲड. एम आर म्हसाये.**
लेबर कॉलनी, तार फाईल अकोला,
ता.जिल्हा अकोला ९५०३८२८५७८

## महाराष्ट्र शासन
## महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, समग्र शिक्षा, मुंबई.

ई-निविदा सुचना क्र. १० सन २०२५-२६

**कामाचे नाव :-** Proposed Upgradation / Renovation of District Institute of Education & Training (Diet) As Center of Excellence, At - Amravati & Washim.

राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई हे उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने खालील कामाकरिता Online निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | अमरावती येथील DIET सक्षमीकरण/ इमारत बांधकाम. | रु.८०२.१२ लक्ष |
| २. | वाशिम येथील DIET सक्षमीकरण / इमारत बांधकाम. | रु. ८६५.२४ लक्ष |

**उपरोक्त कामाकरीताच्या निविदा कालावधी पुढीलप्रमाणे आहे.**

| | |
|---|---|
| निविदा प्रसिद्धी | दि. ३१/०३/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता |
| निविदा पूर्व बैठक | दि. ०२/०४/२०२६ रोजी दुपारी ०३:०० वाजता |
| निविदा स्विकारण्याचा कालावधी | दि. ३१/०३/२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता पासून ते दि. ०८/०४/२०२६ रोजी सायं. ०५:०० पर्यंत |
| तांत्रिक प्रस्ताव (Hard Copy) कार्यालयास जमा करण्याचा कालावधी (Offline). | दि. ०९/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०५ पासून ते दि. १३/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यंत |
| निविदा उघडण्याचा कालावधी | दि. १३/०४/२०२६ रोजी सायं. ०५:०० वाजता (शक्य झाल्यास) |
| संकेतस्थळ व निविदा दस्तावेज प्राप्त करणे | निविदा दस्तावेज www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील. शुद्धीपत्रक / स्पष्टीकरण / मुदतवाढ असल्यास वर निर्देशित संकेतस्थळावर टाकण्यात येईल आणि अन्य कोणत्याही माध्यमात प्रकाशित करण्यात येणार नाही. निविदाकार यांनी त्यांच्या वतीने अद्यावत राहण्याकरिता सदर संकेतस्थळाला नियमित भेट द्यावी. |

| टिप- | निविदा प्रपत्रामध्ये काही बदल असल्यास सदर बदल केवळ www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
|---|---|

**स्वाक्षरीत / -**
**राज्य प्रकल्प संचालक,**
महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.


# अपहार प्रकरणात खेट्री सरपंच पदावर कायम

**- अपर आयुक्तांचे सीईओंना फेरचौकशीचे आदेश**
**- अपात्रतेच्या अफवा खोट्या ठरल्या**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

ग्रामपंचायत खेट्री येथील सरपंच जहूर खान यांच्यावर विकास कामे न करता कागदोपत्री दाखवून लाखो रुपयांच्या साहित्य खरेदीचा आरोप करण्यात आलेल्या प्रकरणात अद्याप कोणताही अपात्रतेचा निर्णय झालेला नसून, ते सरपंच पदावर कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, अपर आयुक्तांनी या प्रकरणाची फेरचौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना (सीईओ) दिले आहेत.

या संदर्भात २०२३ मध्ये उपसरपंचासह पाच ग्रामपंचायत सदस्यांनी अमरावती विभागीय आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. त्यामध्ये सरपंचांनी विकास कामे प्रत्यक्षात न करता कागदोपत्री पूर्ण दाखवून निधीचा अपहार केल्याचा आरोप करण्यात आला होता. प्रकरण विभागीय आयुक्त न्यायालयात प्रलंबित असताना काही महिन्यांनी उपसरपंच व एका सदस्याने सीईओंसमोर लेखी निवेदन देत सरपंचांनी पदाचा दुरुपयोग केलेला नाही, तसेच पुढील कारवाई करू नये, अशी भूमिका मांडली होती.



‘अपर आयुक्तांच्या आदेशानुसार मला अद्याप अपात्र ठरविण्यात आलेले नाही. विरोधकांकडून खोटी अफवा पसरविण्यात आली आहे. माझ्यावरचे आरोप राजकीय हेतूने व बिनबुडाचे आहेत. ‘सत्य परेशान हो सकता है, मगर पराजित नहीं’,’ असे सरपंच जहूर खान यांनी सांगितले.

दरम्यान, ९ मार्च २०२६ रोजी अपर आयुक्तांनी सुनावणी घेत प्रकरणाची फेरचौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार सीईओंनी नव्याने तपास करून अहवाल सादर करणे अपेक्षित आहे.

याच पार्श्वभूमीवर सरपंच जहूर खान यांना अपात्र ठरविल्याची अफवा विरोधकांकडून गावात व परिसरात पसरविण्यात आली होती. मात्र, अपर आयुक्तांच्या आदेशात अशा कोणत्याही अपात्रतेचा उल्लेख नसल्याचे समोर आले असून, जहूर खान हे सध्या सरपंच पदावर कायम आहेत. या प्रकरणात सरपंचांच्या बाजूने ॲड. संतोष रहाटे यांनी काम पाहिले.

# निष्ठेचा प्रवास ठरला प्रेरणादायी
## तेल्हाराच्या भैय्या खारोडे यांना जनसेवा पुरस्कार

**अहिल्यानगर येथे बच्चू कडू यांच्या हस्ते सन्मान; कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण**

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

प्रामाणिकपणे, निःस्वार्थ भावनेने आणि सातत्याने जनतेसाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान होत असल्याचे प्रेरणादायी उदाहरण म्हणजे तेल्हारा तालुक्यातील प्रहार जनशक्ती पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते भैय्या उर्फ सुरज राजेशराव खारोडे यांना प्राप्त झालेला ‘सच्चा सक्रीय कार्यकर्ता – रुग्णसेवक’ जनसेवा पुरस्कार होय. अहिल्यानगर येथे आयोजित विशेष कार्यक्रमात प्रहारचे नेते बच्चू कडू यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

हा सन्मान केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून, तो संघर्ष, निष्ठा आणि सेवाभाव यांचा गौरव मानला जात आहे. भैय्या खारोडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून कोणत्याही पदाची किंवा प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता समाजकार्यात स्वतःला झोकून दिले आहे. शेतकरी, कष्टकरी, गरीब आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी ते सातत्याने लढत आले आहेत.

विशेषतः प्रहार जनशक्ती पक्षाच्या विविध आंदोलनांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला असून, कर्जमुक्ती आंदोलनातील



पायदळ दिंडीत सहभागी होत त्यांनी शेतकऱ्यांच्या वेदना जवळून अनुभवल्या. हा प्रवास केवळ आंदोलनापुरता मर्यादित नसून, तो जनतेच्या प्रश्नांशी जोडलेला असल्याची भावना कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

याशिवाय, रुग्णसेवा क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. गरजू रुग्णांना मदत करणे, आपत्कालीन परिस्थितीत धावून जाणे आणि वैद्यकीय सहाय्यासाठी समन्वय साधणे या माध्यमातून त्यांनी समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यामुळेच त्यांना ‘रुग्णसेवक’ या विशेष श्रेणीत गौरविण्यात आले. आजच्या राजकीय परिस्थितीत अनेकजण पद, सत्ता किंवा प्रसिद्धीसाठी कार्य करत असल्याची टीका होत असताना, भैय्या खारोडे यांच्यासारखे कार्यकर्ते निष्ठेने चळवळीशी जोडलेले असल्याचे या सन्मानातून अधोरेखित झाले आहे. त्यांनी कधीही पदाची अपेक्षा ठेवली नाही, तसेच कोणत्याही परिस्थितीत आपल्या विचारांशी तडजोड केली नाही, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरते. या सन्मानामुळे तेल्हारा तालुक्यातील प्रहारच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. शांतपणे, कोणतीही अपेक्षा न ठेवता काम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी हा सन्मान प्रेरणादायी ठरत आहे. ‘निष्ठा आणि संघर्ष यांना योग्य वेळी न्याय मिळतो’ हा संदेश या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाला आहे. दरम्यान, विविध स्तरांतून भैय्या खारोडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांचा हा सन्मान तालुक्याच्या स्वाभिमानाचा क्षण असल्याची भावना व्यक्त होत आहे. भविष्यातही त्यांनी याच जोमाने जनतेसाठी कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# अकोला ते तिरुपती नियमित रेल्वे लवकरच

■ प्रतिनिधी | वाशिम ■

अकोला ते तिरुपती दरम्यान विशेष रेल्वेगाडीचे नियमितीकरण करण्याबाबत केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाले आहे. यासंदर्भात माननीय रेल्वेमंत्री @ashwini.vaishnaw जी यांचे पत्र प्राप्त झाले असून, अकोला-तिरुपती स्पेशल गाडी (०७६०६/०७६०५) आता नियमित स्वरूपात १७४३०/१७४२९ अकोला-तिरुपती एक्सप्रेस म्हणून धावणार आहे.

ही गाडी सुरू झाल्यामुळे विदर्भातील भाविकांना तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी मोठी सोय होणार असून प्रवास अधिक सुलभ आणि सोयीस्कर होईल.

# ७०० ग्रॅम गहाण सोन्याच्या ‘विश्वासघाताचा सोनेरी घोटाळा’

## ज्वेलर्सचा आयकर धाडीचा दावा फोल ; पंचनामा नाही, कागदपत्रेही नाहीत

■ *समीर ठाकूर* ■

*अकोला : नेकलेस रोडवरील ज्वेलर्स संचालकाकडून ग्राहकाला कमी व्याजदराचे आमिष दाखवून आपल्याकडे मोहित / आकर्षित करीत ७०० ग्रॅम गहाण सोन्याच्या कथित विल्हेवाटीच्या प्रकरणाने आता अधिकच गंभीर वळण घेतले असून, ज्वेलर्सकडून करण्यात येणारे दावे एकामागोमाग एक संशयाच्या भोवऱ्यात अडकताना दिसत आहेत. दरम्यान, ग्राहकाने आक्रमक भूमिका घेत थेट पोलिसांत धाव घेण्याची तयारी पूर्ण केल्याची माहिती समोर आली आहे.*

सदर प्रकरणात ज्वेलर्स संचालकाकडून ‘आयकर विभागाच्या धाडीत सोने जप्त झाले’ असा दावा करण्यात आला होता. मात्र, या दाव्याची सत्यता तपासताना अनेक गंभीर प्रश्न उभे राहिले आहेत. जप्तीचा पंचनामा, अधिकृत नोटीस, कारवाईचे दस्तऐवज यापैकी एकही कागद ज्वेलर्सकडून सादर करण्यात आलेला नाही. यामुळे, आयकर विभागाचे नाव पुढे करून ग्राहकाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप अधिक तीव्र झाला आहे.

सोन्याच्या व्यवहारात विश्वास हा सर्वात मोठा आधार मानला जातो. मात्र, या घटनेमुळे ‘विश्वासाचा व्यापार की फसवणुकीचा खेळ?’ असा थेट सवाल उपस्थित झाला आहे. या पार्श्वभूमीवर, संबंधित ज्वेलर्सच्या व्यवहारांची सखोल चौकशी होणार का? गहाण व्यवहारांचे नोंदवही, स्टॉक रजिस्टर तपासले जाणार का? आणखी किती ग्राहक याच प्रकाराला बळी पडले आहेत? अशा अनेक प्रश्नांनी आता जोर धरला आहे. दरम्यान, संबंधित ग्राहकाने सर्व पुरावे एकत्रित करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, लवकरच पोलिसांत अधिकृत तक्रार दाखल होणार असल्याचे खात्रीलायक सूत्रांचे म्हणणे आहे.



### सराफा बाजारात दबक्या आवाजात चर्चा

या प्रकरणाची चर्चा अकोल्यातील सराफा बाजारात दबक्या आवाजात सुरू आहे. मात्र, कोणताही व्यापारी उघडपणे प्रतिक्रिया देण्यास पुढे येत नसल्याचे चित्र आहे.‘आज तो, उद्या आपण’ या भीतीमुळेच अनेकजण मौन बाळगत असल्याची कुजबूज ऐकायला मिळत आहे.

### “ ‘दुसरे सोने घ्या’ प्रस्तावामागचे गूढ काय?

प्रकरण चिघळू लागल्याचे लक्षात येताच संबंधित ज्वेलर्स संचालकाकडून ‘तेवढ्याच वजनाचे दुसरे सोने देण्याचा’ पर्याय पुढे करण्यात आला होता. मात्र, हा प्रस्ताव स्वतःमध्येच संशयास्पद असल्याचे जाणकारांचे मत आहे. कारण, जर मूळ सोने सुरक्षित असेल, तर दुसरे सोने देण्याची गरजच काय? यामुळेच मूळ गहाण ठेवलेले सोने अस्तित्वात नसल्याची शक्यता अधिक गडद होत आहे.

................

### “ व्याज नियमित, तरीही सोने गायब ; जबाबदार कोण?

ग्राहकाने तब्बल ११ महिने नियमित व्याज भरले असल्याची बाब या प्रकरणाला अधिकच गंभीर बनवते.

व्याज स्वीकारत राहून मूळ मालमत्ता परत न देणे हा थेट विश्वासघातच ठरतो, असे कायदेतज्ज्ञांचे मत आहे.

यामुळे, हे प्रकरण केवळ आर्थिक व्यवहारापुरते मर्यादित न राहता फसवणूक, अपहार आणि विश्वासघाताच्या गुन्ह्यांपर्यंत पोहोचण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १२३ ■ मंगळवार ३१ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# आदिवासी समाज नव्या तेजाने उभा; संधीचे सोने करा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मायाताई इवनाते यांचा नागरी सत्कार, नेतृत्वावर भरभरून कौतुक

**नागपूर जनमाध्यम :** मोठ्या प्रमाणावर संधी मिळाल्यामुळे आदिवासी समाज आता नव्या तेजाने उभा आहे. आता हा समाज मागे वळून पाहणार नाही, असे विधान आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



राज्यसभेच्या नवनिर्वाचित खासदार मायाताई इवनाते यांचा नागरी सत्कार डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित करण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, आमदार कृष्णा खोपडे, माजी आमदार देवराव होळी, माजी आमदार सुधाकरराव देशमुख, महापौर नीता ठाकरे यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थिती होती. मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले, अत्यंत सामान्य कुटुंबात जन्मलेल्या मायाताईंनी संघर्षातून आपली राजकीय कारकीर्द घडविली आहे. त्यांनी सामाजिक कार्यातून लोकांचा विश्वास संपादन केला आणि देशपातळीवर आदिवासी प्रश्न सोडवण्यात मोठे योगदान दिले. त्यामुळेच त्यांना राज्यसभेवर प्रतिनिधित्व मिळाले. हे आमच्यासाठी अभिमानाचे क्षण आहेत.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले, समाजात ज्ञानाचा प्रसार होणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाची परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. समाजाच्या विकासाच्या प्रवासात मायाताईंसारख्या नेतृत्वाकडेच दिशा पाहिली जाते. त्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाज शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी वाटचाल करेल. आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनीही समाजासाठी मायाताईंच्या कार्याचे कौतुक केले. मायाताई इवनाते यांनी सत्कारास उत्तर देताना सांगितले, हा सन्मान माझ्या सर्व आदिवासी बांधवांचा आहे. समाजासाठी अजून बरेच काम करायचे आहे. संसदेत आदिवासी प्रश्न मांडून त्यांच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणार आहे. देशाच्या बदलांमध्ये आदिवासी समाजाचा मोठा वाटा असेल. आदिवासी विकास युवा संघ, ट्रायबल इन्स्टिट्यूट अँड मल्टीपर्पज एज्युकेशन सोसायटी, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद, संयुक्त आदिवासी कृती समिती, आदिवासी उडान बहुउद्देशीय संस्था, इंडिजिनिअस ट्रायबल वुमेन फोरम या संघटनांच्या वतीने सत्कार करण्यात आला. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली, श्यामल देशमुख यांनी संचालन केले, तर महेंद्र उईके यांनी आभार मानले.

## ग्रामीण महिलांसाठी सायबर सुरक्षेचे धडे



### वर्धा पोलिसांचा जनजागृती उपक्रम

**वर्धा जनमाध्यम :** ग्रामीण भागातील किशोरवयीन मुली व महिलांना सायबर सुरक्षेबाबत जागरूक करण्यासाठी वर्धा पोलिसांच्या वतीने विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात आला. एकात्मिक बाल विकास सेवा योजना, वर्धा-२ (ग्रामीण) यांच्या सहकार्याने आर्वी रोड येथील मातोश्री सभागृहात प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिरात सहायक पोलिस निरीक्षक आशिष चीलांगे यांनी ऑनलाईन फसवणुकीच्या वाढत्या प्रकारांविषयी मार्गदर्शन केले. सोशल मीडियाचा वापर करताना सतर्कता बाळगणे, अनोळखी लिंकवर क्लिक न करणे तसेच वैयक्तिक माहिती शेअर करण्याचे टाळणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. बँक फ्रॉड तसेच फेसबुक व इन्स्टाग्रामच्या माध्यमातून होणाऱ्या फसवणुकीपासून कसे वाचावे, याबाबत त्यांनी सोप्या भाषेत माहिती दिली.

महिला पोलीस अंमलदार स्मिता महाजन यांनी महिलांचे कायदेशीर हक्क आणि सायबर सेलची कार्यपद्धती याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कोणत्याही प्रकारचा सायबर गुन्हा घडल्यास न घाबरता तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमात जेंडर, आरोग्य व कुटुंब नियोजनासह सायबर सुरक्षा हा विषय महिलांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला. ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने महिलांनी व किशोरवयीन मुलींनी सहभाग नोंदविला. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात सायबर साक्षरता वाढीस लागणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

००००००००

## वर्ध्यात एकतेचा उत्सव
## ११ जोडप्यांचा सामूहिक निकाह सोहळा

**वर्धा जनमाध्यम**

शहीद इमरान खान स्मृती सेवा बहुउद्देशीय शिक्षण व प्रशिक्षण संस्था, वर्धा यांच्या वतीने शहरात प्रथमच अजीमुशान इस्तेमाई निकाह (सामूहिक विवाह) सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात ११ जोडपी विवाहबंधनात अडकली. कार्यक्रमास अमर काळे यांनी उपस्थित राहून नवदाम्पत्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी बोलताना खासदार अमर काळे म्हणाले, सामूहिक विवाह ही सामाजिक समतेची जाणीव दृढ करणारी संकल्पना आहे. मुस्लीम समाजाने अशा उपक्रमाची सुरुवात केल्याचे स्वागतार्ह असून, यामुळे अनावश्यक खर्चाला आळा बसण्यास मदत होईल. हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या जोडप्यांचा निकाह धार्मिक विधींनुसार पार पडला. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते नवदाम्पत्यांचा सत्कार करण्यात आला.



### पहिल्याच उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद
### अमर काळे यांची उपस्थिती

समाजातील विविध घटकांनी पुढाकार घेत या सोहळ्याचे यशस्वी आयोजन केले.

यावेळी शेखर शेंडे, समीर देशमुख, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, किरण ठाकरे, मिलिंद भेंडे, फारुख शेख, शब्बीर अली, नवशाद अली, रिंकू शेख, डॉ. हमीद, हाजी अब्दुल हमीद, इकराम हुसेन, साबीर तुरक आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संयोजन अजीम तुरक यांनी केले. त्यांच्या प्रयत्नांचे मान्यवरांनी कौतुक केले. सामूहिक विवाहासारख्या उपक्रमातून समाजातील ऐक्य वृद्धिंगत होण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

### कामाच्या ठिकाणी निष्काळजीपणा जीवघेणा
## एमआयडीसीत कामगाराचा उंचावरून पडून मृत्यू

**वर्धा जनमाध्यम :** औद्योगिक वसाहतीतील सुरक्षेच्या प्रश्नांकडे होत असलेल्या दुर्लक्षाचे आणखी एक बळी समोर आले आहे. देवळी एमआयडीसीतील ट्रान्सरेल कंपनीत काम करत असताना उंचावरून पडून एका तरुण कामगाराचा मृत्यू झाला. सिकंदर अयाज खान (२९) असे मृताचे नाव असून, या घटनेने कामगारवर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर प्रदेशातील मुरादाबाद येथील रहिवासी असलेला सिकंदर रोजगारासाठी देवळीत वास्तव्यास होता. सोलार पॅनल बसविण्याचे काम सुरू असताना तो सुमारे २० फूट उंचीवरून खाली कोसळला. या भीषण अपघातात त्याच्या डोक्याला, छातीला व हाताला गंभीर दुखापत झाली.

घटनेनंतर सहकाऱ्यांनी त्याला तातडीने सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला.

या प्रकरणी देवळी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद घेतली असून, कामगारांच्या सुरक्षेबाबत पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## उकाड्याच्या तडाख्यात शाळा सुरू करण्याचा निर्णय वादात

### विदर्भातील शाळा १५ जूनपासून : शिक्षक समितीचा पुनर्विचाराचा आग्रह

**वर्धा जनमाध्यम :** विदर्भातील तीव्र उष्णतेच्या पार्श्वभूमीवर शाळा सुरू करण्याच्या तारखेबाबत पुन्हा एकदा वाद निर्माण झाला आहे. शिक्षण संचालनालयाने १५ जूनपासून शाळा सुरू करण्याचे आदेश दिल्यानंतर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने या निर्णयावर पुनर्विचार करण्याची मागणी केली आहे. २००७ पूर्वी विदर्भातील शाळांचे नवीन सत्र १ जुलैपासून सुरू होत होते. मात्र, २००७ मध्ये राज्य शासनाने १२ जूनपासून दुपारच्या सत्रात शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ८ जून २००७ रोजी दिलेल्या आदेशानुसार विदर्भातील शाळा दरवर्षी २६ जूनपासून सुरू करण्याचा निर्णय लागू करण्यात आला. हा न्यायालयीन आदेश अद्याप कायम असतानाही नवीन आदेश काढण्यात आल्याने शिक्षकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

जून महिन्यात विदर्भात असह्य उकाडा असतो. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो, अशी भीती शिक्षक समितीने व्यक्त केली आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशानुसारच शाळा सुरू करण्याचा निर्णय कायम ठेवावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, विदर्भात शाळा उशिरा सुरू झाल्या तरी दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये कपात करून शैक्षणिक दिवसांची भरपाई केली जाते. त्यामुळे अभ्यासक्रमावर कोणताही परिणाम होत नसल्याचे समितीने स्पष्ट केले. या संदर्भात समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे यांनी शिक्षण संचालनालयाकडे पत्र पाठवून निर्णयात बदल करण्याची विनंती केली असून, संबंधित मंत्र्यांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनाही याची प्रत पाठवण्यात आली आहे.


## रेहकी व पवनार येथे शेतकऱ्यांसाठी निःशुल्क प्रशिक्षण शिबिर

**वर्धा जनमाध्यम :** शेतकऱ्यांना आधुनिक फलोत्पादन तंत्रज्ञानाची जोड देत उत्पन्नवाढीस चालना देण्यासाठी कृषी विभागामार्फत एकात्मिक फलोत्पादन विकास योजनेंतर्गत सेलू तालुक्यातील रेहकी येथे ६ एप्रिल व पवनार येथे ७ एप्रिल रोजी निशुल्क प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

शिबिरात शेतकऱ्यांना नाविन्यपूर्ण पिकपद्धती, बाजाराभिमुख शेती व शासकीय योजनांचा प्रभावी लाभ कसा घ्यावा. एकात्मिक फलोत्पादन विकास योजनेंतर्गत फुलशेती, मिरची, हळद, अद्रक, स्ट्रॉबेरी व ड्रॅगन फ्रूट लागवड यांस प्रोत्साहन देण्यात येत असून, महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ४० टक्क्यांपर्यंत अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना प्रत्यक्ष तांत्रिक ज्ञान मिळावे व योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी तालुकास्तरीय निःशुल्क प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

## वर्ध्यात अवेळी पावसाची एंट्री
## बाजारपेठा बंद होण्यापूर्वीच हजेरी

**वर्धा जनमाध्यम :** उष्णतेने हैराण झालेल्या वर्धेकरांना सोमवारी रात्री अचानक आलेल्या पावसाने दिलासा तर दिला, मात्र काही काळ गोंधळाची स्थितीही निर्माण केली. विशेष म्हणजे बाजारपेठा बंद होण्यापूर्वीच पावसाने हजेरी लावल्याने व्यापारी व ग्राहकांची एकच धावपळ उडाली.




रात्री सुमारे नऊ वाजताच्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पावसाने शहरात अचानक आगमन केले. अचानक सुरू झालेल्या या पावसामुळे रस्त्यावर असलेल्या नागरिकांनी आसरा शोधण्यासाठी धाव घेतली. अनेक ठिकाणी दुकानदारांनी घाईघाईने दुकाने बंद करण्याची लगबग सुरू केली.

सुमारे अर्धा तास जोरदार पाऊस कोसळल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला. उकाड्याने त्रस्त नागरिकांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला,

मात्र अवेळी आलेल्या या पावसामुळे बाजारपेठांमध्ये काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

## पेट्रोल पंपासमोर मोटरसायकलला आग
### कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेने मोठी दुर्घटना टळली

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील वाढत्या उष्णतेचा परिणाम धोकादायक स्वरूपात समोर आला असून पेट्रोल पंपासमोर मोटरसायकलला अचानक आग लागल्याची घटना सोमवारी रात्री ८ च्या सुमारास घडली. सुदैवाने वेळीच उपाययोजना करण्यात आल्याने मोठी दुर्घटना टळली.



मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील सेवाग्राम मार्गावरील एका पेट्रोल पंपावर ही घटना घडली. मोटरसायकल चालकाने पेट्रोल भरल्यानंतर पंपाबाहेर निघत असतानाच अचानक गाडीने पेट घेतला. काही क्षणांतच आगीने जोर धरला आणि परिसरात घबराट पसरली.

प्राथमिक अंदाजानुसार, मोटरसायकलच्या पेट्रोल टँकमधील नळी लीक असल्यामुळे पेट्रोल गळत होते. वाढलेल्या तापमानामुळे त्याला आग लागल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेनंतर काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

दरम्यान, पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत तत्काळ अग्निशमन यंत्राचा वापर करून आग आटोक्यात आणली. त्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती आहे.

## जाहीर नोटीस

माझेपक्षकार सौ. ज्योती प्रविण पाटील या मौजा :- देवळी, ता. देवळी, जि. वर्धा येथील मालमत्तेच्या मालक आहेत. सदर मालमत्ता नगर परिषद देवळी हद्दीत येत असून विभाग क्र. १.१७, फील्ड सर्व्हे क्र. नवीन ३१२, जुना १४९/२, प्लॉट क्र. ३० च्या पश्चिम बाजूस, क्षेत्रफळ ७५.०० चौ. मी. (म्हणजे ८०७.०० चौ. फूट) आहे.

**सदर मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणे आहेत:**
**पूर्व: प्लॉट क्र. ३० चा उर्वरित भाग**
**पश्चिम: लेआउट रोड ९ मी.**
**उत्तर: प्लॉट क्र. २९**
**दक्षिण: लेआउट रोड ९ मी.**

श्री. विनोद बळीरामजी तराळे व श्री. नंदकिशोर लक्ष्मणराव मोहिटे यांनी प्लॉट क्र. ३० च्या पश्चिम बाजूस असलेला ७५.०० चौ. मी. (८०७.०० चौ. फूट) क्षेत्रफळाचा भाग दिनांक ०७/०३/२०१९ रोजी दस्त क्र. ७६५/२०१९ अन्वये उपनिबंधक कार्यालय देवळी येथे, विक्रीखताद्वारे सौ. ज्योती प्रविण पाटील यांच्या नावे विकला आहे. सदर व्यवहाराची रक्कम विक्रीखतात नमूद केल्याप्रमाणे अदा करण्यात आली असून त्यानुसार मुद्रांक शुल्क भरलेले आहे.त्यानंतर दिनांक १६/१२/२०२० रोजी दस्त क्र. २४६७/२०२० अन्वये श्री. विनोद बळीरामजी तराळे व श्री. नंदकिशोर लक्ष्मणराव मोहिटे यांनी मालमत्तेची लांबी व रुंदी दुरुस्ती करण्यासाठी दुरुस्तीखत सौ. ज्योती प्रविण पाटील यांच्या नावे केले आहे.

माझ्या ग्राहकांचे खालील मूळ लिंक विक्रीखत हरवलेले आहेत:

दिनांक ३०/०५/२०१३, दस्त क्र. १७०६/२०१३

दिनांक २१/०५/२०१०, दस्त क्र. १०६९/२०१०, दिनांक ०६/०६/२००९, दस्त क्र. १०४१ ॲन्ड , दस्त क्र. ३८९/१९९० date २६/१२/१९९०

माझ्या ग्राहकांनी Tata Capital Housing Finance Ltd. येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

म्हणून सर्व जनतेस कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा सदर मूळ लिंक विक्रीखत कोणास सापडल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

**ॲड आर.आर.तिवारी**
**रामनगर, वर्धा.**
**मो.९९२२४२६१६८**

## शेतात मजुराची हत्या; मृतदेह रस्त्यावर फेकला
## पोलिसांनी २ तासांत आरोपीला पकडले

**कारंजा (घा.) जनमाध्यम –** धामकुंड परिसरात शनिवारी रात्री एक थरारक घटना घडली. स्थानिक शेतकऱ्याने आपल्या शेतातच मजुराची हत्या करून मृतदेह रस्त्यावर फेकला. पोलिसांनी अवघ्या दोन तासांत या प्रकरणाचा पर्दाफाश करून आरोपीला ताब्यात घेत, त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

संजय गोविंद जाधव (वय ४५, रा. धामकुंड) हे मागील ५ वर्षांपासून मंगेश तायवाडे यांच्या शेतावर सालगड्याच्या कामासाठी काम करत होते. शनिवारी संजय शेतातून घरी गेले, मात्र रात्री शेतात भांडण सुरू झाले. मंगेशने संजयवर 'तू आज शेतात काम का केले नाही?' असे म्हणत मारहाण केली. या हिंसाचारात संजयचा मृत्यू झाला.

भांडणानंतर आरोपीने खुनाचा पुरावा लपवण्यासाठी संजयचा मृतदेह स्वतःच्या वाहनात टाकून धामकुंड-गारपीट रस्त्यावर कवडू चव्हाण यांच्या शेताजवळ फेकला. आरोपीने सुरुवातीला पोलिसांना सांगितले की या प्रकरणाशी त्याचा काही संबंध नाही. मात्र तपासात पोलिसांना सत्य समोर आले.

मंगेश तायवाडे यांनी पोलिसांना गारपीट ते धामकुंड रस्त्यावर पुरुषाचा मृतदेह पडल्याची माहिती दिली. घटनास्थळी पोलिसांनी पाहणी केली असता मृतदेह संजय जाधव यांचा असल्याचे समोर आले. पोलिसांनी अवघ्या दोन तासांत तपास करून आरोपी मंगेश तायवाडे याला ताब्यात घेतले आणि त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

या प्रकरणातील आरोपीला अटक करण्यात आली असून, ठाणेदार प्रल्हाद मदन, उपनिरीक्षक सतीश जयभाये, नितेश मैदपवार, प्रवीण चोरे, मंगेश मिलके, आशिष कालोकार, दिनेश घसाड, संदीप कावरे, वैभव गावंडे आणि वृषाली कोडापे यांनी हा तपास पूर्ण केला.

स्थानिक नागरिक आणि शेतकरी या घटनेने हादरले असून, हा प्रकार एका छोट्या वादातून झालेल्या हत्येचा दाखला ठरतो. पोलिसांनी नागरिकांना शेताजवळ सावध राहण्याचे आवाहन केले आहे.

### वादानंतर मारहाण; हत्या झाली

संजय जाधव व मंगेश तायवाडे यांच्यात शनिवारी रात्री शेतात भांडण झाले. मारहाणीत संजयचा मृत्यू झाला, तर आरोपीने मृतदेह रस्त्यावर फेकून खुनाचा पुरावा लपवला.

## दाम दुप्पट योजनेच्या आमिषाने कोटींची फसवणूक; गुंतवणूकदारांना पोलिसांचे आवाहन

**हिंगणघाट जनमाध्यम :** जास्त व्याजदराचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला असून निरज अर्बन को-ऑप. निधी लि., अमरावती शाखा टिळक चौक, हिंगणघाट येथील प्रकरणात सुमारे एक कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी हिंगणघाट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित संस्थेमध्ये नागरिकांनी बचत ठेव, दैनिक ठेव, मुदत ठेव तसेच एफडी खात्यांद्वारे मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली होती. जास्त परताव्याच्या अपेक्षेने अनेकांनी आपली रक्कम जमा केली. मात्र, संस्थेच्या संचालक मंडळाने ही रक्कम परत न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरल्याचा आरोप आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून अप.क्र. ०११३/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ३१६(५), ३१८(४), ३(५) तसेच एमपीआयडी कायद्याअंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरू आहे.

## उमादेवी नायडू यांचे निधन



**वर्धा, दि. ३० :** शहरातील सिव्हिल लाईन्स परिसरात राहणाऱ्या श्रीमती उमादेवी नायडू (वय ८०) यांचे हैदराबाद येथे रविवारी रात्री दुःखद निधन झाले. त्या वर्धा नगरपालिकेचे माजी अध्यक्ष कै. नीळकंठराव नायडू यांच्या धर्मपत्नी होत. त्यांच्या पश्चात मुलगा राहुल नायडू तसेच तीन विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर दि. ३० मार्च रोजी हैदराबाद येथे अंत्यसंस्कार करण्यात आले,

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## महिला व बालकांच्या पोषणात मोठी सुधारणा करण्याचे लक्ष्य- मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील कुपोषणावर प्रभावी नियंत्रण मिळवून महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाउल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन ांच्यात पाच वर्षांचा सामंजस्य करार करण्यात आला असून, या भागीदारीमुळे मातृ व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्ह्ज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMV) सारख्या थेट लाभहस्तांतरण योजनांचा लाभअधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये सघन अंमलबजावणी करण्यात येणार असून, राज्यस्तरावरही तांत्रिक साहाय्य दिले जाणार आहे. तसेच, CIFF कडून पोषण व सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची नियुक्ती करून प्रभावी जनजागृती आणि संदेशवहनाला चालना दिली जाणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातील पहिल्या १००० दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे.

## 'शिवशाही पुनर्वसन' प्रकल्पाला बळकटी -उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी :** बाळासाहेब ठाकरे यांनी ज्या उद्देशाने शिवशाही पुनर्वसन प्रकल्पाची स्थापना केली होती, तोच वारसा पुढे नेत झोपडपट्टीमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न आम्ही पूर्ण करणार आहोत. पारदर्शकता आणि वेग ह्याला आमची प्राथमिकता असून प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी आता खासगी विकासक आणि शिवशाही पुनर्वसन प्रकल्प यांच्यात 'विशेष संयुक्त उपक्रम' (एसपीव्ही) तयार करण्यास मान्यता देण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.नंदनवन बंगला येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली शिवशाही पुनवर्सन प्रकल्पाच्या संचालक मंडळाची बैठक झाली. त्यावेळी बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, शिवशाही प्रकल्पाचे व्यवस्थापकीय संचालक कुणाल कुमार, महाव्यवस्थापक अशोक नाईकवडे आदी उपस्थित होते.यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, मुंबईसह राज्यातील झोपडपट्टी पुनर्वसन प्रक्रियेला वेग देण्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण पाउल उचलले आहे. दिवंगत शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून 'शिवशाही पुनर्वसन प्रकल्पा'ला बळकटी देण्याचा निर्णय घेतला आहे.एसपीव्ही मुळे पुनर्वसनाचे प्रकल्प खासगी क्षेत्रातील कौशल्याच्या मदतीने जलदगतीने पूर्ण होउ शकतील. त्याचबरोबर रखडलेले पुनर्वसन प्रश्न मार्गी लावून सर्वसामान्यांना हक्काची घरे देतानाच शिवशाही प्रकल्प कंपनीने एमएमआरडीए, एसआरए, म्हाडा, सिडको, मुंबई महापालिका, ठाणे पालिका यासारख्या शासकीय संस्थांच्या माध्यमातून रखडलेल्या प्रकल्पांना वेग द्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

# माओवादाविरूध्द लढा दिलेल्या सी-60 जवानांना राज्य शासनामार्फत विशेष 'सी-60 पदक' देण्यात येणार-मुख्यमंत्री





**मुंबई/प्रतिनिधी :** माओवादाविरोधातील लढ्यात महाराष्ट्र पोलिसांनी निर्णायक यश मिळविले आहे. आता माओवादाची चळवळ राज्यात नगण्य पातळीवर आली आहे. त्यामुळे किमान तीन वर्षे सी-६० मध्ये सेवा बजावणा-या जवानांना राज्य शासनामार्फत विशेष सी-६० पदक देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पोलीस महासंचालक कार्यालयात वरिष्ठ पोलीस अधिका-यांची अर्धवार्षिक परिषद झाली. या परिषदेस गृह राज्यमंत्री (ग्रामीण) पंकज भोयर, गृह राज्यमंत्री (शहरे) योगेश कदम, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, पोलीस महासंचालक सदानंद दाते तसेच भारतीय पोलिस प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

गडचिरोलीसारख्या भागात आता विकासाचे नवे चित्र उभे राहत असून लोकशाहीची मुळे बळकट होत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, माओवादाची चळवळ राज्यात नगण्य पातळीवर आली असून आता तिच्या पुनरुज्जीवनाला आळा घालणे हे पुढील मोठे आव्हान आहे. या संघर्षात २४४ पोलीस कर्मचारी शहीद झाले, तर ६०९ नागरिकांनी प्राण गमावले आहे.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलीस यंत्रणेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर भर देत, गुन्हे अन्वेषण आणि न्यायप्रक्रियेत एंड टू एंड डिजिटायझेशन आवश्यक असल्याचे सांगितले. विविध अन्वेषण आणि क्राईम माडेल्सचा समन्वय साधून संपूर्ण क्रिमिनल जस्टिस सिस्टीम डिजिटल करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. डिटेक्शनपासून एव्हिडन्स संकलन, चार्जशीट दाखल करणे यांसह सर्व प्रक्रिया शंभर टक्के डिजिटल झाल्यास पुराव्यांची अचूकता आणि साखळी अधिक मजबूत होईल, असे त्यांनी सांगितले. तसेच, नवी मुंबईत राबविण्यात आलेल्या ब्लाकचेन-आधारित एव्हिडन्स मॅनेजमेंट सिस्टीमप्रमाणे प्रणाली राज्यभर लागू केल्यास पुराव्यातील छेडछाड रोखता येईल, असा सांगून पुढील सहा महिन्यांत सर्व पोलीस ठाण्यांमध्ये ही प्रणाली लागू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

दोषारोप सिद्ध होण्याचे प्रमाण (कन्व्हिक्शन रेट) वाढवण्यास अपयशी ठरलेल्या प्रकरणांचे विश्लेषण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी सीआयडीला दिले. राज्यातील गंभीर गुन्ह्यांमध्ये दोषारोप दर वाढवण्यासाठी ठोस कार्यपद्धती (एसओपी) आणि स्पष्ट रोडमॅप तयार करावा असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. त्याचबरोबर पोलीस आणि सरकारी वकिलांच्या कामगिरीचे स्वतंत्र मूल्यमापन करणारा डॅशबोर्ड विकसित करण्यावर त्यांनी भर दिला. रस्ते अपघातांबाबत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले नागपूर आणि मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील प्रयोगांमुळे अपघातात घट झाली आहे. त्यामुळे योग्य तंत्रज्ञान आणि रणनीती वापरून मृत्यूदर कमी करण्यावर भर देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सायबर सुरक्षेबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्मशी अधिक प्रभावी समन्वयाची गरज व्यक्त केली. आक्षेपार्ह किंवा धोकादायक मजकूर हटवण्यासाठी विलंब टाळण्यासाठी ठोस यंत्रणा उभारण्याचे निर्देश त्यांनी दिले. सायबर स्पेसमध्ये वाढणा-या रॅडिकलायझेशनकडे लक्ष वेधत, यावर प्रोक्टिव्ह उपाययोजना करण्याचे निर्देशही त्यांनी पोलीस यंत्रणांना केले. पोलीस दलातील अंतर्गत संवादावर भर देताना, वरिष्ठ अधिका-यांनी कनिष्ठांशी थेट संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. नेतृत्व म्हणजे लोकांना प्रेरणा देणे असे नमूद करत, अधिका-यांनी स्वतःच्या वर्तनातून आदर्श निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर, प्रत्येक अधिका-यांने जनतेशी संवाद साधण्यावर भर देण्याच्याही सूचनाही त्यांनी केल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी गुन्हेगारीविरोधात झिरो टालरन्स धोरण कठोरपणे राबवण्याचे निर्देश पोलीस अधिका-यांना दिले. ड्रग्ससंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ही समस्या पुढील पिढीला पंगू करणारी आहे, अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करून पूर्णतः आळा घालण्याचे आदेश त्यांनी दिले. बेकायदेशीर कृत्यांकडे कोणत्याही परिस्थितीत दुर्लक्ष सहन केले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.मागील काळात फारेन्सिक कामांच्या प्रलंबित प्रकरणात पोलीस प्रशासनाने ठोस उपाययोजना राबवत ही पेंडन्सी लक्षणीयरित्या कमी करण्यात यश मिळवले आहे. पूर्वी २ ते ३ लाखांपर्यंत प्रकरणे प्रलंबित राहत होती, ती आता मोठ्या प्रमाणात घटली असून ही समाधानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. पुढील काळात सर्व प्रलंबित प्रकरणे पूर्णपणे निकाली काढून फारेन्सिक कामकाज रिअल-टाइम पद्धतीने करण्याचे उद्दिष्ट ठेवण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. पोलीस दलात चांगले काम करणा-या अधिका-यांना प्रोत्साहन देण्यासाठी दरमहा पुरस्कार योजना सुरू करण्याची सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलीस महासंचालकांना केली. तसेच अपेक्षित कामगिरी न करणा-यांना योग्य मार्गदर्शन देण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

# माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला 1 एप्रिलपासून प्रारंभ

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या पुढाकाराने राबविण्यात येणा-या या राज्यव्यापी अभियानाला १ एप्रिलपासून प्रारंभ होत आहे.

हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या अभियानाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर, हे आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये फक्त आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते होउ नयेत यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पोषण यासारख्या मूलभूत घटकांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. संसर्गजन्य आजारांसोबतच बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे असंसर्गजन्य आजार, माता-बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यासारख्या विषयांनाही या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. या अभियानात ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणा सक्रियपणे सहभागी होणार आहेत. गावागावात स्वच्छतेचा आणि आरोग्याचा जागर करून आरोग्यदायी गाव ही संकल्पना राबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे.

**सुदृढ गावांना मिळणार आरोग्यसंपन्न गाव किताब**

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य स्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत तीन टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती ही अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे. तर आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखालील कृती समिती प्रत्यक्ष कामाचे नियोजन करणार आहे. त्याचबरोबर गाव पातळीवर आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट निकष ठरवण्यात आले आहेत. या निकषांच्या आधारे ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणा-या गावांना आरोग्यसंपन्न गाव म्हणून गौरविण्यात येणार आहे. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रकमेचा पुरस्कार देउन प्रोत्साहित केले जाणार आहे. या संपूर्ण अभियानासाठी राज्य सरकारने ८०.७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणा-या जिल्हा परिषद, पंचायत समिती, गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना कोट्यवधी रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

**२ ते ५ कोटींचे पुरस्कार**

राज्य स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करीत पहिला क्रमांक मिळवणा-या जिल्हा परिषदेला ५ कोटी रुपये, दुस-या क्रमांकाला ३ कोटी रुपये आणि तिस-या क्रमांकासाठी २ कोटी रुपये दिले जाणार आहेत. जिल्हा परिषदेनंतर पंचायत समिती स्तरावरही प्रोत्साहनासाठी मोठ्या रक्कमेची तरतूद आहे. ज्यामध्ये पहिल्या क्रमांकाला २ कोटी, दुस-या क्रमांकाला १.५ कोटी रुपये आणि तिस-या क्रमांकाला १.२५ कोटी रुपये दिले जाणार आहेत.

राज्य स्तरावर सर्वोत्तम ठरणा-या ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयांना ७५ लाख रुपयांचा विशेष पुरस्कार दिला जाणार आहे. उपआरोग्य केंद्रांना पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा आणि राज्यस्तरासाठी अनुक्रमे ५ लाख आणि २५ लाख रुपये दिले जाणार आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हा स्तरावर १० लाख आणि राज्य स्तरावर ५० लाखांचा पुरस्कार दिला जाणार आहे. त्याचबरोबर गावांनाही पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा, विभाग राज्य स्तरासाठी अनुक्रमे २५ लाख, १ कोटी आणि ५ कोटी रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. हे अभियान दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधीत राबवले जाणार असल्याने, प्रत्येक वर्षी गावांना आपली कामगिरी सुधारण्याची आणि पुरस्कार मिळवण्याची संधी मिळणार आहे.

# एप्रिल 2026 मध्ये 'विशेष डिजिटल शेती शाळा'

**मुंबई/प्रतिनिधी :**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प आणि पानी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल २०२६ महिन्यात चार विशेष डिजिटल शेती शाळा आयोजित करण्यात येत आहेत.राज्यातील कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागातील तज्ञ आणि प्रगतशील शेतकरी यांचा यामध्ये सहभाग असून १ ते २२ एप्रिल २०२६ दरम्यान विशेष डिजिटल शेतीशाळेचे आयोजन करण्यात आले आहे या शेतीशाळांचा सर्व शेतक-यांनी लाभ घ्यावा असे आवाहन कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले आहे. विशेष डिजिटल शेतीशाळांचे वेळापत्रक व विषय :- शेतीशाळा १ (१ एप्रिल २०२६) : पेरणीपूर्व तंत्रज्ञान - बेड तयार करणे व बेडवर टोकण करणे, शून्य/कमीत कमी मशागत करणे , आंतरपीक पद्धत, बियाणे उगवण क्षमता तपासणी आणि बीजप्रक्रिया, शेतीशाळा २ (८ एप्रिल २०२६): जैविक व नैसर्गिक निविष्ठा उत्पादन- बीजामृत, जीवामृत, लिंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, ट्रायकोडर्मा तयार करण्याच्या पद्धती व फायदे, शेतीशाळा ३ (१५ एप्रिल २०२६): एकात्मिक कीड व्यवस्थापन- सापळा पिके, पक्षी थांबे, चिकट सापळे, मित्र किटकांचे संवर्धन, लिंबोळी आणि दशपर्णी अर्काचा वापर, शेतीशाळा ४ (२२ एप्रिल २०२६) : भात शेतीसाठी सुधारित लागवड तंत्र-भाताची थेट पेरणी (डीएसआर), श्री पद्धत आणि भात लावणीसाठी यांत्रिकी पद्धत. सर्व शेतीशाळा वर नमूद तारखांना

**राज्यातील सर्व शेतक-यांना सहभागी होण्याचे आवाहन**
**■ कृषीमंत्री दतात्रय भरणे**

सायंकाळी ७.३० वाजता सुरु होणार असून या शेती शाळांचे लाइव्ह प्रसारण कृषी विभाग, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, पाणी फाउंडेशन आणि उमेद च्या यू-ट्यूब चॅनेलवर केले जाणार आहे.हवामानातील वाढती अनिश्चितता, पावसाचा खंड आणि नैसर्गिक आपत्तींमुळे पारंपरिक कोरडवाहू शेती संकटात सापडली असून उत्पादन खर्च वाढत आहे. यावर मात करण्यासाठी कृषी विभागांतर्गत नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत महाराष्ट्र राज्याकरिता 'हवामान अनुकूल तंत्रज्ञान अभियान' सुरू करण्यात आले. हे अभियान शेतीचा उत्पादन खर्च कमी करणे आणि प्रतिकूल परिस्थितीतही शेतक-यांच्या उत्पन्नाची हमी देणे या उद्देशाने राबविण्यात येत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी कृषी विभागाबरोबरच, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्रे, उमेद, माविम, पशुसंवर्धन विभाग इ. यंत्रणादेखील सहभागी होत आहेत. या अभियानाचा एक टप्पा म्हणजे हवामान अनुकूल तंत्रज्ञानावर आधारित विशेष डिजिटल शेतीशाळांचे आयोजन आहे. राज्यातील सर्व प्रकारच्या पिक पद्धतींना उपयुक्त असणा-या तंत्रांची माहिती एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विद्यापीठे आणि कृषी विभागातील तज्ञ आणि प्रगतशील शेतकरी यांचेमार्फत या डिजिटल शेतीशाळामध्ये ज्ञानाचे आदान प्रदान होणार आहे. शेतकरी, महिला गट, शेतकरी उत्पादक कंपन्यांचे सदस्य, कृषी मंडळे, बिजोत्पादक, फार्मर कप स्पर्धेत भाग घेउ इच्छिणारे निमंत्रक व शेतकरी गट, वनपट्टे धारक या सर्वांनी मोठ्या संख्येने डिजिटल शेती शाळांना जाईन व्हावे असे आवाहन कृषी विभाग आणि नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पामार्फत करण्यात येत आहे.

# आता नव्याने झोपड्या निर्माण होउ नये म्हणून 'नेत्रम' ठेवणार लक्ष-एकनाथ शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबई शहर झोपडपट्टीमुक्त करण्याच्या उद्देशाने हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानाची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. एकीकडे झोपडपट्टी पुनर्विकासाला गती देत दुसरीकडे नेत्रम तंत्रज्ञानाच्या मदतीने नव्या झोपड्या उभारल्या जाउ नये याची पण काळजी घेतली जाणार आहे. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त हे महत्वाचे अभियान



राबवून एकप्रकारे बाळासाहेबांना ही आदरांजलीच वाहिली आहे असेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.राज्य शासनाच्या या निर्णयामुळे मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास प्रक्रियेला मोठी चालना मिळणार असून, नागरिकांना अधिक सुसज्ज आणि सुरक्षित घरे उपलब्ध होण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या अभियानाच्या माध्यमातून बाळासाहेब ठाकरे यांच्या स्वप्नातील झोपडपट्टीमुक्त मुंबई साकार करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

**समूह पुनर्विकासाला गती-**या अभियानात किमान ५० एकरपेक्षा जास्त क्षेत्र आणि ५१ टक्क्यांपेक्षा अधिक झोपडपट्टी क्षेत्र असलेल्या समूहांचा समावेश करण्यात येणार आहे. प्रामुख्याने खासगी, सरकारी, निम सरकारी मोठ्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्प राबविण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणात स्लम क्लस्टर रिडेव्हलपमेंट स्कीम राबविण्यात येईल. यासाठी झोपडपट्टी क्षेत्राची मोजणी करून बायोमेट्रिक सर्वेक्षण केले जाईल. त्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए, महाप्रित यांसारख्या संस्थांसोबत सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

**३०० चौ.फुटाच्या सदनिका-**झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पूर्वी लहान क्षेत्रफळाच्या सदनिकाधारकांना मोठ्या घरांचा लाभ देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी १८०, २२५ व २६९ चौ.फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्यात येत होत्या. मात्र, आता प्रचलित धोरणानुसार ३०० चौ.फूट क्षेत्रफळाच्या सदनिका देण्याचे निश्चित करण्यात आले आहे. यासाठी जुन्या प्रकल्पांचे उन्नतीकरण करून पुनर्विकास करण्यात येणार आहे.

**नवीन झोपडपट्ट्या निर्माण होणार नाहीत-** या महाअभियानात नेत्रम तंत्रज्ञानाचाही मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येणार आहे. नेत्रमद्वारे उपग्रह डेटा, जीआयएस प्रणाली आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन झोपडपट्ट्या निर्माण होउ दिल्या जाणार नाहीत. उच्च दर्जाच्या उपग्रह प्रतिमांच्या साहाय्याने नव्याने उभारल्या जाणा-या झोपड्यांचे निरीक्षण केले जाणार आहे. या अनुषंगाने बिसाग-एन (बीआयएसएजी-एन) या संस्थेच्या वेब-पोर्टलद्वारे झोपडपट्ट्यांची अचूक माहिती मिळवून संबंधित यंत्रणांना पाठविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने स्वतंत्र अंमलबजावणी कक्ष स्थापन केला असून, बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा तसेच जिल्हाधिकारी कार्यालयांनाही स्वतंत्र यंत्रणा उभारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. दर चार महिन्यांनी (वर्षातून तीन वेळा) उपग्रह प्रतिमा प्राप्त करून त्यांचे विश्लेषण करण्यात येणार असून, नव्याने निर्माण होणा-या झोपड्यांवर तात्काळ कारवाई करण्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवण्यात येणार आहे. संबंधित प्राधिकरणांनी त्यांच्या मालकीच्या तसेच खासगी जमिनींवर प्रत्यक्ष पाहणी करून अनधिकृत झोपड्यांचे निष्कासन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांमध्ये आता उंच इमारती बांधण्यात येणार असल्याने सध्याचे देखभाल शुल्क त्यामानाने अत्यल्प आहे. देखभाल शुल्कातही सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सध्या प्रति सदनिकाधारक ४० हजार रुपये असलेले देखभाल शुल्क अपुरे ठरत असल्याने इमारतींच्या उंचीनुसार शुल्क निश्चित करण्यात येणार आहे. ७० मीटरपर्यंतच्या इमारतींसाठी १ लाख रुपये, ७० ते १२० मीटरपर्यंत २ लाख रुपये आणि १२० मीटरपेक्षा जास्त उंच इमारतींसाठी ३ लाख रुपये देखभाल शुल्क आकारण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ मध्ये सुधारणा करण्याची प्रक्रिया झाली आहे

# इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचे काम २०२७ पर्यंत पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील





## विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबईतील इंदू मिल येथे उभारण्यात येणा-या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य आंतरराष्ट्रीय स्मारकाचे काम २०२७ पर्यंत पूर्ण करण्यासाठी राज्य शासन पूर्णपणे प्रयत्नशील आहे असे महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी सांगितले. विधानसभा उपाध्यक्ष बनसोडे हे दोन दिवसांच्या दिल्ली दौ-यावर आहेत. यावेळी त्यांनी गाझियाबाद येथील प्रख्यात शिल्पकार राम सुतार यांच्या कार्यशाळेला भेट दिली. इंदू मिल स्मारकासाठी तयार होत असलेल्या पुतळ्याच्या कामाची सविस्तर पाहणी केली आणि कामाच्या सद्यस्थितीचा सखोल आढावा घेतला.

पाहणीनंतर महाराष्ट्र सदन येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी प्रकल्पाच्या सद्यस्थितीवर सविस्तर माहिती दिली. स्मारकासाठी आवश्यक असणा-या मुख्य धातूंच्या जागतिक दरात झालेल्या वृद्धीमुळे प्रकल्पाच्या मूळ निविदा दरांमध्ये आणि सध्याच्या वास्तविक खर्चामध्ये तफावत निर्माण झाली आहे. या अनपेक्षित दरवाढीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी अतिरिक्त निधीची तातडीने तरतूद करणे आवश्यक आहे.या वाढीव निधीसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची भेट घेउन सविस्तर चर्चा केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. एमएमआरडीएमार्फत संबंधिताना वेळेत निधी उपलब्ध करून देण्याची विनंती शासन स्तरावर केली जाईल असेही बनसोडे यांनी यावेळी सांगितले.

स्मारकाच्या प्रगतीबाबत त्यांनी सांगितले की, इंदू मिल येथे ३५० फूट उंचीचा भव्य पुतळा उभारण्यात येत असून, त्यापैकी साधारण ५० फूट उंचीचे काम (बूट आणि पँटचा भाग) पूर्ण झाले आहे. उर्वरित सुटे भाग तयार करण्याचे व ते जोडण्याचे काम शिल्पकार अनिल सुतार यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करून युद्धपातळीवर सुरू आहे. २०२७ पर्यंत हे स्मारक पूर्ण करून अनुयायांसाठी खुले करण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत. हे स्मारक जागतिक स्तरावर एक महान श्रद्धास्थान आणि प्रेरणास्थळ ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## महावीर जयंतीनिमित्त राज्यपालांच्या शुभेच्छा



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. महावीर जयंती, तीर्थंकर भगवान महावीरांचे जीवन कार्य तसेच त्यांच्या अहिंसा, त्याग, क्षमा, जीवदया व अनेकांतवादाच्या शिकवणीचे स्मरण करून देते. त्यांच्या आदर्श विचारांचा प्रभाव आजही भारतीय जनमानसावर दिसून येतो. भगवान महावीरांचे विचार आज सर्वाधिक प्रासंगिक आहेत. महावीर जयंती निमित्त सर्वांना शुभेच्छा देतो, असे राज्यपालांनी आपल्या संदेशात म्हटले आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## युध्दाच्या सावल्या

इराण-अमेरिका-इस्त्रायल यांच्यातील युद्धाला एक महिन्याच्यावर कालावधी लोटला आहे. ही स्थिती अधिकाधिक बिकट होत चालली आहे. भारताबरोबरच सारे देश यात होरपळत आहेत. एकापेक्षा एक अस्वस्थ करणाऱ्या बातम्या समारे येत असल्याने, युद्ध समाप्तीची आशा धुसर होत चालली आहे. ट्रम्प यांनी केलेल्या वल्गना पुरत्या निकालात निघाल्या. त्यांचे मित्र इस्त्रायलचे नेतान्याहू यांनाही आता वास्तवाची जाणीव झाली असणार. कारण प्रश्न तेल आणि पेट्रोलचा आहे. संपूर्ण जगात गॅस सिलिंडरच्या टंचाईने लोक हवालदिल झाले. पाईप गॅसची अवस्थाही आणखी काही दिवसांनी अशीच होणार आहे. या परिस्थितीला अमेरिकेचा दर्प आणि तीव्र स्वरूपाची ट्रम्प यांची हम करे सो कायदा ही वृत्ती आहे. तसेच इराणचे दहशतवाद्यांना पोसणे आणि त्यांना इतर राष्ट्रांविरुद्ध भडकवण्याचे धोरण हे कारणीभूत आहे.पण आता जी बातमी आली आहे ती जास्तच अस्वस्थ करणारी आहे, ती म्हणजे हाऊतीने युद्धात उडी घेतल्यामुळे जहाजांची ये-जा आणखीच अवघड होणार आहे. तांबड्या समुद्रातून जी जहाजे वाहतूक करतात त्यांना इराणने होर्मुझबरोबरच बाब-अल-मंदेवही बंद केले. त्यामुळे आता जहाजांना केप ऑफ गुड होप या मार्गाने आपली जहाजे आणावी लागतील आणि त्यासाठी प्रचंड वेळ जातो आणि खूप खर्चही येतो. हाऊती बंडखोरानी २०१४ पासूनच तांबड्या समुद्रावर कब्जा केला. त्याचा फटका आता जगाला बसला आहे. होर्मुझ आणि बाब-अल-मंदेव हे दोन्ही मार्ग बंद झाल्यामुळे सर्वात जास्त संकटात आहे ती अमेरिका. कारण हाऊती बंडखोरांना इराणचे समर्थन आहे.त्यांनी इराणच्या बाजूने युद्धात उडी घेतली. पण हाऊती बंडखोर आणि अमेरिका यांच्यातील युद्ध हे कालपासूनचे नाही. अमेरिका दुसऱ्या महायुद्धात उतरल्यापासून हे सुरू आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीत टाकले, हे निश्चित. इराणची मनमानी चालते त्याचे कारण आहे, तिथली भौगोलिक स्थिती. पर्वतीय आणि मैदानी प्रदेश आणि त्यावर इराणचा कब्जा. त्यामुळे इराणी क्षेपणास्त्रे आणि ड्रोन्स येथून अचूक लक्ष्यावर डागता येतात. याचाच फायदा घेऊन इराणने सर्व जगाला अडचणीत आणले. येमेनच्या हुथी समूहाचे लष्कर प्रवक्ता जनरल याह्या सारी यांनी म्हटले आहे, की आम्ही इस्त्रायलच्या लष्करी ठिकाणांवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे डागली. याचा अर्थ युद्ध आता भयानक वळणावर येऊन ठेपले आहे. या भयंकर स्थितीतही एकच दिलासा आहे तो म्हणजे पंतप्रधान मोदी आणि सौदी क्राऊन प्रिन्स यांनी एकमत व्यक्त केले, की सागरी रस्ते खुले आणि आंतरराष्ट्रीय व्यापार यामुळे प्रभावित होऊ नये. पण वास्तव बदलत नाही आणि यामुळेच हाऊती बंडखोरांनी आखातातील दोन प्रमुख अल्युमिनियम प्रकल्पांवर हल्ला करून ते बंद पाडण्याचा प्रयत्न केला. खरी स्थिती ही आहे, की हाऊती बंडखोर आता युद्धात सामील झाल्यामुळे जगासमोर ऊर्जेचे संकट निर्माण झाले. परिस्थिती अशी राहिली तर भीषण स्थिती निर्माण होऊ शकते. आपल्याला हे युद्ध लढायचे आहे. त्यात ट्रम्प यांच्यासारख्या एककल्ली आणि मनमानी करणाऱ्या व्यक्ती आणि इराणसारख्या दहशतवाद्यांना पोसणाऱ्या देशाची कृष्णकृत्ये यांच्याशी जगाला लढायचे आहे. काल हाऊतींनी आपला पहिला हल्ला केला आणि त्याचा फटका इस्त्रायलला बसला. युद्धाचे केंद्रस्थान आहे ते होर्मुझची खाडी आणि तेथे हाऊती बंडखोरांची स्थिती मजबूत आहे. तांबडा समुद्र आणि पुढे तो एडनच्या आखाताला जोडणारा मार्ग आहे आणि त्यासाठीच काही वर्षांपूर्वी महासत्ता लढल्या होत्या. पण तो प्रश्न तसाच राहिला. सुवेझचा कालवा ज्याला म्हणतात तो याच भूमीत आहे आणि येथेही अमेरिका आणि इंग्लंड देश लढले होते आणि सागरी मार्ग बंद करण्यात आला होता. आज तशीच स्थिती उद्भवण्याची शक्यता आहे. एक निश्चित आहे ती म्हणजे हाऊतींकडे प्रचंड ताकद आहे आणि ती आता ते जगाला दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही. होर्मुझचा भाग जगाची वाहतूक सुरळीत करतो. तोच मार्ग आता बंद झाल्यामुळे भारतासह सारेच देश अडचणीत आलेत. हाऊती बंडखोरांनी युद्धात उडी घेतल्यामुळे पश्चिम आशियातील स्थिती आणखीच चिंताजनक झाली आणि जे युद्ध अगदी काल परवापर्यंत स्थानिक आणि प्रादेशिक युद्ध होते ते आता अचानक व्यापक युद्धात परिवर्तित झाले आणि त्याचा फटका जगाच्या दळववळणाला बसला. हाऊतींनी अधिकृतरीत्या युद्धात उडी घेतली आहे आणि त्यामुळे जागतिक व्यापार अडचणीत आला. हाऊतींनी युद्ध सुरू केल्यामुळे जगाचे नुकसान तर झाले, पण इस्त्रायलला याचा फटका अधिक बसणार आहे. कारण या युद्धामुळे जगाचा ऊर्जा आणि तेलाचा मार्ग रोखून धरला. येमेन, लेबनॉन आणि इराण या तिन्ही देशांविरुद्ध युद्ध पुकारून इस्त्रायलने जगाला संकटात टाकले, हे निश्चित. हाऊतींचे नियंत्रण वाव-अल-मंदेव खाडीवर आहे आणि जो चिंचोळा मार्ग आहे. जेथून जगाचा १० टक्के तेल व्यापार चालतो. यापुढील युद्ध याच क्षेत्रात होईल असा भीतीदायक अंदाज तज्ज्ञ व्यक्त करत आहे आणि हेच क्षेत्र फ्लॅशपॉइंट ठरेल. तसे झाले तर आपल्याला तेलच मिळणार नाही आणि जग बहुधा मध्ययुगात जाईल. हाऊतींचे वैशिष्ट्य हे आहे, की हाऊती कुणाच्याही नियंत्रणात नाही आणि ते स्वतंत्रपणे कार्य करतात. त्यामुळे त्यांना शरण आणणे ट्रम्प यांनाही शक्य होणार नाही. त्यानी त्यांचे गुरिल्ला युद्धतंत्र विकसित केले. हाऊतींकडे अद्ययावत शस्त्रसामग्री आहे हा आणखी एक धोका आहे आणि त्यांच्याकडे जहाजविरोधी आधुनिक क्षेपणास्त्रे आहेत. ते जहाजाना समुद्रात बुडवू शकतात. हाऊती इतके दिवस शांत होते पण आता ते युद्धात उतरले आणि त्यामुळे सारे जग अस्वस्थ आहे. जगाला तेलाचा पुरवठा करणारा मार्ग होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जातो आणि तोही चिंचोळा आहे. पण या भूभागावर इराणी सैन्याची सत्ता आहे आणि जहाजे अत्यंत जवळून जात असल्याने इराणी सैनिकांच्या मार्गात ती सहज येतात. त्यामुळे येथून परकीय जहाजाला जाणे सहजसोपे नाही. याचा अर्थ इतकाच की युद्धाच्या सावल्या आता आणखी गडद झाल्या.

# ऊर्जा स्वावलंबन शक्य आहे?



**आखातातील संघर्षामुळे भारतासमोर ऊर्जा सुरक्षेचे मोठे संकट उभे राहिले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही राज्यसभेत बोलताना या संकटस्थितीचे गांभीर्य विषद केले आहे. विशेषतः गॅसच्या संकटाचा मुद्दा सर्वसामान्यांच्या रोजच्या जगण्याशी संबंधित असल्याने त्याचा विचार प्राधान्याने केला जाणे गरजेचे आहे.**

मध्यपूर्वेतील वाढता संघर्ष आणि जागतिक पुरवठा साखळीतील विस्कळीतपणा यामुळे भारताच्या घरगुती इंधन व्यवस्थेवर मोठा ताण आला आहे. गॅस सिलिंडरसाठी लागणाऱ्या लांबच लांब रांगा, वाढते भाव आणि पुरवठ्यातील अनिश्चितता यामुळे सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरातील चिंता वाढली असून, सरकारने आता उद्योगांऐवजी घरगुती वापराला प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. मात्र, या संकटामुळे भारताचे आयातीवरील अवलंबित्व आणि ऊर्जा सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे.

इराणने जागतिक ऊर्जा पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला होर्मुझची सामुद्रधुनी हा सागरी मार्ग बंद केल्यामुळे हे संकट ओढावले. याचे कारण भारताचा ६० ते ६५ टक्के एलपीजी पुरवठा हा आयातीवर अवलंबून आहे आणि त्यातील मोठा वाटा याच मार्गावरून येतो. साहजिकच हा मार्ग विस्कळीत होतो, तेव्हा थेट भारताच्या ऊर्जा साखळीवर परिणाम होतो. भारताचा गेल्या वर्षीचा एलपीजी वापर सुमारे ३१.३ दशलक्ष मेट्रिक टन होता, ज्यामध्ये आयातीचा वाटा लक्षणीय आहे. या आयातीमधील ८७ टक्के गॅस हा केवळ घरगुती वापरासाठी वापरला जातो. भारताच्या पेट्रोलियम प्लॅनिंग अँड ॲनालायसिस सेलच्या आकडेवारीनुसार, देशांतर्गत उत्पादन आणि मागणी यामध्ये मोठी दरी आहे. २०२५-२६ च्या पहिल्या सहामाहीत भारताने ६,२१९ हजार मेट्रिक टन उत्पादन केले, तर प्रत्यक्ष खप १६,२०० हजार मेट्रिक टन इतका होता. ही तफावत भरून काढण्यासाठी मोठी आयात करावी लागली. गेल्या अडीच दशकांत भारताची एलपीजी आयात १२ पटींनी वाढली आहे. १९९८-९९ मध्ये जी आयात केवळ १,७२२ हजार मेट्रिक टन होती, ती २०२४-२५ मध्ये २०,६६७ हजार मेट्रिक टनांवर पोहोचली आहे. उज्ज्वला योजनेसारख्या सरकारी उपक्रमांमुळे स्वच्छ इंधनाचा वापर वाढला असला, तरी त्यासोबतच आयातीवरील जोखमीमध्येही वाढ झाली आहे.

भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा ऊर्जा ग्राहक देश आहे. जागतिक बाजारातील किमतींमधील चढ-उतार आणि रशिया-युक्रेन किंवा इराण-इस्त्रायलसारख्या भौगोलिक-राजकीय संघर्षांमुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेला वारंवार तडा जातो. अशा स्थितीत भारताकडे नैसर्गिक वायूच्या आयातीवरचे अवलंबित्व कमी करण्याचा खरोखर काही ठोस मार्ग आहे का, हा प्रश्न आज सर्वात कळीचा मुद्दा बनला आहे.

### आयातीचे ओझे आणि देशांतर्गत मर्यादा

भारताने २०३० पर्यंत आपल्या ऊर्जा मिश्रणात नैसर्गिक वायूचा वाटा ६ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी गॅसची मागणी प्रचंड वाढणार आहे; मात्र आपल्याकडे नैसर्गिक वायूचे देशांतर्गत उत्पादन मागणीच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. कृष्णा-गोदावरी खोऱ्यातील उत्खनन किंवा राजस्थानमधील साठे असूनही तांत्रिक आव्हाने आणि गुंतवणुकीच्या मर्यादेमुळे आपण स्वावलंबी होऊ शकलेलो नाही. जागतिक स्तरावर गॅसच्या किमती वाढतात, तेव्हा त्याचा थेट परिणाम आपल्या खत उद्योगावर, वीजनिर्मितीवर आणि पर्यायाने महागाईवर होतो. आयातीवरील हे अवलंबित्व केवळ आर्थिक भारच नाही, तर धोरणात्मकदृष्ट्याही जोखमीचे आहे. त्यामुळेच आता पारंपरिक नैसर्गिक वायूच्या पलीकडे जाऊन पर्यायी मार्गांचा विचार करणे अनिवार्य झाले आहे.

### बायो-सीएनजी आणि बायोगॅस

गॅस आयातीला छेद देण्याचा सर्वात प्रभावी आणि शाश्वत मार्ग म्हणजे 'बायोसीएनजी' किंवा 'कॉम्प्रेस्ड बायोगॅस' (सीबीजी). भारताकडे दरवर्षी कोट्यवधी टन कृषी कचरा, सांडपाणी आणि सेंद्रिय कचरा उपलब्ध असतो. शेतातील पिकांचे अवशेष जाळण्याऐवजी जर ते बायोगॅस प्रकल्पांकडे वळवले, तर आपण मोठ्या प्रमाणावर गॅसनिर्मिती करू शकतो. 'सतत'सारख्या सरकारी योजनांमधून अशा ५००० प्रकल्पांचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. हे तंत्रज्ञान आयातीवरील खर्च कमी करण्याबरोबरच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देते आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यास मदत करते. आपण आपल्या सर्व सेंद्रिय कचऱ्याचा कार्यक्षम वापर केला, तर नैसर्गिक वायूच्या आयातीमध्ये १० ते १५ टक्क्यांपर्यंत घट करणे शक्य आहे.

### ग्रीन हायड्रोजन: भविष्यातील इंधन

भारताने 'नॅशनल ग्रीन हायड्रोजन मिशन'अंतर्गत जगातील सर्वात मोठ्या हायड्रोजन उत्पादकांपैकी एक बनण्याचे स्वप्न पाहिले आहे. नैसर्गिक वायूचा वापर प्रामुख्याने खतनिर्मिती आणि पोलाद उद्योगात केला जातो. या उद्योगांमध्ये नैसर्गिक वायूच्या जागी 'ग्रीन हायड्रोजन'चा वापर सुरू झाला, तर भारताचे गॅसवरील अवलंबित्व लक्षणीयरीत्या कमी होईल. सौर आणि पवन ऊर्जेच्या मदतीने पाण्याचे विद्युत अपघटन करून निर्माण होणारा हा हायड्रोजन पूर्णपणे प्रदूषणमुक्त असतो. सध्या या तंत्रज्ञानाचा खर्च जास्त असला, तरी पुढील दशकात उत्पादन वाढल्यास आणि तंत्रज्ञान स्वस्त झाल्यास ग्रीन हायड्रोजन हा नैसर्गिक वायूचा सर्वात मोठा स्पर्धक ठरेल. भारतासाठी ही एक मोठी संधी आहे. कारण, आपल्याकडे मुबलक सूर्यप्रकाश आणि मोठी किनारपट्टी आहे. यामुळे आपण हायड्रोजनचे उत्पादन आणि निर्यातही करू शकतो.

### विद्युतीकरण आणि नूतनीकरणक्षम ऊर्जेचा मेळ

आयातीवरचे अवलंबित्व कमी करण्याचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे 'इलेक्ट्रिफिकेशन'. ज्या उद्योगांमध्ये किंवा घरांमध्ये गॅसचा वापर गरम करण्यासाठी किंवा स्वयंपाकासाठी केला जातो, तिथे विजेचा वापर वाढवणे हा एक पर्याय आहे; पण ही वीज कोळशाऐवजी सौर किंवा पवन ऊर्जेपासून तयार झाली, तर दुहेरी फायदा होतो. 'पीएम सूर्यघर'सारख्या योजनांमधून घराघरांत सौर ऊर्जा पोहोचवण्याचा प्रयत्न होत आहे. स्वयंपाकासाठी गॅस सिलिंडरऐवजी 'इंडक्शन' कुकिंगला प्रोत्साहन दिल्यास एलपीजी आणि नैसर्गिक वायूची मागणी कमी होऊ शकते; पण विजेची मागणी लक्षणीयरीत्या वाढेल. वाहतूक क्षेत्रातही सीएनजी गाड्यांच्या बरोबरीने इलेक्ट्रिक वाहनांचा (ईव्ही) प्रसार झाल्यास गॅसची गरज मर्यादित राहील. ऊर्जा बचतीची ही चळवळ आयातीचे ओझे हलके करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

अर्थात, केवळ पर्यायी इंधनांचा शोध घेऊन चालणार नाही, तर त्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांची उभारणी करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. भारताने देशभरात गॅस पाईपलाईनचे जाळे (नॅशनल गॅस ग्रिड) विणण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेतले आहे. यामुळे देशांतर्गत उत्पादित होणारा गॅस आणि आयात केलेला एलएनजी कार्यक्षमतेने ग्राहकांपर्यंत पोहोचवता येईल. यासोबतच नैसर्गिक वायूला 'जीएसटी'च्या कक्षेत आणण्याची मागणी उद्योग क्षेत्राकडून होत आहे. यामुळे करांची गुंतागुंत कमी होऊन गॅस वापरणाऱ्या उद्योगांना प्रोत्साहन मिळेल. सरकारने 'एक्स्प्लोरेशन अँड प्रोडक्शन' धोरणात सुधारणा करून परदेशी कंपन्यांना भारतात उत्खननासाठी आकर्षित करावे, जेणेकरून आपल्या जमिनीतील साठ्यांचा पूर्ण वापर करता येईल, असाही एक प्रस्ताव मांडला गेला आहे. याखेरीज 'डीएमई' हे एक असे इंधन आहे जे एलपीजीमध्ये मिसळता येते किंवा काही बदलांनंतर थेट वापरता येते. भारतीय तेल कंपन्या या तंत्रज्ञानावर काम करत असून, यामुळे पेट्रोलियम उत्पादनांवरील भार कमी होईल.नैसर्गिक वायूच्या आयातीवरचे अवलंबित्व पूर्णपणे शून्यावर आणणे हे एका दिवसाचे काम नाही. ती एक दीर्घकालीन प्रक्रिया असून बदलत्या काळाचा विचार करता ती अशक्यही वाटते; पण बायोगॅसचा प्रसार, ग्रीन हायड्रोजन तंत्रज्ञानातील प्रगती आणि नूतनीकरणक्षम ऊर्जेचा वाढता वापर याबाबत समग्र मिशन हाती घेऊन संपूर्ण देशाने एकजुटीने यामध्ये योगदान दिले, तर ही बाब बऱ्याच अंशी शक्य होऊ शकते. तसे झाल्यास भारताचा आयातीवरील प्रचंड मोठा भार कमी होण्यास मदत होईल. हजारो कोटी रुपयांची होणारी ही बचत भारतात आर्थिक परिवर्तन घडवून आणणारी ठरू शकते. भारताची वाढती अर्थव्यवस्था ऊर्जेच्या मागणीला चालना देणारी आहे; पण ही गरज भागवण्यासाठी आपण परकीय देशांच्या दावणीला बांधले जाणे परवडणारे नाही.

ऊर्जेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होणे भारताचे जागतिक राजकारणातील स्थान अधिक मजबूत करणे आहे. तथापि, आधुनिक तंत्रज्ञान, योग्य धोरणे आणि समग्र लोकसहभाग यांच्या त्रिवेणी संगमातून भारत गॅस आयातीच्या विळख्यातून बाहेर पडू शकतो आणि जगाला शाश्वत ऊर्जेचा एक नवा मार्ग दाखवू शकतो.

भारतातील एलपीजी संकटाचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे साठवणूक क्षमतेचा अभाव. कच्च्या तेलाप्रमाणे एलपीजीची साठवणूक करणे सोपे नसते. त्यासाठी उच्च दाबाच्या टाक्या आणि विशेष पायाभूत सुविधांची गरज असते. सध्या भारताची एकूण साठवणूक क्षमता केवळ १.९ दशलक्ष टन आहे, जी देशाच्या साधारण २२ दिवसांच्या गरजेसाठी पुरेशी आहे. वाढत्या मागणीच्या तुलनेत साठवणूक यंत्रणेचा विस्तार न झाल्याने अशा जागतिक संकटाच्या काळात भारताची स्थिती नाजूक होते. गॅसची आयात कमी करण्यासाठी भारताला बहुआयामी धोरण राबवावे लागेल. प्रथम आयातीचे स्रोत केवळ मध्यपूर्वेपुरते मर्यादित न ठेवता अर्जेंटिना, अमेरिका आणि इतर देशांशी करार करून ते वैविध्यपूर्ण करावे लागतील, जेणेकरून होर्मुझच्या सामुद्रधुनीसारख्या मार्गांवर होणाऱ्या संघर्षाचा परिणाम कमी होईल. तसेच भारताची सध्याची एलपीजी साठवणूक क्षमता केवळ २२ दिवसांची आहे, जी वाढवून किमान ६० दिवसांपर्यंत नेणे गरजेचे आहे.

याशिवाय, पीएनजी नेटवर्कचा विस्तार करून एलपीजीवरील ताण कमी करणे आणि जिथे पीएनजी पोहोचला आहे, तिथे एलपीजी सिलिंडर बंद करण्याचे कठोर धोरण राबवणे आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आवश्यक आहे.

**रंगनाथ कोकणे**

# नेपाळची सूत्रे युवा पिढीच्या हातात !

काही दिवसांपूर्वी नेपाळमध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत रवी लामिछने यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाला दणदणीत विजय मिळाला.नेपाळी संसदेच्या एकूण २७५ जागांपैकी १८२ जागांवर राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाला विजय मिळाला.गेली काही वर्षे नेपाळमध्ये कोणत्याही पक्षाला स्वबळावर बहुमत न मिळाल्याने, आघाडीची सरकारे सातत्याने नेपाळमध्ये सत्तेवर येत होती.या आघाडी सरकारांमध्ये निरनिराळ्या विचारसरणीचे पक्ष सामील असल्याने,त्यांच्या मधील मतभेदांमुळे ही सरकारे थोड्या अवधीतच कोसळत होते.त्यामुळे वारंवार निवडणुका घ्याव्या लागत होत्या.एकंदरीत ही आघाडीची सरकारे नेपाळला स्थिर शासन देण्यात अपयशी ठरली होती.मात्र या खेपेस नेपाळच्या मतदारांनी राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाला भरघोस मतदान करून,आघाड्यांची परंपरा मोडीत काढली आहे.

राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाचे नेते बालेंद्र शहा यांनी नुकतीच नेपाळच्या पंतप्रधान पदाची शपथ घेतली आहे.बालेंद्र शहा उर्फ बालेन हे ३५ वर्षाचे असून ते नेपाळचे आजवरचे तरुण पंतप्रधान आहेत.बालेन यांचा रॅपर ते नेपाळचे पंतप्रधान असा प्रवास आहे.त्यांनी नेपाळची राजधानी काठमांडूचे महापौर पद यापूर्वी भुषविले आहे.ते महापौर असताना त्यांनी काठमांडू मधील अनधिकृत फेरीवाल्यांचा प्रश्न हाती घेतला होता आणि तो प्रश्न काही प्रमाणात सोडवला ही होता.मात्र ते विशेष प्रकाशात आले ते त्यांनी भारतीय बॉलिवूड चित्रपटांवर बंदी घातल्याने.'आदिपुरुष ' या चित्रपटातील काही संवादांना त्यांनी आक्षेप घेतला होता.नंतर नेपाळमधील न्यायालयाने ती बंदी उठवली होती.पंतप्रधान पदाची शपथ घेतल्यानंतर बालेन यांनी लगेच जाहीर केले आहे की, आपल्याला भारताबरोबरचे संबंध आणखी मजबूत करायचे आहेत.



बालेन हे उत्कृष्ट रॅपर तर आहेतच शिवाय ते इंजिनिअर आहेत.विशेष महत्त्वाची बाब म्हणजे बालेन यांच्या नेतृत्वाखालील मंत्रीमंडळाचे सरासरी वय हे फक्त ३५ इतके आहे.थोडक्यात, नेपाळी जनतेने सत्तेची सूत्रे तरुणांकडे सोपवली असून हे तरुण ( जेन झी ) आता नेपाळचे भवितव्य ठरवणार आहेत.बालेंद्र शहा यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये, महत्वाचे गृहमंत्रीपद सुदान गुरूंग यांच्याकडे सोपवण्यात आले आहे.सत्ताधारी राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाचे अध्यक्ष रवी लामिछने यांच्या आग्रहाखातर गृहमंत्रीपद सुदान गुरूंग यांच्याकडे सोपवण्यात आले आहे.सुदान गुरूंग यांनी सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या जेन झी आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावली होती.तसेच रवी लामिछने आणि बालेंद्र शहा यांना एकत्र आणण्यात,गुरूंग यांचा महत्त्वाचा वाटा होता.बालेंद्र शहा यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये महत्वाचे असे अर्थखाते स्वर्णीम वागले यांच्याकडे सोपवण्यात आले आहे.वागले यांनी लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधुन अर्थशास्त्राची पदवी प्राप्त केली आहे.बालेंद्र शहा यांच्या नेतृत्वाखालील सरकारसमोर बरीच आव्हाने उभी आहेत.सर्वात मोठे आव्हान हे बेरोजगारीचे आहे.नेपाळची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने पर्यटन व्यवसायावर अवलंबून आहे.तसेच नेपाळमधील जे लोक इतर देशांत काम करतात, त्यांनी आपल्या नातेवाईकांना पाठवलेल्या पैशांवर अर्थव्यवस्थचे गणित अवलंबून आहे.नेपाळमधील युवा पिढीला स्वदेशात रोजगार हवा आहे.मात्र नेपाळमध्ये उद्योग धंद्यांची कमतरता असल्याने, रोजगाराच्या फारशा संधी उपलब्ध नाहीत.त्याकरता निरनिराळे प्रकल्प नेपाळमध्ये उभारावे लागतील.

राजकीय व्यवस्थेतील भ्रष्टाचार हा नेपाळमधील कळीचा मुद्दा आहे.संपूर्ण राजकीय व्यवस्था भ्रष्टाचाराने पोखरलेली आहे.सप्टेंबर २०२५ मध्ये युवकांनी जे आंदोलन केले होते, त्यामध्ये भ्रष्टाचार हा प्रमुख मुद्दा होता. २०२५ मध्ये तो असंतोष प्रकर्षाने बाहेर आला.निमित्त होते, फेसबुक पोस्टचे.फेसबुक पेजेसवर काही पोस्ट टाकण्यात आल्या होत्या.युवक आपला राग भ्रष्ट राजकारणी आणि भ्रष्ट राजकीय व्यवस्था यांच्या विरोधात फेसबुकच्या माध्यमातून व्यक्त करत होते.मात्र या रागाची पहिली ठिणगी पडली ती सरकारने जेंव्हा फेसबुक, व्हॉट्सअप, इन्स्टाग्राम,यू ट्यूब इत्यादी २६ सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर बंदी घातली तेंव्हा.सरकारने त्यासाठी असे कारण दिले की या ॲप्सनी दिलेल्या मुदतीत,नेपाळच्या माहिती आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडे आपली नोंदणी केली नाही.मात्र जे युवक या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर पोस्ट्स टाकून सरकार विरोधातील आपला राग व्यक्त करत होते,त्यांचा असा समज झाला की आपली मुस्कटदाबी करण्यासाठीच सरकारने या ॲप्सवर बंदी घातली.त्यांचा तो समज काही अंशी खराही असेल.

ॲप्सवर बंदी घातल्यानंतर युवकांमधील असंतोषाच्या ठिणगीचे रूपांतर वणव्यात झाले.सरकार विरोधात निदर्शने करण्यासाठी युवक रस्त्यावर उतरले.संसद भवनाच्या दिशेने युवकांना मोर्चा काढायचा होता.ते आंदोलन आटोक्यात आणण्यासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात काही युवक मारले गेल्याने आंदोलन आणखीनच चिघळले.या पार्श्वभूमीवर नेपाळमध्ये मध्यंतरी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत नेपाळी जनतेने सत्तेची सूत्रे तरुणांच्या हाती सोपवली आहेत.बालेंद्र शहा यांच्या नेतृत्वाखालील सरकारकडून नेपाळी जनतेच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत.त्या अपेक्षा कितपत पुऱ्या होतील,यावर बालेंद्र शहा यांच्या नेतृत्वाखालील सरकारचे भवितव्य अवलंबून राहील.

**अभय गोखले**

## सीलबंद पाण्याच्या बाटल्या सुरक्षित ?

सीलबंद पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे सीलबंद पाणी विकणाऱ्या कंपन्याही गावोगावी तयार होऊ लागल्या आहेत.पारदर्शक प्लास्टिक बाटलीत पाणी भरून त्यावर सील असलेले बूच लावले आणि त्यावर कंपनीचे लेबल चिकटवले कि ती बाटली २० रुपयांना कोणीही विकत घेतात. ज्या बिस्लेरी कंपनीने या सीलबंद पाण्याची संकल्पना लोकांमध्ये रुजवली त्या बिसलेरी पाण्याच्या बाटल्या आज पाहायला मिळणेही दुरापास्त झाले आहे. बिसलेरी मागितल्यावर आज दुकानदाराकडून सीलबंद पाण्याची कोणत्याही कंपनीची बाटली हाती थोपवली जाते.या सर्वच कंपन्या शासनमान्य असतात का? यांच्या पाण्याची गुणवत्ता शासनाच्या अन्न आणि औषध विभागाने तपासलेली असते का ? यांच्याकडे त्याबाबतचे प्रमाणपत्र असते का ? एसटीने प्रवास करताना दर दोन गावांच्या नंतर वेगळ्या कंपनीची सीलबंद पाण्याची बाटली पाहायला मिळते.ग्राहकांकडून घेतलेल्या पैशांच्या मोबदल्यात त्यांना दिले जाणारे पाणी शुद्ध नसेल, तर ती केवळ ग्राहकाची फसवणूकच नव्हे, तर ग्राहकाच्या आरोग्यालाही अपायकारक ठरू शकते.

**जगन घाणेकर**

## युद्धामुळे प्रवासी ट्रेंड बदलला

ट्रॅव्हल प्लॅटफॉर्म 'इस्किगो' च्या अहवालानुसार अलीकडे प्रवाशांचा ट्रेंड खूपच बदलला आहे. पश्चिम आशियातील बदलत्या परिस्थितीमुळे अनेकांनी प्रवासी देश बदलले आहेत.आशियातील काही देशात पर्यटनाची वाढ दिसून येत आहे.पश्चिम आशियामधील उड्डाणातील अडथळे व हवाई क्षेत्रातील अनेक निर्बंध यामुळे पर्यटक अधिक परिचित व सहज पोहचता येईल अशा ठिकाणांना महत्व देत आहेत.सध्या व्हिएतनाम ला सर्वात पसंती आहे.तेथे बुकिंग मध्ये तब्बल १३० टक्के एवढी वाढ झाली आहे.या देशास नेपाळ,श्रीलंका, इंडोनेशिया,सिंगापूर व थायलंड या देशांना सुद्धा लोक अधिक पसंती देऊ लागले आहेत.याच बरोबर देशी पर्यटनाला सुद्धा महत्व देण्यात येत आहे. उदाहरण द्यायचे असल्यास उदयपूरचे देता येईल.येथे फ्लाईट बुकिंग मध्ये तब्बल ६९ टक्के वाढ झाली आहे.त्यानंतर जोधपूर,श्रीनगर व अगरतला या शहरांचा क्रमांक लागतोआज पर्यंत पश्चिम आशिया सर्वात लोकप्रिय पर्यटनाला वाव होता आता लोक आशियातील स्थळांचा विचार करत आहेत.

**शांताराम वाघ**

## सल्लागाराच्या मार्गदर्शनाने गुंतवणूक

शेअर बाजारात युद्धामुळे निर्माण झालेले वातावरण निराशाजनक असून मार्केट वारंवार कोसळत आहे. अशा परिस्थितीत म्युच्युअल फंड चांगला पर्याय आहे असे सांगितले जात आहे. सल्लागाराच्या मार्गदर्शनाने गुंतवणूक करावी. सोने-चांदी घेणे सध्या तरी खूपच अवघड वाटत आहे.

**प्रशांत बोके**


# शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या जीवाशी खेळ?

## औषधांवर बॅच नंबर-एक्सपायरी गायब; प्रशासनाचे दुर्लक्ष उघड

**जनमाध्यम प्रतिनिधी**
**विवेक वानखडे (जि.प्र.)**

यवतमाळ - येथील वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (GMC) येथे रुग्णांच्या जीवाशी सर्रास खेळ सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रुग्णांना दिल्या जाणाऱ्या खोकल्याच्या औषधांच्या बाटल्यांवर बॅच नंबर, उत्पादन तारीख (Manufacturing Date) व कालबाह्यता तारीख (Expiry Date) नमूद नसल्याचे आढळून आले आहे. यामुळे संबंधित औषधे कालबाह्य किंवा फेरफार करून दिली जात असल्याची गंभीर शंका उपस्थित होत आहे.

प्राथमिक चौकशीत समोर आलेल्या माहितीनुसार, ही औषधे एप्रिल 2025 मध्ये हाफकिन बायो-फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन, मुंबई यांच्याकडून पुरवठा करण्यात आली होती. सुमारे 15,000 (100 ml) बाटल्यांचा साठा रुग्णालयात मागविण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात रुग्णांना देण्यात आलेल्या बाटल्यांवर



कोणतीही अधिकृत माहिती आढळून आली नाही. अधिकाऱ्यांनी काही प्रकरणांत बॅच नंबर व एक्सपायरी तारीख हाताने लिहून दिल्याचे मान्य केले आहेजे अत्यंत गंभीर व नियमबाह्य आहे. शासकीय रुग्णालयावर नागरिकांचा विश्वास टिकवायचा असेल, तर औषध पुरवठा, साठवणूक आणि वितरण यामध्ये पारदर्शकता व जबाबदारी अत्यावश्यक आहे. अन्यथा "मोफत उपचार" या नावाखाली रुग्णांच्या जीवाशी चाललेला हा खेळ कधीही मोठ्या दुर्घटनेत परिवर्तित होऊ शकतो.

**रुग्ण नातेवाईक :** "आम्हाला दिल्या जाणाऱ्या औषधांवर तारीखच नाही, मग त्या सुरक्षित आहेत का याचा विश्वास कसा ठेवायचा?"

**रुग्णालय कर्मचारी :** "साठवणुकीची योग्य व्यवस्था नाही. अनेकदा वरिष्ठांना कळवले, पण दुर्लक्षच झाले."

**सामाजिक कार्यकर्ते :** "हा प्रकार थेट रुग्णांच्या जीवाशी खेळ आहे. दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे."

**वैद्यकीय तज्ज्ञ :** "बिनतारीख औषधे देणे म्हणजे गंभीर गुन्हा आहे. यामुळे रुग्णांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो."

### औषध साठ्याची दयनीय अवस्था; स्वच्छतेचा अभाव

रुग्णालयातील औषध भांडार विभागाची परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. औषधांचा साठा अस्ताव्यस्त पद्धतीने ठेवण्यात आला असून, स्वच्छतेचा पूर्ण अभाव दिसून येतो. अनेक महत्त्वाची औषधे शीतगृहात (फ्रीजर) ठेवणे आवश्यक असताना, त्यासाठी कोणतीही योग्य व्यवस्था नसल्याचे स्पष्ट झाले आहे. भांडार विभागाच्या छतावर कचरा साचलेला असून, खोल्यांमध्येही अस्वच्छता मोठ्या प्रमाणात आहे. पावसाळ्यात तर पाणी थेट औषध साठ्यात शिरत असल्याची माहिती कर्मचाऱ्यांनी दिली. अशा परिस्थितीत औषधांची गुणवत्ता टिकून राहील का, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

### "कोविडनंतर भांडार विभाग रामभरोसे"

कोविड काळात भांडार विभागाची जागा कोविड रुग्णांसाठी वापरण्यात आल्याने औषध साठ्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून जुन्या, जीर्ण क्लासरूममध्ये साठा हलवण्यात आला. मात्र त्या खोल्यांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. गेल्या तीन वर्षांपासून नवीन भांडार इमारतीसाठी प्रस्ताव दिले गेले असतानाही प्रशासनाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप विभागीय कर्मचाऱ्यांनी केला आहे.

### शासनाला सवाल: जबाबदार कोण?

रुग्णांच्या आरोग्याशी थेट संबंधित असलेल्या औषधांबाबत इतकी निष्काळजीपणा का? बिनतारीख, बिनबॅच नंबर औषधे देणे हा गंभीर गुन्हा नाही का? कोट्यवधी रुपयांचा औषध साठा असताना योग्य साठवणूक व्यवस्था का नाही? या सर्व प्रश्नांची उत्तरे आता जिल्हा प्रशासन व राज्य शासनाने देणे अत्यावश्यक झाले आहे.

### अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद

या प्रकरणाबाबत अधिष्ठात्यांकडे विचारणा केली असता त्यांनी "माहिती घेऊन कळवितो" अशी उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र पुढील चौकशीत स्टोरेज फार्मसी व भांडार विभाग प्रमुखांवर चौकशीचे आदेश देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# अवैध गॅस साठवणुकीवर पोलिसांचा धडक छापा




**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - शहरातील ब्रम्हणपुरी परिसरात अवैध गॅस सिलेंडर साठवणूक करून विक्री करणाऱ्या इसमावर पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे अवैध व्यवसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

पोलीस स्टेशन दिग्रस हद्दीत अवैध धंद्यांवर कारवाई करण्याचे आदेश मिळाल्यानंतर सहाय्यक पोलीस अधीक्षक डॉ. तेजस सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक सक्रिय झाले होते. २८ मार्च रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास दिग्रस ब्रम्हणपुरी येथील राष्ट्रीय महाविद्यालयाजवळ रा. राजू शाम पदमावार हा इसम घरातूनच अवैध गॅस सिलेंडर साठवणूक करून विक्री करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे पोलीस व पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त छापा टाकला असता, आरोपीच्या घरातून १० मोठे व २ लहान गॅस सिलेंडर, ४ रेग्युलेटर आणि वजन काटा असा एकूण ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याबाबत विचारणा केली असता आरोपीकडे कोणतेही वैध कागदपत्र आढळून आले नाही. सदर प्रकरणी आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू असून जप्त केलेला मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस व पुरवठा विभागाकडून सुरू आहे. दरम्यान, दिग्रस पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, अवैध गॅस साठवणूक किंवा जादा दराने विक्री होत असल्यास त्वरित पोलीस स्टेशन किंवा पुरवठा कार्यालयास माहिती द्यावी. अशा प्रकारच्या अवैध धंद्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# • वेचक

## श्री अभ्यासिका सेंटर महागावच्या विद्यार्थ्यांची अकोला पोलीस दलात भरती



महागाव - श्री कॉम्प्युटर द्वारा संचालित श्री अभ्यासिक महागाव येथील अभ्यासिकामधील विद्यार्थी अभिजीत गजानन शिंदे रा.वाघनाथ तालुका महागाव जिल्हा यवतमाळ यांची अकोला पोलीस दलात नियुक्ती झाली असून त्याचे श्री अभ्यासिका सेंटरचे संचालक मंगेश वानखेडे आणि विद्यार्थी यांचेकडून अभिनंदन करून शुभेच्छा दिल्यात. अभिजितने अकोला पोलीस दलात प्रबळ इच्छाशक्ती आणि अथक परिश्रमाच्या जोरावर यशाला गवसणी घालत श्री अभ्यासिकेतील विद्यार्थी अभिजीत शिंदे याने सिद्ध करून दाखवले आहे. त्याची अकोला पोलीस दलात झालेली निवड ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट आहे. अभिजीतचे हे यश त्याच्या कठोर मेहनतीचे, जिद्दीचे आणि सातत्याचे फळ आहे. त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि पोलीस दलातील पुढील कारकिर्दीसाठी अभ्यासिकेतील सर्व विद्यार्थ्यांनी तसेच संचालक मंगेश वानखेडे यांनी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

## कृषी प्रदर्शनीला जिल्हाधिकारी विकास मीना यांची भेट

यवतमाळ : यवतमाळ येथील कृषी विज्ञान केंद्र मैदान पिंपळगाव रोड येथे आयोजित 'यवतमाळ महोत्सवा'त जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयामार्फत कृषी प्रदर्शनी भरविण्यात आली आहे. या पारदर्शनीला जिल्हाधिकारी विकास मीना यांनी काल भेट देवून सेंद्रिय शेती पद्धतीने निर्मित केलेल्या वस्तू, बीबियाणे, शेत अवाजारे व यंत्र आणि सेंद्रिय खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सची पाहणी केली. यावेळी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड, शेतकरी बांधव उपस्थित होते. या प्रदर्शनी दरम्यान शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या ट्रॅक्टरची प्रतिकात्मक किल्ली जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या हस्ते शेतकऱ्यांना प्रदान करण्यात आली. या कृषी प्रदर्शनीमध्ये स्थानिक शेतकरी उत्पादक संस्था आणि कंपन्यांकडून सेंद्रिय पद्धतीने निर्माण केलेले गृहोपयोगी वस्तू, खाद्यपदार्थ, मसाले, फळ भाजीपाला इ. प्रदर्शित करण्यात करण्यात आले आहे. या कृषी प्रदर्शनाला शेतकरी, महिला आणि नागरिकांनी भेट देवून शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे, आवाहन जिल्हाधिकारी विकास मीना यांनी केले आहे.

# "स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांच्या कौशल्यांना वाव देणारे व्यासपीठ" : प्राचार्य डॉ. भाष्कर सावरकर

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - २८ मार्च रोजी कला, वाणिज्य महाविद्यालयात निरोप समारंभ व वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम उत्साहात पार पडला. अध्यक्षीय भाषणाच्या प्रारंभी डॉ. भाष्कर सावरकर यांनी एक सुंदर गीत सादर करून उपस्थितांना आपल्या कलागुण संपन्नतेचा परिचय दिला. आपल्या भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी स्नेहसंमेलनाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, कला, क्रीडा, नृत्य, संगीत, नाटक अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांना आपली क्षमता दाखविण्याची संधी मिळते. प्रमुख अतिथी डॉ. बरडे यांनी स्नेहसंमेलन हे केवळ तरुणाईचा उत्सव नसून विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस उर्जा देणारे व्यासपीठ असल्याचे मत व्यक्त केले.

सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. विशाल दौलतकर यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. शालिनी हटवार यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन डॉ. सुरेश फुलकर, प्रा. विशाल



वाघमारे, प्रा. प्रविण शेंद्रे, प्रा. भिमराव वाघमारे, प्रा. पंकज आत्राम, माजी विद्यार्थी सुशील दांदडे तसेच शिक्षकेतर कर्मचारी महादेव राऊत, शंकर ढोरे, नारायण बुरबुरे, अरुण येरकर यांनी केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेली नाटिका विशेष ठरली. यात सुरज कुमरे, संजिवनी आत्राम, अनुष्का होले, राजकमल कनाके यांनी सहभाग घेतला. सामूहिक नृत्यप्रकारात गोंडी नृत्याला विशेष दाद मिळाली. यात आकांक्षा आडे, अंकिता मेश्राम, सुहानी कुमरे, वेदीका वड्डे, नंदिनी सोयाम यांनी सहभाग घेतला. एकल नृत्यात माजी विद्यार्थी अजय गजबे यांनी सादर केलेल्या लावणीला प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. संस्कार केंद्रातील विद्यार्थी हर्षल नेहारे, विकास मेश्राम, भावेश, दक्ष आडे, जगदिश नेहारे यांनीही आपले कलागुण सादर केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, मराठी विभाग प्रमुख प्रा. अनिल दौलतकर, डॉ. रूपेश पवार तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाविद्यालयाच्या मातृसंस्थेचे अध्यक्ष डॉ.भाऊ दायदार, सचीव विलासराव भोयर व कोषाध्यक्ष नितीनजी सरदार यांनी शुभेच्छा पत्राद्वारे विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त केल्या.


# नि:शुल्क सर्वधर्मीय सामूहिक विवाह मेळावा; ९ मे रोजी आयोजन

## गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर व ग्रामपंचायत श्रीरामपूरचा पुढाकार!

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ गुरुकुंज मोझरी द्वारा संचालित गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर व ग्रामपंचायत श्रीरामपूरच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांना अपेक्षित असलेल्या सर्वधर्मीय आदर्श सामूहिक विवाह ९ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. शासनाचा निधी न घेता लोकसहभागातुन आजपर्यंत ५५ विवाह निर्विघ्नपणे पार पडले असून विवाह इच्छुक उपवधू - वरांनी २५ एप्रिल २०२६ पर्यंत नोंदणी करावी असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर तर्फे गेल्या १७ वर्षापासून ३० एप्रिल ते ९ मे दरम्यान वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामजयंती महोत्सवात विविध उपक्रम राबविले जातात यामध्ये



नि:शुल्क बालसंस्कार शिबिर त्यात सामुदायिक ध्यान, योगासन प्राणायाम, स्वसंरक्षण ज्युडो कराटे प्रशिक्षण, कचऱ्यातून कलानिर्मिती, तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन, रामधुनद्वारे ग्रामस्वच्छता,भजन, गायन, वादन, बळिराजा चेतना अभियान अंतर्गत नैसर्गिक शेती व बळीराजाचे मनोबल वाढविण्याच्या दृष्टीने विशेष प्रबोधन, सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना,चिंतन, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकारांची कीर्तनमाला व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या वाङ्मयावर आधारित परीक्षा व शिबिरार्थींना प्रमाणपत्र वितरण करण्यात येते. यावर्षी सुद्धा गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर व ग्रामपंचायत श्रीरामपूर तर्फे गरजू,शेतकरी,शेतमजूर,दारिद्र रेषेखालील,निराधार,दिव्यांग, विधवा - विदुर तसेच आंतरजातीय विवाहोच्छुक उपवधू - वरांसाठी सर्वधर्मीय सामूहिक विवाह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.आयोजकांतर्फे वधू वरांना आहेर, चप्पल बुट, संसारोपयोगी भांडी तसेच मोजक्या पाहुण्यांना चहा अल्पोपहार व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. विवाहोच्छुक उपवधू - वरांनी सहभागी होण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालय श्रीरामपूर पुसद व नवचंडीका ऑटोमोबाईल कारला रोड पुसद येथे २५ एप्रिल २०२६ पर्यंत नोंदणी करावी असे आवाहन गुरुदेव सेवा मंडळ व ग्रामपंचायत श्रीरामपूर तर्फे करण्यात आले.

# अवैध धंद्यांवरील बातम्यांचा राग?

## पत्रकारावर खोटे गुन्हे दाखल गुन्हे मागे घेण्याची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड : तालुक्यात अवैध धंद्याविरोधात सातत्याने आवाज उठवणाऱ्या पत्रकारावर कारवाई केल्याचा आरोप पुढे आला असून, संबंधित गुन्हे तात्काळ मागे घेण्याची मागणी जोर धरत आहे. याबाबत उमरखेड तालुक्यातील दैनिक वृत्तपत्र प्रतिनिधींनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर केले आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, शहर व तालुक्यात सुरू असलेल्या अवैध धंद्यांवर कारवाई व्हावी यासाठी तसेच त्याबाबत वारंवार बातम्या प्रसिद्ध केल्यामुळे धाडस 007 या युट्यूब चॅनलचे संपादक अमित देशमुख यांच्याविरोधात उमरखेड पोलीसांनी आकसापोटी गुन्हे दाखल केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

१२ मार्च रोजी रात्री सुमारे ९.३० वाजताच्या सुमारास, एका तक्रारदाराच्या फोनवरून पत्रकार म्हणून पोलीस ठाण्यात गेलेल्या अमित देशमुख यांच्यावर मध्यरात्रीच्या सुमारास



जातीय तेढ निर्माण करणे, युवकांना चिथावणी देणे व शासकीय कामात अडथळा आणणे यांसारखे गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले. ही कारवाई पूर्वनियोजित व सूडबुद्धीने केल्याचा दावा पत्रकार संघटनांनी केला आहे. अवैध दारू, जुगार, गांजा आदी गैरप्रकारांबाबत सातत्याने तक्रारी व बातम्या प्रसिद्ध करणाऱ्या पत्रकारांवर अशा प्रकारे कारवाई होत असल्यास, भविष्यातही इतर प्रतिनिधींवर खोटे गुन्हे दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर निष्पक्ष चौकशी करून अमित देशमुख यांच्यावरील सर्व गुन्हे तात्काळ मागे घ्यावेत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या वेळी विविध पत्रकार संघटनांचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. त्यामध्ये साहेबराव धात्रक, संतोष मुडे, श्रीमती सविता चंद्रे, लक्ष्मीकांत नंदनवार, अरविंद ओझलवार, निळकंठ धोबे, व्यंकटेश पेन्शनवार, गजानन भारती, शैलेश ताजवे, डॉ. विशाल माने, अरुण बेले, भिमराव नगारे, अविनाश मुन्नरवार, अझरउल्ला खान, वसंत देशमुख, ताहेर मिर्झा, संतोष कलाने, राजू गायकवाड, स्वप्नील मगर, सुनिल ठाकरे आदींचा समावेश होता.

# रामगाव पान रस्त्यावर अवैध वृक्षतोड जोरात सुरू

**जनमाध्यम प्रतिनिधी**

दिग्रस - तालुक्यातील रामगाव ते लिंगी पांदण रस्त्यावर असलेल्या लिंब बाभूळ अडजातीचे वृक्ष जेसीबी द्वारे अवैध वृक्षतोड जोरात सुरू असून सदर वन विभागांनी कारवाई करण्याऐवजी कुंभकर्णी झोपेत असल्याने वृक्षतोड करणाऱ्या ठेकेदाराचे मनोबल वाढले आहे त्यामुळे सदर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रामगाव ते लिंगी सुरु असलेल्या पांदन रस्त्यावरील झालेल्या वृक्षतोड्याची चौकशी करून वृक्षतोड करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्याकडून होत आहे.

दिग्रस तालुक्यातील ग्रामपंचायत रामगाव ते लिंगी पांदण रस्त्याचे काम मागील आठ ते दहा दिवसापासून सुरू आहे सदर या रस्त्यावरील असलेल्या अतिशय जुने वृक्ष लिब बांबूळ तसेच इतर आडजात यांची कटाई करणे आधी वनविभागाची




परवानगी घेणे गरजेचे असताना सदर या ठेकेदारांनी कोणतीही परवानगी न घेता रस्त्यावर असलेले मोठमोठे वृक्षाची जेसीबी द्वारे कटाई करण्यात आले असून सदर वन विभागांनी झालेल्या अवैध वृक्षतोडची सखोल चौकशी करणे गरजेचे असताना कुंभकर्णी झोपेत का असा प्रश्न नागरिकांमध्ये होत आहे सदर काम महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत असताना सदर ठेकेदार यांनी कोणतेही मजूर न लावता संपूर्ण काम जेसीबी द्वारे करण्यात येत आहे सदर काम शासनाच्या अंदाज पत्रकानुसार होत नसून अतिशय निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे चर्चा शेतकऱ्यांमध्ये होत आहे वरिष्ठ अधिकाराच्या हातात धरून मजूर न लावता जेसीबी द्वारे काम करीत आहे व आपल्या जवळील मजुराच्या नावाने मस्टर करण्यात येत असल्याची चर्चा परिसरातील शेतकऱ्यांमध्ये सुरू आहे तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सदर या सुरू असलेल्या पांदण रस्त्याची सखोल चौकशी करून ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शेतकऱ्याकडून होत आहे तसेच झालेल्या अवैध वृक्षतोड्याची तातडीने चौकशी न केल्यास वृक्ष मित्राकडून आंदोलनाचा इशारा देण्यात आले.

# अमृत पॅटर्नच्या कापूस प्लॉटला ईटालीयन शेतीतज्ज्ञांची भेट

**जनमाध्यम प्रतिनिधी**

महागाव - यवतमाळ जिल्ह्याची ओळख अख्या जगात शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणुन झालेली ओळख व महाराष्ट्र राज्यातील कापुस उत्पादक जिल्हा म्हणुन मागील अनेक दशके आसलेली ओळख आज अमृत पॅटर्न च्या यशस्वी घोडदौड मुळे समुद्रापार गेल्याने महागाव तालुक्यातील एक छोट गाव अंबोडा आणि या गावातील एक प्रयोगशील ध्येयवेडा शेतकरी म्हणजे अमृत पॅटर्न चे जनक अमृतराव देशमुख मागील तीस ते पस्तीस वर्षांपासून आपल्या शेतात कापुस, सोयाबीन, चणा, ऊस अशा विविध पिकावर यशस्वी प्रयोगशीलता जपत त्यांनी सतत स्वताचे व ईतर नामांकित विद्यापीठांमध्ये कार्यरत आसलेल्या



शेती संशोधकाचे एकरी ऊत्पादनाचे सर्व रेकार्ड मोडले आहेत. विशेष म्हणजे दरवर्षी ऊत्पादनाचा आलेख चढता क्रम असल्याने राज्यातील व राज्याबाहेरील लाखो शेतकरी, पदाधिकारी शेती शास्त्रज्ञ इत्यादींनी त्यांच्या शेताला भेटी दिल्या आहेत.

याची देही,याची डोळा स्वतः अनुभव घ्यावा या म्हणीचा प्रत्यय घेऊन अनेकांनी त्यांच्या पद्धतीने व मार्गदर्शन घेऊन आपल्या ऊत्पादनात भरीव अशी वाढ केली आहे. यांची शेती ही शेती नसुन एक प्रयोगशाळा बनली आहे. चीलगव्हान येथील साहेबराव करपे यांची देशातील पहीली सहकुटुंब शेतकरी आत्महत्या याच तालुक्यातुन झाली होती हे या ठिकाणी विशेषत्वाने नमुद करावे लागेल आणि आज याच शिवारात शेतकर्यांना आत्महत्या करण्यापासुन वाचवण्यासाठी याच शिवारातील अमृतराव देशमुख यांचा यशस्वी प्रयोग गगन भरारी घेतो आहे. हा दुर्मिळ योगायोग समजावा की, नैसर्गिक चमत्कार कुठलीही अनुकुल परीस्थिती नसतांना एकरी 40 क्वीटंल कापुस,20 क्विटंल सोयाबीन, चणा एकरी 18 क्विंटल,उस एकरी 85 टण ही साधारण बाब नाही. आच मार्च च्या शेवटी सर्व राज्यातील कापुस हंगाम आटोपला परंतु देशमुख यांच्या शेतातील कापुस भरावर आहे आणि आजुन दोन महिने ऊनंगवाडी होणार नाही. त्यामुळे कपाशी पिक हे हंगामी नसुन वार्षिक आसल्याचे सीध्द होत आहे. ही यशस्वी प्रयोगशीलता समुद्रापार गेल्याने ईटली या देशातील एक टिम मागील पंधरवड्यात भेट देऊन माहिती घेऊन गेली व देशमुख यांना ईटली दौऱ्यावर येण्यास विनंती केली. यात प्रामुख्याने नुरीना,फ्रान्सको,लुरो हे ईटालीचे शेती तज्ञ होते तर त्यांचे सहकारी मुंबई येथील राज हे सुद्धा होते. कपाशी प्लाट बघुन आश्चर्यचकित झाले. यावेळी स्थानिक चे बाळुपाटील दुपात्रे,सतीष ठाकरे,व अमृत पॅटर्न चे जनक अमृतराव देशमुख व संचालक दिनेश देशमुख यांनी सुध्दा उपस्थित राहुन सवीस्तर मार्गदर्शन केले. यानंतर अमेरीकन कापुस संशोधक सुध्दा या प्लाटला भेट देण्यासाठी येणार असल्याचे देशमुख यांनी यावेळी सांगितले अमृतराव देशमुख यांच्या यशस्वी प्रयोगशीलतेची कहानी विदेशातील तज्ञापर्यतं जाऊन पोहचली आणि तीथुन इथपर्यंत माहीती घेण्यासाठी येतात परंतु आपल्या देशातील व राज्यातील शासनाला किवां शास्त्रज्ञ इत्यादींना वेळ नाही किंवा ईच्छशत्की नाही हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

# महिला स्वयंसहाय्य बचत गटांच्या उत्पादनासाठी माविमची 'नवतेजस्विनी प्रदर्शनी'

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - राज्य शासनाच्या विविध जिल्हास्तरीय कार्यालयांच्या संयुक्त विद्यामाने आयोजित पाच दिवसीय यवतमाळ महोत्सवात महिला स्वयंसहाय्य बचत गटांच्या उत्पादनांसाठी बाजारपेठ म्हणून महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) मार्फत 'नवतेजस्विनी प्रदर्शनी' भरविण्यात आली आहे.

या प्रदर्शनीमध्ये जिल्ह्यातील ७६ महिला स्वयं सहाय्य बचत गटांनी सहभाग घेतला असून या मध्ये गृह उपयोगी वस्तू, कडधान्य, बांबू उत्पादने, माती ची भांडे, विविध धान्ये, शोभिवंत वस्तू, खाद्यपदार्थ अशी विविध उत्पादने खरेदी विक्रीसाठी उपलब्ध करण्यात आली आहेत. महिला स्वयं



सहाय्य बचत गटांनी निर्मित उत्पादने जास्तीत जास्त खरेदी करावे, असे आवाहन महिला आर्थिक विकास महामंडळ व जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

यासोबतच, खाद्यपदार्थांची आवड असलेल्या खाद्यप्रेमींसाठी 'खाद्य जत्रा'चे आयोजन करण्यात आले आहे. या खाद्य जत्रेत अससल मराठी खानावळींचे खाद्यपदार्थ विक्रीसाठी स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. या 'खाद्य जत्रा'ला खवय्यांनी आणि यवतमाळ जिल्ह्यातील नागरिकांनी भेट देवून खाद्यपदार्थांचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्ययात आले.

### प्रा.राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्चचा दीक्षांत समारंभ

# ७२२ पदवीधर, १८४ पदव्युत्तर व १२ पीएच.डी.विद्यार्थ्यांना पदवी प्रदान

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ यूथ वेलफेयर संस्थेच्या अंतर्गत प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च, बडनेरा येथे बॅच २०२५ चा दीक्षांत समारंभ दिमाखदार वातावरणात पार पडला. या सोहळ्यात एकूण ७२२ पदवीधर, १८४ पदव्युत्तर विद्यार्थी तसेच १२ पीएच.डी. धारकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. याप्रसंगी उत्कृष्ट शैक्षणिक यश संपादन करणाऱ्या ३५ गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करून त्यांना गौरविण्यात आले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ यूथ वेलफेयर संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे हे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना जीवनात यशस्वी होण्यासाठी सातत्य, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम





यांचे महत्त्व पटवून दिले. तसेच, विद्यार्थ्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाशी सुसंगत राहून समाजाभिमुख दृष्टीकोन ठेवावा, असेही त्यांनी आवाहन केले.प्रमुख अतिथी म्हणून यास्कावा इंडिया प्रा. लि. चे डायरेक्टर व सीओओ

## ३५ गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष गौरव

तसेच संस्थेचे माजी विद्यार्थी अजय गुर्जर उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात उद्योग क्षेत्रातील अनुभव कथन करत विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी आवश्यक कौशल्ये, नवनवीन तंत्रज्ञानाचे ज्ञान आणि सकारात्मक दृष्टीकोन यांचे महत्त्व अधोरेखित केले.सोहळ्याला व्यासपीठावर विदर्भ यूथ वेलफेअर संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजेंद्र बामनोटे, दीक्षांत समारंभाचे समन्वयक प्रा. विनय काळे व डॉ. निक्कू खालसा यांची प्रमुख उपस्थिती होती.संचालन डॉ. निकेता कदम व प्रा. रसिका वडवेकर यांनी डॉ. निक्कू खालसा यांनी आभार प्रदर्शन केले.समारंभास मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक व प्राध्यापक उपस्थित होते. विदर्भा यूथ वेलफेयर सोसाइटीचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ हेमंत देशमुख,सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे,डॉ पूनम चौधरी, पंकज देशमुख,प्रा.विनय गोहाड, प्रा.गजानन काळे, प्राचार्य डॉ गजेन्द्र बामनोटे यांनी विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले.

---

## संक्षिप्त



### मिरवणुकीत भक्तांना ताकाचे वाटप

**अमरावती-**दिगंबर जैन महासमिती व अभिनंदन पेंढारी मित्र मंडळी च्या वतीने श्री भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सवा निमित्य मिरवणुकीतील सर्व बंधु भगिनींना गांधी चौक येथे थंडगार मसाला ताकाचे वाटप करण्याचा कार्यकम व गौमातेला पालक व गुळ देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी माजी महापौर तथा विरोधी पक्षनेता विलास इगोले, स्थायी समिती सदस्या ललिता सुरेश रतावा, संगीता उल्हास क्षीरसागर, अनिल सुराणा, पुरुषोत्तम मुंदडा, दिपक हुंडीकर, शितल सिघवी, महेंद्र देशमुख, विजय बर्वे, मनिष पावडे, संजय जैन, अजय कोलपकर, जगदीश सायसिकमल, अनित आशाली पेंढारी, प्रमोद रसिका पेंढारी, अतुल कळमकर, मंजुषा गुलालकरी, सर्वज्ञ् पावडे आदी उपस्थित होते.

### घराची भिंत कोसळून मजुराचा मृत्यू

**अमरावती-**बांधकाम सुरू असलेल्या एका घराची भित मजुराच्या अंगावर कोसळली. त्यात मजुराचा मृत्यू झाला. ही घटना शनिवार, २८ मार्च रोजी सकाळी रहिमापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एकलारा गावात घडली. या प्रकरणी घरमालकावर निष्काळजीपणाचा ठपका ठेवून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. प्रफुल्ल श्रीकृष्णा शेवाने (३५) रा. एकलारा असे मृतकाचे नाव आहे. या प्रकरणी घरमालक गजानन देविदास काकड (४२) रा. एकलारा याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. प्रफुल्ल शेवाने हे गजानन काकड याच्या घराच्या बांधकामावर मजूर म्हणून काम करीत होते. त्यावेळी खांबासहित भिंत अचानक त्यांच्या अंगावर कोसळली. त्यात त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मृत प्रफुल्ल शेवाने यांचे भाऊ अनिल (३०) यांनी रहिमापूर ठाण्यात तक्रार दाखल केली.तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

---

### श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा

# माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाशी दृढ नाते ठेवावे-प्रा.सी.डी.देशमुख

**अमरावती/का.प्र.**

श्री शिवाजी शिक्षण संस्था अंतर्गत श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाला माजी विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.अध्यक्षस्थानी माजी विद्यार्थी संघटनेचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. शशांक देशमुख होते तर प्रमुख अतिथी म्हणून संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे माजी कुलसचिव तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे आजीवन सदस्य, शिवाजी बी.एड्.सत्र १९७५-



७६ चे विद्यार्थी प्रा.सी.डी.देशमुख हे उपस्थित होते.

विचारपिठावर संघटनेचे सचिव प्राचार्य डॉ.संजय खडसे, कोषाध्यक्ष डॉ.वनिता काळे,कार्यकारिणी सदस्य प्रा.डॉ.शिवाजी देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विनय राऊत,प्रा.डॉ.अंजली ठाकरे,सत्र २०००-२००१ ची विद्यार्थीनी मनिषा रहाटे आदी उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी प्रा.सी.डी. देशमुख यांनी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाशी नाते दृढ ठेवून विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सहकार्य करावे असे आवाहन माजी विद्यार्थ्यांना केले.मेळाव्यात माजी विद्यार्थीनी मनिषा रहाटे यांनी आपल्या अनुभवांना उजाळा देत महाविद्यालयीन आठवणींना उजाळा दिला. तसेच सध्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत करिअरविषयक महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.शशांक देशमुख यांनी विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन केले.याप्रसंगी माजी विद्यार्थी संघटने तर्फे दिपाली गोंडेकर व सम्यक बोरकर यांना प्रा. सी. डी. देशमुख यांच्या हस्ते शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. तसेच बी.एड्.चे अक्षय बनसोड ह्याला शिष्यवृत्ती डॉ.अंजली ठाकरे यांच्या हस्ते देण्यात आली.यावेळी माजी विद्यार्थी-विद्यार्थीनीसह नियमित बी.एड्.चे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक प्राचार्य डॉ.संजय खडसे,संचालन डॉ. वनिता काळे यांनी तर आभारप्रदर्शन वैष्णवी सानप यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा.डॉ. वनिता काळे, प्रा.डॉ. अंजली ठाकरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सोहळ्यास महाविद्यालयाचे प्रा.डॉ.संगीता बिहाडे, प्रा.डॉ. वैशाली कडू, प्रा.डॉ शिल्पा येळणे,प्रा.सुकेश्वनी घोडेस्वार, प्रा.मनीषा लकडे तसेच शिक्षकेतर कर्मचारी राजू जामनीक,सुनीता गावंडे, संजय बोबडे, ईश्वर बोंडे, प्रतीक वानखडे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## वाढत्या उष्णतेवर मात करण्यासाठी मनपात 'कूल रूफ नियमावली'

**अमरावती/का.प्र.**

गेल्या काही वर्षांत अमरावती शहरात जाणवणारी भीषण उष्णलहर आणि सतत वाढणाऱ्या तापमानाचा प्रभाव कमी करण्यासाठी अमरावती महानगरपालिकेने एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. बांधकामाच्या नियमावलीत थेट उष्णता निवारण उपायांचा समावेश करून मनपाने 'कूल रूफ नियमावली-२०२५' लागू केली आहे. अशा प्रकारची नियमावली कार्यान्वित करणारी अमरावती महानगरपालिका ही राज्यातील पहिलीच

**नियमावली लागू करणारे राज्यातील पहिले शहर**

महानगरपालिका ठरली आहे.

सन २०२४ मध्ये रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानावर आधारित जमिनीच्या पृष्ठभागाच्या तापमानाचे सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वेक्षणातून असे समोर आले की, दाट लोकवस्तीच्या भागात तापमान ५३.७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत आहे, तर पत्र्याच्या छताच्या इमारतींमध्ये हे तापमान नेहमीच ४७ अंशांच्या आसपास असते. ही बाब लक्षात घेऊन मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी २०२५ मध्ये 'कूल रूफ नियमावली' अधिसूचित करण्याचा निर्णय घेतला. राज्य सरकारच्या १५० दिवसांच्या विशेष प्रशासकीय कार्यक्रमांतर्गत ही संकल्पना मांडण्यात आली होती. याचा परिणाम केवळ तापमानावरच नाही, तर विजेची मागणी आणि सार्वजनिक आरोग्यावरही होत आहे. त्यामुळे नवीन नियमानुसार, सर्व शासकीय, व्यावसायिक आणि सार्वजनिक इमारतींसह ५०० चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्रफळ व १५ मीटरपेक्षा जास्त उंची असलेल्या इमारतींसाठी 'कूल रूफ'ची अट अनिवार्य करण्यात आली आहे. इमारतीचा नकाशा मंजूर करतानाच या तरतुदींचा समावेश करणे बंधनकारक असून, भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी प्रत्यक्ष पाहणी केली जाईल. निवासी इमारतींसाठी १०तर व्यावसायिक इमारतींसाठी ५टक्के मिळकत करात सवलत मिळेल. ही सवलत तीन वर्षांसाठी लागू असेल. यासाठी 'कूल रूफ पोर्टल' सुरू करण्यात आले.

---

## वेगवेगळ्या घटनांमध्ये पाच जणांनी आत्महत्या

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यात ग्रामीण भागात वेगवेगळ्या घटनांमध्ये पाच जणांनी आत्महत्या केल्या असून, त्यापैकी चौघांनी गळफास घेतला. त्यापैकी चौघांनी गळफास घेतला. त्यापैकी तीन घटना या परवाडा हद्दीत घडल्या, तर एका अल्पवयीन मुलीने विषारी औषध प्राशन केल्याने तिचा मृत्यू झाला आहे.

धारणी तालुक्यातील राजपूर ते सुसर्दा मार्गावर संजुलाल भैयालाल कास्देकर (४३) यांनी रस्त्याच्या कडेला असलेल्या बेहाडाच्या झाडावर स्वतःच्याच टॉवेलने गळफास लावून आत्महत्या केली. संजूलाल यांच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. धारणी पोलिसांनी आकस्मिक मृत्यू, अशी नोंद घेतली.दुसरी घटना परतवाडा हद्दीत एका हॉस्पिटलजवळ घडली. सुरेश मारोतराव साखरे (५८) यांनी किराणा दुकानाच्या गोदामामध्ये दोराने गळफास घेऊन आत्महत्या केली. साखरे यांच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. परतवाडा ठाण्यात



आकस्मिक मृत्यू, अशी नोंद घेण्यात आली. परतवाडा हद्दीतच दुसरी घटना पांडुरंगनगर, कांडली भागात घडली. मनोज भानुदास हाते (४०) यांनी स्वतःच्या घरातच पाळण्याच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. तिसरी घटना परतवाडा हद्दीतच धामणगावगढी येथे घडली. अनिकेत प्रमोद काकडे (३०) यांनीही घरातच गळफास घेऊन आत्महत्या की आहे. मनोज व अनिकेत या दोघांच्याही आत्महत्येचे कारण समजू शकले नाही.वरुड ठाण्याच्या हद्दीत एका परिसरात अल्पवयीन मुलीने (१५) उंदीर मारण्यासाठी उपयोगात येणारी औषध प्राशन केल्यामुळे तिची प्रकृती बिघडली. उपचारांकरिता तिला रुग्णालयात दाखल केले होते; मात्र त्या मुलीचा मृत्यू झाला आहे.

---

# प्रशासनाचे भाविकांच्या सुविधांकडे दुर्लक्ष-प्रभाकर भगोले

### श्री विठोबा संस्थानचा यात्रा महोत्सव नियोजनबद्ध

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

श्री विठोबा संस्थान, सावंगा विठोबा तर्फे आयोजित गुढीपाडवा-रामनवमी यात्रा महोत्सव अत्यंत उत्साहात व शिस्तीत पार पडला. या यशाचे संपूर्ण श्रेय येथील विश्वस्त मंडळाच्या उत्कृष्ट नियोजनाला जात असल्याचे मत व्यक्त होत असतानाच, भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा पुरविण्यात प्रशासन व लोकप्रतिनिधी अपयशी ठरल्याचे चित्रही यावेळी पाहायला मिळाले, अशी खंत ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर भगोले यांनी व्यक्त केली.

या ठिकाणी महाराष्ट्र नव्हे तर इतर राज्यातून भाविक दर्शनासाठी येतात. या यात्रेचे आयोजन जिल्हा परिषद अधिनस्त होत असल्याने यात्रा नियोजनाचे दृष्टीने भाविकांकरिता आवश्यक सुविधांचा अभाव दिसून येत आहे,या यात्रेकरिता विशेष बाब म्हणून जिल्हा परिषदचे अर्थसंकल्पात भरीव निधीची तरतूद करण्यात यावी.अवधूत महाराजांचे 'ब' वर्ग दर्जा प्राप्त असलेल्या या देवस्थानाकडे जाणारे रस्ते अत्यंत खराब अवस्थेत असल्याने भाविकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. तसेच गावाशेजारील नदीवरील पुलावर कठडा नसल्यामुळे भाविकांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे. यावेळी वर्षभर प्रसादालयात सेवा देणाऱ्या देवबहिणींचा साडी-चोळी, शेला व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.अवधुत नाम प्रचारिका रेखा गायकवाड यांनी सुमधुर वाणीने महाराजांचे ओवीवर साथसंगतसह प्रवचनाचे सादरीकरण केले.संचालन व्यवस्थापक रवि कलाने प्रास्ताविक अध्यक्ष नेमाडे तर आभार प्रदर्शन सचिव अशोक सोनवाल यांनी मानले.यावेळी उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल तसेच विश्वस्त विनायक पाटील, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड,




चरणदास कांडलकर, प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर, स्वप्निल चौधरी यांच्यासह ज्येष्ठ पत्रकार प्रभाकर भगोले, विवेक राऊत, रितेश मुंधडा, संतोष वाघमारे, प्रकाश रंगारी, राजीव शिवनकर, प्रशांत सिसोदिया आदी उपस्थित होते.

---

# स्व.दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयात पदवी वितरण सोहळा

### कुलसचिव डॉ अविनाश असनारे यांनी पदवीधारकांना दिला यशाचा मंत्र

**अमरावती/का.प्र.**

नांदगाव पेठ येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात सातवा पदवी वितरण समारंभ संपन्न झाला. स्व. दत्तात्रय पुसतकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्रीमती वृषाली पुसतकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या पदवी वितरण समारंभाचे मुख्य पाहुणे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सन्माननीय कुलसचिव डॉ. अविनाश असनारे होते. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे सचिव श्रीकृष्ण बाळापुरे, संचालक रेवन पुसतकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर पदवी वितरण समारंभाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांनी सर्व पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तसेच त्यांनी प्रास्ताविकातून



महाविद्यालयाच्या यशस्वी वाटचालीचा आणि महाविद्यालयाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची सविस्तर माहिती दिली. त्यानंतर उन्हाळी २०२५ च्या परीक्षेत बी.ए.ची पदवी पूर्ण करणाऱ्या एकूण ४४ पदवीधारकांना मुख्य पाहुण्यांच्या हस्ते पदवी वितरण करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रासोबत संस्थेचे सचिव श्रीकृष्ण बाळापुरे यांच्या वतीने स्व. नारायणरावजी बाळापुरे यांच्या स्मृतिपित्यर्थ सन्मानचिन्ह देण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठाच्या परीक्षेत महाविद्यालयातून सर्वाधिक गुण प्राप्त करणारे गुणवंत विद्यार्थीनी सपना धर्माळे यांना स्व. दत्तात्रय पुसदकर स्मृती पारितोषिक २०००/-रू व स्व. शंकररावजी हिवसे स्मृती पारितोषिक रोख रक्कम २०००/-रू,कु.वैष्णवी गायकवाड यांना स्व. सुमनबाई शंकररावजी हिवसे स्मृती पारितोषिक रोख रक्कम २०००/- रू., राधिका पुरी यांना सोमेश्वर पुसतकर स्मृती पारितोषिक रोख रक्कम २०००/-रू, शिवाय खोखो व कबड्डी या क्रीडा प्रकारात उत्तम कामगिरी करीत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकडून कलर कोड मिळविणारे रेश्मा गजभिये आणि वेदांत भटकर यांना स्व. कमलताई दादारावजी दरणे स्मृती पारितोषिक रोख रक्कम प्रत्येकी १००१/-रू. आणि राष्ट्रीय सेवा योजनेत उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून कार्य करणारे योगेश महाजन व .निहारिका डोईफोडे यांना स्व. दादारावजी दरणे स्मृती पारितोषिक रोख रक्कम प्रत्येकी १००१/- रू. देण्यात आले.

पदवी वितरण समारंभाचे अध्यक्ष वृषाली पुसतकर यांनी याप्रसंगी सर्व पदवीधारकांना पुढील यशस्वी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.संचालन डॉ. पी. आर.जाधव व डॉ. पंकज मोरे यांनी केले. या समारंभाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष वृषाली पुसतकर, उपाध्यक्ष निदान बारस्कर, सचिव श्रीकृष्ण बाळापुरे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर हिवसे, संचालक रेवन पुसतकर आणि प्राचार्य डॉ. विजय दरणे यांच्या मार्गदर्शनानुसार डॉ. पी. आर. जाधव, डॉ.राजेश ब्राह्मणे, डॉ.श्रीकांत माहुलकर, डॉ.सुनिता बाळापुरे, डॉ.गोविंद तिरमनवार, डॉ.सुभाष पवार, डॉ.विकास अडलोक, रेखा पुसतकर, दिलीप पारवे, विनायक पावडे, राहुल पांडे, अनिल शेवतकर या सर्वांनी परिश्रम घेतले.

---

## ग्राहकांच्या हितासाठी ग्राहक पंचायत झटणार-कमल केजडीवाल

**अचलपूर/वार्ताहर**

अखिल भारतीय ग्राहक पंचायत गेल्या कित्येक वर्षापासून कार्यरत असून सातत्याने ग्राहकांच्या हितासाठी त्यांच्या रक्षणासाठी सतत झटत आहे.आणि यापुढे ही झटणार असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे तालुका अध्यक्ष कमल केजडीवाल यांनी केले. येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय अचलपूरच्या सभागृहात पुरवठा विभागाने आयोजित ग्राहक दिनाच्या कार्यक्रमात कमल केजडीवाल बोलत होते.यावेळी मंचावर नायब तहसिलदार मनिष देशमुख, निरिक्षण अधिकारी राहुल केदारे ,ग्राहक पंचायतच्या सचिव ॲड माधुरी भवाळकर, डॉ. दिपक गुल्हाणे ,साहेबराव दामोधरे ॲड .रूपेश वाजपेयी, लिलाधर शेवतकर,गौरव दिक्षित, स्वनिल नवरे सह आदी



मान्यवर विराजमान होते.निरिक्षण अधिकारी राहुल केदारे यांनी आपल्या प्रास्ताविकात युद्धामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत अफवांवर कुणीही विश्वास ठेऊ नये. आणि एक सुजाण नागरीकाप्रमाणे आपले कर्तव्य पार पाडावे. तद्वतच ॲड माधुरी भवाळकर, साहेबराव दामोदरे, ॲड. रुपेश वाजपेयी, हिमांशु चव्हाण यांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फोटोंना मान्यवरांच्या हस्ते पूजनासह माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालणासह आभार कैलास गुळसुंदरे यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राहुल गोंगे राजु झोड, मनिष शिंगणे, सुप्रित पाटस्कर, चेतन माधणे किशोर ठाकुर, अशोक बुधवानी, मनिष शिंगाळे, यानी कसोशिचे प्रयत्न केले.

# महाराष्ट्राची 'एफस्टीन फाईल'

सत्ता, संपत्ती, लैंगिक शोषण आणि बुवाबाजीचा भयानक संगम भोंदूगिरी, राजकीय संरक्षण आणि शोषण:समाजाला जागे करणारे खरात प्रकरणासारखी समाजात अधूनमधून अशी काही प्रकरणे उघडकीस येतात, जी केवळ एका व्यक्तीच्या गुन्ह्यापुरती मर्यादित राहत नाहीत; ती संपूर्ण व्यवस्थेचे विद्रूप आणि अस्वस्थ करणारे वास्तव उघडे करतात. नाशिकमध्ये उघडकीस आलेले अशोक खरात प्रकरण हे त्यापैकीच एक धक्कादायक उदाहरण आहे. त्यामुळेच अनेकांच्या चर्चेत या घटनेला 'महाराष्ट्राची एफस्टीन फाईल' अशी उपमा दिली जात आहे.'एफस्टीन फाईल' हा संदर्भ जगभर गाजलेल्या एका गंभीर प्रकरणाशी जोडलेला आहे. अमेरिकेतील अब्जाधीश जेफ्री एपस्टीन याने सत्ता, पैसा आणि प्रभाव यांचा वापर करून अनेक अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण केले होते.त्याचे राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तींशी संबंध असल्यामुळे तो दीर्घकाळ कायद्याच्या कचाट्यातून सुटत राहिला. या प्रकरणामुळे जगभरात सत्ता, संपत्ती आणि लैंगिक शोषण यांच्यातील धोकादायक संबंधांवर मोठ्या प्रमाणात चर्चा झाली. महाराष्ट्रातील अशोक खरात प्रकरणाची रचना पाहिली असता त्या घटनेची आठवण होणे स्वाभाविक वाटते.या प्रकरणातील सर्वात चिंताजनक बाब म्हणजे बुवाबाजी आणि सत्तेचा संगम. एखादा सामान्य गुन्हेगार इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि इतक्या दीर्घकाळ लोकांची फसवणूक करू शकत नाही. त्यासाठी सामाजिक मान्यता, राजकीय संरक्षण आणि आर्थिक पाठबळ आवश्यक असते. जेव्हा एखाद्या भोंदू बुवाच्या संपर्कात राजकारणी, अधिकारी किंवा प्रभावशाली व्यक्ती येतात, तेव्हा त्या व्यक्तीभोवती एक प्रकारचे 'दैवीकरण' निर्माण होते. त्याची प्रतिमा इतकी प्रभावशाली बनवली जाते की त्याच्याविरुद्ध बोलणे किंवा तक्रार करणे सामान्य लोकांसाठी जवळपास अशक्य होते.

या समीकरणातील दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे संपत्ती. अंधश्रद्धा, भीती आणि अज्ञान यांच्या आधारावर उभा राहिलेला हा एक मोठा 'व्यवसाय' असतो. अशा प्रकरणांमध्ये नोंद होणाऱ्या तक्रारी या बहुधा वास्तवाच्या केवळ एका छोट्या भागाचे प्रतिनिधित्व करतात. अनेक महिला भीती, लाज किंवा सामाजिक दबावामुळे पुढे येत नाहीत. त्यामुळे प्रत्यक्षात घडलेल्या घटनांचे चित्र कितीतरी अधिक गंभीर असण्याची शक्यता असते. म्हणूनच या प्रकरणात 'एफस्टीन फाईल' हा संदर्भ अधिक तीव्रतेने जाणवतो.कारण येथेही केवळ एक व्यक्ती नव्हे, तर एक संपूर्ण जाळे कार्यरत असल्याची शक्यता नाकारता येत नाही.या घटनांमधून आणखी एक गंभीर प्रश्न समोर येतो तो म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव. अशोक खरात प्रकरण उघडकीस आल्यानंतर आता सर्वात मोठी जबाबदारी शासन आणि न्यायव्यवस्थेवर आहे. तपास पूर्णपणे निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भय असणे अत्यावश्यक आहे. यात कोणताही राजकीय हस्तक्षेप होऊ नये. पीडित महिलांची ओळख सुरक्षित ठेवत सर्व दोषींना ते कितीही प्रभावशाली असले तरी कडक शिक्षा मिळाली पाहिजे. 'सत्ता – संपत्ती – लैंगिक शोषण – बुवाबाजी' हे समीकरण केवळ शब्दांचे सूत्र नाही; ते समाजासाठी एक गंभीर इशारा आहे. जर समाज वेळेत जागा झाला नाही, तर अशी प्रकरणे पुन्हा पुन्हा घडत राहतील आणि प्रत्येक वेळी त्याची किंमत समाजातील सर्वात कमजोर घटकांना मोजावी लागेल.समाजाने विवेक, विज्ञाननिष्ठा आणि मानवी मूल्यांचा मार्ग स्वीकारला तरच अशा अंधारमय घटनांना आळा बसू शकतो. अन्यथा 'एफस्टीन फाईल' सारखी प्रकरणे उघडत राहतील आणि समाजाला पुन्हा पुन्हा अस्वस्थ करत राहतील.

**प्रफुल्ल मंदा श्रीधर**
जिल्हा कार्याध्यक्ष, महाराष्ट्र
अंनिस, अमरावती

# भगवान महावीर अहिंसेचे तेजस्वी दीप

मानवजातीच्या इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की ज्यांनी आपल्या विचारांनी, तत्त्वज्ञानाने आणि आचरणाने संपूर्ण मानवजातीला एक नवी दिशा दिली. अशा तेजस्वी आणि कालातीत व्यक्तिमत्त्वांमध्ये भगवान महावीर यांचे स्थान अत्यंत उंच आहे. चैत्र महिन्यात साजरी होणारी महावीर जयंती ही केवळ धार्मिक उत्सव नसून ती मानवी मूल्यांचा जागर करणारी, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारी आणि नैतिकतेचा मार्ग दाखवणारी एक महत्त्वपूर्ण पर्वणी आहे. आजच्या वेगवान, स्पर्धात्मक आणि तणावपूर्ण जीवनात महावीरांचे विचार अधिकच सुसंगत आणि आवश्यक वाटतात.

वयाच्या तिसाव्या वर्षी त्यांनी सर्व सांसारिक बंधनांचा त्याग करून तपश्चर्येचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय अत्यंत कठीण होता, कारण त्यासाठी त्यांना कुटुंब, संपत्ती आणि सर्व सुखसुविधांचा त्याग करावा लागला. त्यांनी जवळपास बारा वर्षे अत्यंत कठोर साधना केली. या काळात त्यांनी उपास, ध्यान, मौन आणि आत्मसंयम यांचा कठोर अभ्यास केला. अनेक अडचणी, संकटे आणि अपमान सहन करूनही त्यांनी आपला मार्ग सोडला नाही. अखेरीस त्यांनी कैवल्यज्ञान प्राप्त केले आणि 'महावीर' म्हणून ओळखले जाऊ लागले.



महावीरांचे तत्त्वज्ञान अत्यंत व्यापक आणि जीवनोपयोगी आहे. त्यांनी पंचमहाव्रतांचा उपदेश केला. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह. या पाच तत्त्वांमध्ये संपूर्ण नैतिक जीवनाचा सार दडलेला आहे. अहिंसा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे केंद्रस्थान आहे. त्यांनी केवळ शारीरिक हिंसा टाळण्याचा उपदेश केला नाही, तर मन, वाणी आणि कृतीतून कोणालाही दुखावू नये, असा व्यापक संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक जीवामध्ये आत्मा आहे आणि प्रत्येकाला जगण्याचा समान अधिकार आहे. सत्य हा दुसरा महत्त्वाचा सिद्धांत आहे. महावीरांनी सत्याला सर्वोच्च स्थान दिले. त्यांनी सांगितले की सत्य म्हणजे केवळ खोटे न बोलणे नव्हे, तर न्याय, प्रामाणिकपणा आणि नैतिकता यांचे पालन करणे होय. आजच्या समाजात, जिथे असत्य आणि फसवणूक वाढत आहे, तिथे सत्याचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे.

अस्तेय म्हणजे चोरी न करणे. परंतु त्याचा अर्थ केवळ भौतिक वस्तूंची चोरी टाळणे एवढाच नाही, तर दुसऱ्याच्या हक्कावर अतिक्रमण न करणे, अन्यायाने लाभ मिळवू नये, असा व्यापक अर्थ त्यामध्ये अंतर्भूत आहे. ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ही तत्त्वे मानवी जीवनाला संयम आणि संतुलन शिकवतात. ब्रह्मचर्य म्हणजे इंद्रियसंयम, तर अपरिग्रह म्हणजे अनावश्यक वस्तूंचा त्याग.

आजच्या उपभोगवादी संस्कृतीत अपरिग्रहाचा संदेश अत्यंत महत्त्वाचा आहे.महावीरांनी 'अनेकांतवाद' हा अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत मांडला. या तत्त्वानुसार कोणत्याही गोष्टीकडे एकाच दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. प्रत्येक गोष्टीचे अनेक पैलू असतात आणि प्रत्येक व्यक्तीचा दृष्टिकोन वेगळा असू शकतो. त्यामुळे सहिष्णुता आणि संवाद यांना महत्त्व दिले पाहिजे. आजच्या समाजात वाढत्या मतभेदांच्या पार्श्वभूमीवर हा विचार अत्यंत उपयुक्त ठरतो.

महावीरांचे तत्त्वज्ञान केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक सुधारणांसाठीही प्रेरणादायी आहे. त्यांनी जातिभेद, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांचा विरोध केला. त्यांनी सर्वांना समानतेचा आणि बंधुत्वाचा संदेश दिला. त्यांच्या मते, प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या कर्मांद्वारे उन्नती साधू शकते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारक होता.

महावीर जयंती हा दिवस या सर्व विचारांचे स्मरण करून देणारा आहे. या दिवशी जैन समाजात विविध धार्मिक कार्यक्रम, पूजा, प्रवचने आणि मिरवणुका आयोजित केल्या जातात. मंदिरांमध्ये विशेष सजावट केली जाते आणि महावीरांच्या मूर्तीची पूजा केली जाते. अनेक ठिकाणी दानधर्म आणि सामाजिक सेवा उपक्रम राबवले जातात. परंतु या उत्सवाचा खरा अर्थ केवळ या विधींमध्ये नसून त्यांच्या तत्त्वांचे आचरण करण्यात आहे.आजच्या आधुनिक युगात, जिथे तंत्रज्ञानाची प्रगती होत आहे, परंतु मानवी मूल्ये कमी होत चालली आहेत, तिथे महावीरांचे विचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या शिकवणुकीमुळे आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो. अहिंसा, सत्य आणि संयम या मूल्यांचा अवलंब केल्यास समाजात शांतता आणि समन्वय निर्माण होऊ शकतो.

आजच्या आधुनिक युगात, जिथे जीवन अधिक वेगवान आणि स्पर्धात्मक झाले आहे, तिथे माणसामध्ये तणाव, असुरक्षितता आणि असंतोष वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत महावीरांचे तत्त्वज्ञान आपल्याला मानसिक शांती आणि स्थैर्य मिळवण्याचा मार्ग दाखवते. ध्यान, संयम आणि आत्मपरीक्षण यांचा अवलंब केल्यास आपण आपल्या जीवनात संतुलन साधू शकतो.शेवटी असे म्हणता येईल की, महावीर जयंती हा केवळ एक धार्मिक उत्सव नसून तो मानवतेचा उत्सव आहे. हा दिवस आपल्याला आत्मपरीक्षण करण्याची, आपल्या जीवनातील त्रुटी सुधारण्याची आणि एक चांगले माणूस बनण्याची प्रेरणा देतो.

भगवान महावीर यांचे तत्त्वज्ञान हे आजही तितकेच जिवंत आणि उपयुक्त आहे. त्यांच्या विचारांचा अवलंब करून आपण एक शांत, समतामूलक आणि नैतिक समाज निर्माण करू शकतो. त्यामुळे महावीर जयंती साजरी करताना त्यांच्या शिकवणुकीचा अंगीकार करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# पाश अंधश्रद्धेचा

***नको नको ज्योतिषा***
***माझ्या दारी नको येऊ***
***माझे दैव मला कळे***
***माझा हात नको पाहू***

कधीही शाळेत न गेलेल्या बहिणाबाई. १८८० च्या काळात कठीण कौटुंबिक आणि सामाजिक परिस्थितीचा सामना करत, कर्तृत्वावर विश्वास ठेवत, सूक्ष्म निरीक्षण शक्ती बाळगत व ज्योतिषाला आपल्या दारी नं येण्याचा सल्ला देतात. स्त्री शिकली की अन्नाच्या अळ्या होतात असा समज पसरवून चार भिंतीच्या आत तिचा वावर ज्या धर्मग्रंथांनी अंकित करून ठेवला त्याला आव्हान देत १९४८ मध्ये ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी महिलांसाठी पहिली शाळा काढली. स्त्रियांनीही मग मागे वळून न पाहता, जिद्दीने बुद्धिमत्तेच्या भरवश्यावर वेगवेगळ्या क्षेत्रात दैदीप्यामान प्रगती केली. परंतु अजूनही बहुतांश स्त्रियांच्या मन आणि मेंदूवर धर्माचा पगडा कायम आहे. आधुनिक काळातील शिकलेल्या स्त्रीया त्याच सावित्रीबाईंच्या शाळेकडे पाठ करून पोथ्या हातात घेऊन जेव्हा वाचतात तेव्हा संतांचा पुरोगामी महाराष्ट्र अधोगतीला जात असल्याचा पुरावा असतो. स्त्रियांची ही मानसिक गुलामगिरी तिला थेट बुवा बाबाच्या दारात तिला घेऊन जाते व यातूनच जन्म होतो तो आसाराम बापू, राम रहीम आणि अशोक खरात सारख्या भोंदू बाबाचा.

सध्या अख्ख्या महाराष्ट्रात गाजत असलेले प्रकरण म्हणजे अशोक खरात, नाशिक जिल्ह्यात सिन्नर या गावी एक मोठे ईशान्येश्वर मंदिर याने उभारले. त्याकरीता दीड कोटीचा शासकीय निधी सुद्धा त्याला मिळाला म्हणे. हा अंकगणिताच्या आधारावर ज्योतिष कथन करणारा महाराज म्हणून प्रसिद्ध झाला. अनेक स्त्रियांना नादी लावून आपल्या केबिनमध्ये अश्लील कृत्य करतानाचे व्हिडिओ याचे मोठ्या प्रमाणात व्हायरल झालेत. त्यात कळस म्हणजे रूपाली चाकणकर यांनी या भोंदूच्या डोक्यावर छत्री धरण्यापासून तर त्याचे पाय धुण्यापासून पर्यंत कामे करून राज्य महिला आयोगाच्या पदाची गरिमा धुळीस मिळवली.एकीकडे महाराष्ट्रात असंख्य बालके बेपत्ता आहेत, पिडीत माहिला, असिड हल्ले, बलात्कार ऑनरकिलिंग सारख्या घटना नित्याने घडत असताना, अत्याचारग्रस्त मुले व महिलांच्या न्यायासाठी झगडण्याऐवजी त्या भोंदूच्या मागे लागल्या, हे लज्जास्पद होते. जेव्हा एखादी उच्चशिक्षित, उच्च पदावर आरुढ असलेली व्यक्ती अशा प्रकारची कृती करते तेव्हा समाज त्याचे अनुकरण करतो आणि असंख्य




स्त्रिया अश्या भोंदूकडे ओढल्या जातात.

बरं दुसऱ्यांचे भविष्य कथन करणाऱ्या या भोंदुला मात्र स्वतःचे भविष्य दिसले नाही. अशोक खरात हा महाराष्ट्रातील जादूटोणा विरोधी कायदा अनुसूची २,५,११ क, अनुसूची तसेच नरबळीचीही शक्यता वर्तवली जात आहे.त्यामुळे अनुसूची ४, याद्वारा दोषी ठरवल्या जावू शकतो.अजून त्याचे बरेच कारनामे बाहेर यायचे आहेत त्यानुसार तो दोषी ठरेलच.महाराष्ट्र शासनाचा जादूटोणा विरोधी कायद्यातील तरतुदीतील अनुसूची २ नुसार एखाद्या व्यक्तीने तथाकथीत चमत्कारांचा प्रयोग प्रदर्शित करून त्याद्वारे आर्थिक प्राप्ती करणे, अतेंद्रिय शक्तींचा आभास निर्माण करून इतरांच्या मनात भीती निर्माण करणे, न ऐकल्यास वाईट परिणाम होतील अशी इतरांना धमकी देणे, फसवणे, ठगवणे हा जादूटोणाविरोधी कायदा अंतर्गत गुन्हा मानल्या गेला. कुणाचातरी आपण अवतार असल्याचे व स्वत:च पवित्र आत्मा असल्याचे भासवून किंवा त्याच्या नादी लागलेल्या व्यक्तीस पूर्वजन्मी तू माझी पत्नी पती वा प्रियसी होती, प्रियकर होता असे सांगून, अश्या व्यक्तीशी लैंगिक संबंध ठेवणे.मुल न होणाऱ्या स्त्रीला अलौकिक शक्ती द्वारा मुल होण्याचे आश्वासन देऊन तिच्याशी लैंगिक संबंध ठेवणे हा गुन्हा मानल्या गेलेला आहे. त्यापेक्षाही भयंकर गुन्हे या अशोक खरात माणसाने केलेले दिसून येतात.पाच नरबळी दिल्याचा देखील अंदाज वर्तवल्या बांधल्या जात आहे. यासाठीही जादूटोणाविरोधी कायद्यामध्ये वेगळे प्रावधान आहे.

आजचा काळ आधुनिकतेचा असला तरीही लोक मात्र प्रचंड मानसिक ताणतणावात जगत आहेत, मेंदूची अस्थिरता, अस्वस्थता, स्त्रियांचा भोळेपणा या मानसिकतेचा फायदा घेऊन बुवा बाबांचे दुकानदारी फोफावत आहे. दहा ठरवलेली वाक्य बोलून त्यातली दोन तरी किमान प्रत्येक व्यक्तीला लागू पडतात, त्यामुळे बाबा सर्वज्ञात आहे, त्याला आपल्या जीवनातल्या बऱ्याच गोष्टी माहिती आहेत व भविष्यही समजते यावर लोकांचा ठाम विश्वास बसतो.आजकाल माहिती गोळा करण्यासाठी निरनिराळ्या आधुनिक तंत्रांचाही उपयोग केल्या जातो. महाराष्ट्रामध्ये जादूटोणाविरोधी क्रांतिकारी कायदा असूनही या प्रकारच्या घटना घडणे लाजिरवाणी गोष्ट आहे. यातून सर्वांनीच बोध घेण्याची गरज आहे.

**डॉ. प्रा. सुचिता ठाकरे**
अ. भा. अंधश्रद्धा निर्मुलन समिती,
जिल्हा महिला संघटिका, वर्धा
मो.७६२०६८७७१९

# मोहिनी वंशाची 'जेंडर अ‍ॅन्ड आयडेंटिटी'



**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वा.प्राथमिक नाट्यमहोत्सव २०२५- २६.स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सीपना कॉलेज अमरावती येथे आयोजित २५ वे नाटक 'जेंडर अ‍ॅन्ड आयडेंटिटी' सादर करण्यात आले.लेखक डॉ. सोमनाथ सोनवळकर यांनी तृतीय पंथ असलेल्या माणसांच्या अस्तित्त्वाची जाणीव करून देण्यासाठी लिहिलेल्या या नाटकाचे दिग्दर्शन संजय पुरकर यांनी केले.**

रेल्वे स्टेशन वर चे दृश्य.ट्रेनमध्ये चढताना शीतल नावाच्या तरुणाला त्याच्या ओळखपत्रावरून हुज्जत घालते.एवढ्यात तृतीय पंथी रेल्वेस्थानकावर नेहमीच्या पैसे मागण्याच्या व्यवसायासाठी येतात.नुकतीच रेल्वेमधून उतरलेली एक पुरुष चेहऱ्यात साडी परिधानात भांबावलेली व्यक्ती डॉली व सिमरन नावाच्या तृतीय पंथाकडून तिची चौकशीनंतर तिचे नाव अनिरुद्ध, चेंबुर निवासी असल्याचे कळते.तिची पूर्ण चौकशी झाल्यानंतर डॉली तिचे नाव परी ठेवत, त्यांच्या वस्तीत परीला घेऊन जाते.

नानी ही तृतीय पंथाची प्रमुख, तिला परीचां परिचय डॉली करून दिल्यानंतर ती शिकलेली आहे म्हणून तिला जबाबदारी जास्त राहील असे सांगते.परी इथे कशी आली हे सांगताना परी आपल्या विश्वात जाते.फॅशन डिझाइन चे काम करीत असलेली अनिरुद्धची पत्नी यांचा नाटकात प्रवेश होतो.अनिरुद्ध संवेदनशील सामाजिक लेखक, रजनी त्याची पत्नी तिच्या सोबत संवाद सुरू असताना सिद्धांत त्यांचा मुलगा घर सोडून गेला.त्याची कारणे म्हणजे तो पुरुषी देहात स्त्री ची लक्षणे बाळगत होता.त्याला मज्जाव केल्याने तो घर सोडून गेला.त्याचा शोध घेणारा अनिरुद्ध स्वतःला स्त्री रूपात शोध घेतो.

सिद्धांत सुद्धा तृतीय पंथीचे वस्तीत प्रवेश करतो.त्याचे खुशी असे नामकरण विधी नानी करते.या सोहळ्याला अनिरुद्ध डॉली सह येते.मात्र सोहळा दुसऱ्या ठिकाणी असल्याने तो अनिरुद्ध खुशीला बघू शकला नाही.नानि तृतीय पंथाची वंशावळ व परंपरा सांगताना अरावणाने मोहिनीशी विवाह करून विधवा झाल्याचे सांगते.

डॉली, सिमरन वगैरे आणखी सपना हिच्या आयुष्याचे निर्वाण होत असल्याचे सांगत नशापाणी करते.येथे खुशीची एन्ट्री होते आणि परी म्हणजे सिद्धांतचे वडील दोघांची घालमेल.खुशी स्वतंत्र होऊन झालेला प्रसंग सांगताना लिंग परिवर्तनाचे ऑपरेशन करण्याबाबत निर्णय मात्र मान्यता मिळाली नसल्याने आईचे प्रति आरोप.रजनीमुळे सिध्दांत घर सोडून जाण्याचा प्रसंग उभा होतो.यावेळी साडीत असलेला नवरा बघून रजनी ची मनस्थिती.कायदेशीर वेगळे होण्याचा निर्णय.मुलगा व पती आयुष्यातून काढण्याचा निर्णय.खुशी तृतीय पंथासाठी वेगळे कार्य करण्याचा विचार करत असताना अचानक गुंडाची धाड, तिच्यावर अतिप्रसंग करून आयुष्य उध्वस्त झालेल्या मानसिकतेत कोमल स्वप्न चिरडलेला प्रसंग.रेल्वेखाली आत्महत्या.शव



कुणाचे यावर प्रश्न चिन्ह.खुशीची खुदखुशी. प्रसंगी नानी व तिचा समूह व्यवस्थेशी व लोकांशी न्याय मागण्याचे आवाहन करते.तृतीय पंथाला कुठले स्थान कुठली ओळख, लेखक म्हणून बाप म्हणून अनिरुद्धची काळीज भाजणारी दशा.सामाजिक प्रतिष्ठेत वावरणी आई मुलाचे स्त्रीपण स्वीकारू शकत नसल्याने झालेला कौटुंबिक विच्छेद.

पुन्हा एका व्यक्तीचे पाकीट रेल्वेत हरवल्याने त्याच्या ओळखीचे प्रमाण मागताना तो व ती याच्या संभ्रमात नाटक.तृतीय पंथाच्या अस्तित्वाला सामाजिक न्यायाची अपेक्षा नाटकात दाखवताना नाटकातील मोहिनी ही रावणाची पत्नी हा प्रसंग शोधावे लागणार.कारण विष्णू ने समुद्र मंथन करताना व भस्मासुराचा भस्म करताना धारण केलेला दाखला पुराणात आहे.त्यामुळे कथानकातील संभ्रम?

**एक टक नाटक**
**समीक्षण**

नेपथ्यात प्रकाश योजेतील निल प्रकाशाचे सातत्य, रेल्वेची दारे विचार करायला भाग पाडते.जुन्या स्टेशनवर महानगरपालिकेचा बेंच, सिद्धांतचे केस कृतिम अचानक वाढले, सिमरन ची चप्पल तुटण्यातून बुहारी हा वेळेवरचा प्रसंग, खुशीचे अत्याचारात लक्तरे दिसली नाही.अशा थोड्या फार उणिवात नाटक सुपरफास्ट स्पेशल एक्सप्रेस सारखे धिम्या गतीने झाले.संवाद फेक सिमरियनने अभिनयातून दाखवली.खुशी ही अलवचिक, ड्रेस व देहातून तृतीय वाटली.

लेखक जोर लाऊ शकला नाही, रजनी आईचे आत गेली नाही. नानी ही माणसाळलेला स्त्री वेश, स्वर खलनायकी, कृत्रिमपणा.डॉली हिने भूमिकेतील संवाद धरून ठेवले.एकंदर भावनिकतेला हात घालता नाही आला.दर्शकांचे वेशभूशामार्फत रंजन झाले.कथेतील उकल लगेच झाली.अशा प्रवाहात नाटक सादर करून तृतीय पंथाला न्याय अपेक्षितच राहिला.

अनिरुद्ध/परी कुशल पत्रे, सिद्धांत/खुशी सौरभ शेंडे, डॉली आकाश चव्हाण, नानी योगेश जाधव, सिमरन शंतनु सोलव, शीतल रोनीत पांडे हे प्रमुख भूमिका करणारे, संगीतकार प्रथमेश हाते, लायटिंग दीपक नांदगावकर यांच्या तालावर ममता दीपक नांदगावकर यांच्या नेपथ्यात सादरीकरण केले.मन देहाची सांगड घालणारी मानवी वंशातील तिसरी जमात म्हणून परंपरेत उपेक्षित का?या प्रश्नासाठी जेंडरे अँड आयडेंटिटी दर्शकांच्या शिटी टाळ्याच्या प्रतिसादात पार पडले.

एक टक नाटक बघताना समीक्षकांच्या चष्म्यातून जे दिसले, भासले तेच छापले.या स्पर्धेत सर्व कलावंत स्पर्धक म्हणून आपल्या अनावश्यक बाबी न्याहाळून कमी करतील व आणखी रेखीव, कोरीव आणि नाट्य अष्ट घटकातून नऊ रस उत्पत्तीची जागा घेतील हाच समीक्षण कार्याचा भाग आहे.कृत्रिम अभिनय व अस्सल अभिनय असा एटीट्यूड बाळगून कला व ती चे अवमूल्यन कलाकाराचे बोन्साय करू नये हाच समीक्षनाचा भाग आहे.प्रत्येकाला आपली ओळख करण्याचा हट्टहास त्याला मिळालेल्या भूमिकेच्या प्रमाणिक सादरीकरणातून न्याय ठरतो.पंच ज्ञानेंद्रियाचा उपयोग एकेठायी रंगमंचावर केवळ नाटकाचे मध्यातून साधता येणार योग आहे, त्याचे योग्य आकलन, केल्यानंतर परीक्षण झाल्यावर त्याचे समीक्षण हे त्याचे मूल्यांकन पूर्ण करण्याची ओळख आहे.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वर्षापासून ही नाट्य स्पर्धा आयोजित करून कलावंतावर उपकार करतात.

अधिकारी कर्मचारी व परीक्षक आपल्या आयुष्यातील बहुमोल वेळ स्पर्धा पूर्ण होई पर्यंत कुटुंब प्रमाणे आपले कुटुंब तेवढा वेळ दूर ठेऊन देतात.दर्शक हौशीने या हौशी नाटकाचे प्रयोग बघायला येतात.असा हा समाज जागृतीचा सोहळा सुमारे २३ फेब्रुवारी ते २९ मार्च २०२६ पर्यंत सुरू होता.यात सहभागी झालेल्या विभागातील पाचही जिल्ह्यातील नाट्य कलाकार बॅक स्टेज ऑन स्टेज सहभागी झाले.त्यांच्या सादरीकरणाप्रमाणे त्यांचे गुणग्राह्य निवड करून त्यांचा गुणोत्तर सन्मान, नाटकाचे स्पर्धेनुसार क्रमांक अशा शासकीय, निमशासकीय नियमावलीत शासनाचा सहभाग या स्पर्धेचे जतन करण्यासाठी महत्वाचे आहे. कामगार कल्याण विभागाने सुरू केलेल्या या नाट्य स्पर्धेतून सामाजिक क्रांती, राजकीय बदल घडून आणण्यात मोठे योगदान इतिहासात नोंदनीय आहे.

या स्पर्धेचे अखंड परीक्षण डॉ.प्रतिभा टेटू, ॲड. विराग जाखड व प्रा.विश्वनाथ निळे यांनी शिस्तबद्ध पद्धतीने केले.कामगार कल्याण अधिकारी चव्हाण, अजय पांडे, केंद्र संचालक सचिन खरोडे अशा अधिकारी, कर्मचाऱ्यांनी या साठी वेळ दिला.३० मार्च रोजी या स्पर्धेचे बक्षीस वितरण मी जोतिबा फुले बोलतोय सुशील बागडे यांचा एकपात्री प्रयोग सादरीकरण करून होणार आहे.सर्वांनी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले.स्पर्धेच्या नाटकातील समारोपीय नाटकात 'जेंडर अ‍ॅन्ड आयडेंटिटी' हे अंतिम नाटक होते.

**कल्पना जुगलकिशोर पुरोहित**
मो. ७८२०८९५८०९

**रेल्वे की माकडांचा अड्डा**

# सिंदी स्टेशनवर प्रशासनाचा बेफिकीर कारभार उघड

## थांबे गायब, स्वच्छतेचा बोजवारा, माकडांचा सुळसुळाट; प्रवासी संतप्त

**सिंदी (रेल्वे)/जनमाध्यम**

एकेकाळी परिसराची शान मानले जाणारे सिंदी रेल्वे स्थानक आज अक्षरशः उपेक्षेच्या गर्तेत ढकलले गेले आहे. अजब स्टेशन, गजब प्रवासी अशी ओळख असलेल्या या स्थानकावर आता प्रवाशांपेक्षा माकडांचाच अधिक वावर दिसत असल्याने प्रवासी भयभीत झाले आहेत. रेल्वे प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे येथे स्वच्छता, सुरक्षा आणि सुविधांचा पूर्ण बोजवारा उडाल्याचे चित्र आहे.

दक्षिण व मध्य रेल्वे मार्गाच्या दृष्टीने महत्त्वाचे असलेले हे स्थानक ऐतिहासिक वारसा जपणारे आहे. समृद्धी महामार्ग आणि परिसरातील वाढत्या विकासामुळे येथे प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मात्र वाढत्या गर्दीच्या तुलनेत सुविधा वाढविण्याऐवजी प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

कोरोना काळात बंद करण्यात आलेले अनेक सुपरफास्ट व पॅसेंजर गाड्यांचे थांबे अद्यापही



पूर्ववत झालेले नाहीत. स्थानिकांच्या आंदोलनानंतर काही गाड्या थांबू लागल्या, मात्र अनेक महत्त्वाच्या गाड्या अजूनही सिंदीला वळसा घालत आहेत. त्यामुळे रोजच्या प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

दरम्यान, स्थानकावर माकडांचा सुळसुळाट हा सर्वात गंभीर प्रश्न ठरला आहे. प्लॅटफॉर्मवर मुक्त वावर, प्रवाशांच्या हातातील अन्न हिसकावणे, तसेच सर्वत्र घाण करून ठेवणे या प्रकारांमुळे प्रवाशांचे हाल होत आहेत. लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी हा धोका अधिक वाढला आहे.काही वर्षांपूर्वी अनधिकृत वस्ती हटविल्यानंतर आता माकडांनीच स्थानक ताब्यात घेतल्याचे चित्र आहे. मात्र याकडे रेल्वे प्रशासनाचे साफ दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे.

सिंदी रेल्वे स्टेशन की माकडांचे स्टेशन असा प्रश्न उपस्थित करत प्रवाशांनी तातडीने स्वच्छता मोहीम, माकडांवर नियंत्रण आणि गाड्यांचे थांबे पूर्ववत करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## शेती कोसळली, तरुण भरकटले; शिक्षणाशिवाय उद्धार नाही - खा. काळे



**हिंगणघाट/जनमाध्यम**

हिंगणघाट येथे पार पडलेल्या तिरळे कुणबी समाज मेळाव्यात खा. अमर शरदराव काळे यांनी कोणतीही आडपडदा न ठेवता समाजासमोरील कठोर वास्तव मांडले. शिक्षण घेतल्याशिवाय प्रगती नाही, आणि शिक्षणाकडे दुर्लक्ष केले तर समाज अंधारात जाईल, असा स्पष्ट आणि थेट इशारा त्यांनी दिला.

या मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून वसंतराव बोंडे उपस्थित होते. समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती यावेळी दिसून आली.खा. काळे यांनी आपल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, भाऊसाहेब पंजाबराव देशमुख आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा उल्लेख केला.शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, जो पिणार तोच पुढे जाणार, हा संदेश त्यांनी पुन्हा अधोरेखित केला.आजची शेतीची अवस्था अत्यंत वाईट असल्याचे सांगताना त्यांनी थेट वास्तव मांडले.शेतकऱ्याचा मुलगा असूनही मुली लग्नासाठी नकार देतात. ही परिस्थिती समाजासाठी धोक्याची घंटा आहे, असे ते म्हणाले.शेतीत कष्ट करूनही उत्पन्न नाही, रोजगार नाही आणि भविष्य अंधारात आहे, यामुळे तरुणांमध्ये नैराश्य वाढत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.यावेळी खासदार काळे यांनी सणासुदीला डीजेच्या तालावर रात्री उशिरापर्यंत नाचणाऱ्या तरुणांवर टीका केली.आपण काय करतोय, आपले भविष्य काय आहे, याचा विचारच नाही. ही पिढी भरकटतेय, अशा शब्दांत त्यांनी नाराजी व्यक्त केली.समाजात वाढत चाललेल्या जातीय मानसिकतेवर प्रहार करत त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, बिरसा मुंडा आणि अण्णाभाऊ साठे यांचा उल्लेख केला.हे महापुरुष सर्वांचे आहेत.

# वरूडमध्ये हिंदू एकतेचा विराट जल्लोष

## सनातन संस्कृतीच्या रक्षणाचा निर्धार; कलशयात्रा, धर्मध्वजारोहणाने दुमदुमले गाव

**वर्धा/जनमाध्यम**

सनातन संस्कृती, धर्म आणि सामाजिक एकतेचा प्रभावी संदेश देणारे 'विराट हिंदू संमेलन' सेवाग्राम जवळील वरूड येथे उत्साहात पार पडले. सकल हिंदू समाजाच्या वतीने सेवाग्राम रोडवरील धन्वंतरी नगरी सार्वजनिक हनुमान मंदिर परिसरात आयोजित या भव्य सोहळ्याला हजारो भाविकांनी उपस्थिती लावत हिंदू एकतेचा ठाम निर्धार व्यक्त केला.

कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी भव्य कलशयात्रा आणि गावातून काढण्यात आलेल्या उत्साही मिरवणुकीने झाली. भगव्या ध्वजांनी सजलेले वातावरण, जयघोष आणि भक्तीभावाने ओतप्रोत भरलेली ही मिरवणूक संपूर्ण वरूड गावाला धर्ममय करून गेली. अबालवृद्धांसह महिलांचा मोठा सहभाग या संमेलनाचे वैशिष्ट्य ठरले.यानंतर धर्मध्वजारोहण, गोमाता पूजन आणि कन्या पूजनाचे विधी पार पडले. या वेळी उपस्थित मान्यवरांनी सनातन धर्माच्या रक्षणासाठी संघटित होण्याचे आवाहन केले. ग्रामगीता अभ्यासक सुरेंद्र बेलूरकर यांनी हिंदू समाजाने आपली परंपरा जपण्यासाठी



एकजूट आवश्यक असल्याचे सांगितले. तर अमरावती विभागाचे शारीरिक विभाग प्रमुख सचिन मुळे यांनी संस्कृती टिकवायची असेल तर संघटन हाच मार्ग आहे, असे प्रतिपादन केले.विदर्भ प्रांत महाविद्यालयीन कार्य प्रमुख डॉ. प्रसाद देशमुख यांनी युवकांनी स्वयंसेवक म्हणून पुढे येत समाजकार्याला वाहून घेण्याचे आवाहन केले. प्रत्येक गावात अशा संमेलनांचे आयोजन होणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.सायंकाळी भारतमाता आरती, भजन आणि संगीताने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला. उपस्थितांच्या जयघोषाने वातावरण भारावून गेले होते. त्यानंतर महाप्रसाद वितरणाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हरीश गांधी यांनी केले, तर संचालन आणि आभार प्रदर्शन प्रफुल गर्गे यांनी केले.

संजय नाईक यांनी सांघिक गीत सादर केले.

## एनपीएच्या विळख्यात शेतकरी; खाते 'होल्ड'मुळे व्यवहार ठप्प

**साहूर/जनमाध्यम**

आधी नापिकी, त्यात कर्जाचा बोजा आणि आता बँक खात्यांवर 'होल्ड'ची कारवाई अशा दुहेरी-तिहेरी संकटात साहूर परिसरातील शेतकरी सापडले आहेत. गेल्या तीन-चार वर्षांपासून थकीत पीककर्जामुळे अनेक शेतकऱ्यांची खाती एनपीए (नॉन-परफॉर्मिंग सेट) श्रेणीत गेली असून बँक ऑफ इंडिया शाखेकडून ती 'होल्ड' करण्यात आली आहेत. परिणामी शेतकऱ्यांना कोणतेही बँक व्यवहार करता येत नसल्याने ते हवालदिल झाले आहेत.एकीकडे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन लाखांपर्यंत कर्जमाफीची घोषणा केल्याने शेतकऱ्यांमध्ये आशा निर्माण झाली होती. मात्र प्रत्यक्षात बँक खात्यांवर निर्बंध आल्याने शासनाच्या विविध योजनांचे पैसे खात्यात जमा होऊनही ते काढता किंवा दुसरीकडे वर्ग करता येत नसल्याने शेतकरी आर्थिक कोंडीत सापडले आहेत.साहूर व परिसरातील सुमारे १७ गावांतील नागरिकांचे व्यवहार प्रामुख्याने बँक ऑफ इंडिया शाखेतूनच चालतात. २०१९-२० पासून सततच्या नापिकीमुळे हजारो शेतकऱ्यांचे पीककर्ज थकीत राहिले. बँकेकडून वारंवार नोटिसा देऊनही आर्थिक अडचणीमुळे कर्जफेड होऊ शकली नाही. परिणामी बँकेने संबंधित कर्जदारांची खाती 'होल्ड' केली.दरम्यान, अतिवृष्टी व फळपीक अनुदानाचे पैसे खात्यात जमा झाल्याचे संदेश येऊनही ते काढता न आल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

## संक्षिप्त

### वाळू तस्करीवर कारवाई; ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**हिंगणघाट** - विना परवाना वाळू वाहतूक करणाऱ्यांवर पोलिसांनी धडक कारवाई करत ट्रॅक्टरसह ६ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मांडगाव येथील पॉवर हाऊसजवळ ही कारवाई करण्यात आली. पोलिस गस्तीवर असताना एमएच ३२ एएस ०७९० क्रमांकाच्या ट्रॅक्टरची तपासणी केली असता त्यात वाळूसाठा आढळून आला. चालकाकडे वाहतुकीचा कोणताही परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे पोलिसांनी ट्रॅक्टर व १ ब्रास वाळू जप्त केली. या प्रकरणी अरविंद गेडाम (रा. बोथुडा) आणि गुलाब पाहुणे (रा. मांडगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला. अवैध वाळू उपसा व वाहतुकीमुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याने प्रशासनाने अशा कारवाया अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.

### शोरूममधून ग्राहकांचे ५० हजार रुपये लंपास

**वर्धा** - शहरातील शिवाजी चौक परिसरातील कपड्यांच्या शोरूममध्ये खरेदीसाठी गेलेल्या ग्राहकाचे ५० हजार रुपये अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना घडली. लक्ष्मीनगर येथील डॉ. गणेश जवादे हे शोरूममध्ये कपडे खरेदीसाठी गेले होते. कपडे ट्राय करताना त्यांनी रोख रक्कम पॅन्टमध्ये ठेवून ती हँगरला टांगली होती. दरम्यान, खरेदी पूर्ण करून काउंटरवर पैसे देण्यासाठी गेल्यावर खिशातील रक्कम गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले. या घटनेने शोरूम परिसरात एकच खळबळ उडाली. अज्ञात चोरट्याविरुद्ध वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून सीसीटीव्हीच्या आधारे तपास सुरू आहे.

**तोतया पोलिसांकडून शेतकऱ्याची फसवणूक**

**समुद्रपूर** - पोलिस असल्याचे भासवून दोन अज्ञात इसमांनी शेतकऱ्याची फसवणूक करत सोन्याच्या अंगठ्या लांबवल्याची घटना समोर आली. परडा येथील देवराव बारई हे दुचाकीने घरी जात असताना नागपूर-चंद्रपूर महामार्गावरील हिरडी फाट्याजवळ त्यांना अडविण्यात आले. संशयितांनी पोलिस असल्याचे सांगत त्यांच्या अंगावरील सोन्याबाबत विचारणा केली. काही वेळातच त्यांनी अंगठ्या कागदात बांधून देत फसवणूक केली. नंतर पुडी उघडून पाहिली असता त्यात बनावट वस्तू आढळून आल्या. या प्रकारात सुमारे ६३ हजार रुपयांचा ऐवज लंपास करण्यात आला. समुद्रपूर पोलिसांनी गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

### कौटुंबिक वादातून पत्नीवर मारहाण

**देवळी** - किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून पतीने पत्नीवर मारहाण केल्याची घटना उघडकीस आली. इंदिरानगर येथील प्रियांका पाटमासे या शेजारी महिलेसोबत बाहेर गेल्याच्या कारणावरून पती संतोष पाटमासे याने वाद घातला. वादाचे रूपांतर मारहाणीमध्ये झाले आणि संतोषने काठीने प्रियांका यांना मारहाण केली. या घटनेत त्या जखमी झाल्या. परिसरातील नागरिकांनी हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली. जखमी महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तक्रारीवरून देवळी पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा नोंद केला असून पुढील तपास सुरू आहे.

### झाडाच्या वादातून भावाकडून कुऱ्हाडीने हल्ला

**हिंगणघाट** - शेतातील बाभळीचे झाड तोडण्याच्या कारणावरून दोन भावांमध्ये वाद होऊन लहान भावाने मोठ्या भावावर कुऱ्हाडीने हल्ला केल्याची घटना घडली. सावली सास्ताबाद येथील नारायण गुळघाणे (६५) यांनी झाड तोडण्यास विरोध केला असता पांडुरंग गुळघाणे याने संतापाच्या भरात कुऱ्हाडीने वार केले. या हल्ल्यात नारायण गुळघाणे जखमी झाले असून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. हिंगणघाट पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

## ९४१ केंद्रांवर 'उल्लास'ची उजळणी

### १५९२ नवसाक्षरांची साक्षरतेकडे दमदार झेप

**वर्धा/जनमाध्यम**

ज्ञानाच्या अक्षरांनी आयुष्य उजळविण्याची ओढ आणि नव्या भविष्यासाठीचा निर्धार यांची साक्ष देणारी उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रम' अंतर्गत घेण्यात आलेली मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान मूल्यमापन चाचणी जिल्ह्यात उत्साहात पार पडली. जिल्ह्यातील ९४१ परीक्षा केंद्रांवर १५९२ नवसाक्षरांनी सहभाग घेत साक्षरतेच्या प्रवासाला ठोस गती दिली.या परीक्षेसाठी एकूण १६०१ नवसाक्षरांची नोंदणी झाली होती. त्यामध्ये ११२६ महिला व ४७५ पुरुषांचा समावेश होता. प्रत्यक्षात ११२२ महिला व ४७० पुरुष असे एकूण १५९२ परीक्षार्थी उपस्थित राहिले. विशेष म्हणजे महिलांचा उत्स्फूर्त सहभाग हा या उपक्रमाचा ठळक पैलू ठरला.जिल्ह्यासाठी १५३८ नवसाक्षरांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात हे उद्दिष्ट ओलांडत १५९२ जणांनी परीक्षा दिली. यामुळे जिल्ह्याने साक्षरतेच्या मोहिमेत उल्लेखनीय यश संपादन केल्याचे शिक्षणाधिकारी (योजना) चिलवंते यांनी सांगितले.परीक्षेच्या यशस्वी आयोज नासाठी शिक्षण विभागाने व्यापक नियोजन केले होते. जिल्हा व तालुका स्तरावर पर्यवेक्षणासाठी विशेष पथके नियुक्त करण्यात आली होती. या पथकांनी विविध परीक्षा केंद्रांना भेट देऊन व्यवस्थेचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच डायट प्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रक्रिया सुरळीत पार पडली.

दिव्यांग नवसाक्षराची जिद्द ठरली प्रेरणादायी जिल्ह्यातील एका दिव्यांग नवसाक्षराने या परीक्षेत सहभाग घेत अडचणींवर मात करत शिक्षणाची आस जपली. त्याची ही जिद्द इतरांसाठी प्रेरणादायी ठरली. खरांगणा केंद्राची पाहणील शिक्षणाधिकारी (योजना) चंद्रकांत चिलवंते यांनी स्वावलंबी विद्यालय, खरांगणा येथील परीक्षा केंद्राला भेट देत व्यवस्थेची पाहणी केली. साक्षरतेच्या या चळवळीत गाठलेले हे यश केवळ आकड्यां पुरते मर्यादित नाही, तर नव्या स्वप्नांची उभारणी, आत्मविश्वा साची वाढ आणि समाजाच्या सर्वांगीण प्रगतीकडे टाकलेले पाऊल असल्याचे चित्र या निमित्ताने स्पष्ट झाले आहे.

## पथनाट्य म्हणजे अभिनय नव्हे, तर जनजागृतीची क्रांती : डॉ. प्रभाकर पुसदकर

**वर्धा/जनमाध्यम**

नाटक, पथनाट्य आणि गाणी ही समाजपरिवर्तनाची प्रभावी साधने असून आशय जनमानसात पोहोचविण्याची ताकद त्यांच्यात आहे, असे प्रतिपादन डॉ. प्रभाकर पुसदकर यांनी केले. सेवाग्राम येथे आयोजित दोन दिवसीय निवासी पथनाट्य व गीत प्रशिक्षण कार्यशाळेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती च्या राज्य सांस्कृतिक अभिव्यक्ती विभाग व वर्धा शाखेच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा पार पडली. अभिनय किती चांगला झाला यापेक्षा, सादरीकरणातून आशय किती प्रभावीपणे पोहोचला, हे महत्त्वाचे आहे, असे सांगत त्यांनी तरुणांना



अंधश्रद्धाविरोधी चळवळीत सक्रिय होण्याचे आवाहन केले.या प्रशिक्षणात प्रा. योगेश कुदळे यांनी पथनाट्याचे विविध पैलू शिकवले. सहभागींच्या माध्यमातून मॉब लिंचिंग, अंधश्रद्धा, लैंगिक शोषण आणि भोंदू बाबांचे जाळे अशा विषयांवर प्रभावी नाट्यप्रयोग सादर करण्यात आले.तसेच प्रा. विजय नांगरे व सहकाऱ्यांनी गीतलेखनाचे प्रशिक्षण देत विवेकाचा आवाज बुलंद करूया सारखी प्रबोधनपर गीते सादर करून घेतली.या शिबिरात विदर्भ व खानदेशातील ४७ कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग होता.

सेवाग्रामच्या भूमीतून विवेकाचा आवाज पुन्हा एकदा बुलंद झाला, अशी भावना यावेळी व्यक्त झाली.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १२३

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८

**ई-मेल**-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# कॅनलच्या नावाखाली वृक्षसंहार; बोरीत निसर्गाची उघड उघड कत्तल

## शेकडो झाडे मातीखाली गाडून पुरावे नष्ट; वन व पाटबंधारे विभागाचे संशयास्पद मौन

**वर्धा/जनमाध्यम**

सेलू तालुक्यातील बोरी परिसरात सुरू असलेल्या बोर जलाशयाच्या मुख्य कॅनल दुरुस्तीच्या कामाने विकासाच्या नावाखाली सुरू असलेल्या पर्यावरण हत्येचे भीषण रूप समोर आणले आहे. नियमांची सर्रास पायमल्ली करत कंत्राटदाराकडून डेरेदार वृक्षांची निर्घृण कत्तल केली जात असून, त्यानंतर हेच वृक्ष पोकलँडच्या सहाय्याने थेट मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडून पुरावे नष्ट करण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकारामुळे परिसरात संतापाची लाट उसळली असून प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

१३४.५४ दलघमी पाणी साठवण क्षमता असलेला बोर जलाशय हा अनेक गावांचा पिण्याच्या पाण्याचा व





सिंचनाचा मुख्य आधार आहे. शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांना जीवन देणाऱ्या या प्रकल्पाच्या मुख्य २० किमी लांबीच्या कॅनलची आणि १७ किमी नंदपूर वितरिकेची दुरुस्ती करण्यासाठी तब्बल ५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथील पियुष इन्फाटेक या एजन्सीकडे हे काम सोपविण्यात आले. मात्र, या कामाच्या अंमलबजावणीत नियम, पर्यावरणीय निकष आणि कायदे यांना सरळ तिलांजली दिली जात असल्याचे चित्र आहे.स्थानिकांच्या मते, आतापर्यंत १०० हून अधिक डेरेदार वृक्षांची कत्तल करण्यात आली असून, कोणतीही परवानगी न घेता ही वृक्षतोड करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, तोडलेली झाडे कॅनलच्या आयपी साईड व सर्व्हिस रोडसाठीच्या मातीमध्ये गाडून टाकली जात आहेत.

त्यामुळे पुरावेही नष्ट केले जात आहेत. हा प्रकार उघड असतानाही वन विभाग आणि वर्धा पाटबंधारे विभागाचे अधिकारी अक्षरशः मुग गिळून बसल्याचे दिसून येत आहे.

वृक्षतोड हा सरळ गुन्हा आहे, मग कारवाई का होत नाही असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. पर्यावरणाचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या यंत्रणाच निष्क्रिय झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा बळी देण्याचा हा प्रकार थांबवला नाही, तर भविष्यात गंभीर पर्यावरणीय परिणामांना सामोरे जावे लागेल, अशी भीतीही व्यक्त होत आहे.या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित कंत्राटदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच झालेल्या वृक्षतोडीची भरपाई म्हणून मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात यावी, अशी जोरदार मागणी पुढे येत आहे. अन्यथा, कागदावर विकास आणि प्रत्यक्षात विनाश अशीच स्थिती कायम राहील, अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

# अमरावती महानगरपालिकेचा ८७६ कोटींचा अर्थसंकल्प सादर

**अमरावती:** नवीन आर्थिक वर्ष सुरू होण्याच्या ठीक एक दिवस आधी अमरावती महानगरपालिकेच्या आमसभेत अखेर वार्षिक अर्थसंकल्प सोमवारी (दि.३०) सादर करण्यात आला. स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर यांनी एकूण ८७६ कोटी २६ लाख रुपयांचा हा अर्थसंकल्प सभागृहासमोर मांडला, ज्याला मंजुरी देण्यात आली आहे.

या अर्थसंकल्पाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात ७११ कोटी ६ लाख रुपये खर्च अपेक्षित असून, तब्बल १६५ कोटी २० लाख रुपयांची अभूतपूर्व बचत दर्शवण्यात आली आहे. सभापती अविनाश मार्डीकर यांनी विविध विभागांमधील निधीच्या वाटपात वाढ केल्याचा दावा केला आहे.

बजेटवरील चर्चेदरम्यान सत्ताधारी आणि विरोधी अशा दोन्ही बाजूंच्या सदस्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. विशेषतः माजी मनपा आयुक्त आष्टीकर यांच्या कार्यकाळातील अनेक महत्त्वपूर्ण विषयांवरून सभागृहात जोरदार खडाजंगी झाली. अनेक निर्णयांच्या चौकशीसाठी समिती स्थापन करण्याची मागणीही यावेळी सदस्यांनी लावून धरली.

प्रस्तावित उत्पन्न आणि खर्चाचा तपशील देताना सभापतींनी सांगितले की, मागील शिल्लक ३ कोटी ८४ लाख आणि नवीन महसूल उत्पन्न ४३३ कोटी ८३ लाख असे एकूण ४३७ कोटी ६६ लाखांचे उत्पन्न अपेक्षित आहे. मालमत्ता कर आणि इतर महसूल उत्पन्नात २१ कोटी ७८ लाखांची वाढ झाल्याने एकूण महसूल २२ कोटी २० लाखांनी वाढल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अनेक विभागांमधील खर्चाच्या तरतुदीवरून प्रशासनावर निशाणा साधला जात असून, या अर्थसंकल्पामुळे शहरातील विकासकामांना किती गती मिळते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.


## पाहिजे

गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत. तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.

--पत्ता--

सी-१२, सातुर्णा, एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड, अमरावती

मो.नं.७०२०८७९१६८/ ८००७३४२३३५


---

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, कार्यालय सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, चांदूर बाजार**

नवीन प्रशासकीय ईमारत, तहसील कार्यालय परिसर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

जा.क्र.सनिचांबा/वि-२/अवसायन सभा/जाहीर नोटीस/ /२०२५ ने.ता.२२.०१.२०२६

**जाहीर नोटीस**

चांदूर बाजार तालुक्यातील उदय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., र.नं.२६२, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती ही संस्था सहायक निबंधक, सहकारी संस्था, चांदूर बाजार यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ अन्वये अंतिमरित्या अवसायनात घेऊन संस्थेवर अवसायकाची नियुक्ती केली आहे. सदर संस्थेचा अवसायन कालावधी १० वर्षापेक्षा अधिक असल्या कारणाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०९ अन्वये अवसायनाची कार्यवाही पूर्ण करुन संस्थेची नोंदणी रद्द करणे कमप्राप्त झाले आहे.

तरी सदर संस्थेशी कोणतेही येणी/देणी अगर हितसंबंध/दावा, बोजा असल्यास ही नोटीस प्रसिध्द केल्यापासून दिनांक १६.०४.२०२६ पर्यंत सहायक निबंधक, सहकारी संस्था, चांदूर बाजार यांचे कार्यालयास लेखी स्वरुपात पुराव्यासह सादर करावेत. वरील मुदतीत कोणताही दावा प्राप्त न झाल्यास सदर संस्थेशी कोणाचेही कोणतेही येणी/देणी अगर हितसंबंध/दावा/बोजा नाही अथवा असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे गृहित धरुन अवसायनाची पुढील कार्यवाही पूर्ण केल्या जाईल. सदर संस्थेची अंतिम सर्वसाधारण सभा दिनांक १६.०४.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता सहायक निबंधक, सहकारी संस्था, चांदूरबाजार, नवीन प्रशासकीय ईमारत तहसील कार्यालय प रिसर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती या कार्यालयात घेण्यात येईल. तरी सदर संस्थेच्या सभासदांनी नोंद घेऊन उपस्थित रहावे.

शिक्का

**(एस.पी.गवई)**
**अवसायक**
**उदय गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या., र.नं.२६२, ता.चांदूर बाजार**
**तथा सहकार अधिकारी श्रेणी-२,**
**अंतर्गत सहायक निबंधक सहकारी संस्था, चांदूर बाजार**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.२४८/२०२६ ने.ता.३०.०४.२०२६

**अर्जदार -** १. श्रीमती मंदाबाई सुधाकरराव निशाणदार
वय ६८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.विचोरी, ता.मोर्शी, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदाराचा मुलगा नामे **मंगेश सुधाकरराव निशाणदार** हा दि.**०४.१२.२०२५** रोजी **पी.डी.एम.सी.हॉस्पीटल, अमरावती, ता.** जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. वरील अर्जदाराशिवाय त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ३०.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.२४३/२०२६ ने.ता.३०.०४.२०२६

**अर्जदार -**
१. श्रीमती विमलाबाई वामनराव बेलसरे, वय ७९ वर्षे, धंदा - घरकाम
२. नितीन वामनराव बेलसरे, वय ४५ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.दुर्गानगर, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. सुचिता विनोदराव रडके, वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.जैन मंदिरामागे वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
४. मंजुषा मिलिंद मगरे, वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
रा.गणेश न गर, फ्लॅट नं.५, मांगल्य सोसायटी, बिबवेवाडी, पुणे ता.जि.पुणे
५. अंजुषा जगदीश हजारे, वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम
रा.साईनगर, आर्वी, ता.आर्वी, जि.वर्धा

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ चे पती तर अर्जदार नं.२ ते ५ यांचे वडील नामे **वामनराव बळीराम बेलसरे** यांचा दि.**०९.०८.२०२२**रोजी **मोर्शी, ता.मोर्शी** जि.अमरावती येथे मृत्यू झालेला आहे. वरील अर्जदाराशिवाय त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १७.०३.२०२६

शिक्का

आदेशानुसार,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, मोर्शी

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. १३१/२०२६ ने.ता. २४.०४.२०२६

**अर्जदार :**
१. ज्युली हरीष वाहने वय ३३ धंदा - घरकाम
२. आरंभ हरीष वाहने, वय ०८ धंदा - अज्ञान
३. सारांश हरीष वाहने, वय ०६ धंदा - अज्ञान
अर्जदार नं.२ व ३ अज्ञान अ.पा.क.आई अर्जदार क्र.१
४. सिताबाई दिगांबर वाहने, वय ६५ वर्षे, व्यवसाय - घरकाम
सर्व रा.नजरपूर, पो.चांदूर बाजार, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक हरीष दिगांबर वाहने** यांचा मृत्यू दिनांक **२०.०१.२०२६** रोजी अपघातामध्ये झालेला आहे.ते कायमचे नजरपूर, पो.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते.यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र. १३१/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२४.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र. १५२/२०२६ ने.ता. ०४.०५.२०२६

**अर्जदार :**
१. रावसाहेब सुदामराव गायकवाड, वय ३८ धंदा - मजुरी
२. निर्मला सुदामराव गायकवाड, वय ६४ धंदा - घरकाम
३. रतन सुदामराव गायकवाड, वय ३७ धंदा - मजुरी
अर्जदार नं.१ ते ३ रा.हैदतपूर वडाळा, पो.कुरळपूर्णा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती
४. नलिनी संजय शिरसाट वय ५१ वर्षे, व्यवसाय - घरकाम
५. रत्नकला नंदकिशोर भोरगडे, वय ४४ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.नंदकिशोर भोरगडे, मासोद, पो.कुरळपूर्णा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक सुदाम गुलाबराव गायकवाड** यांचा मृत्यू दिनांक **२१.०९.२००३** रोजी हैदतपूर वडाळा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र. १५२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२७.०३.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५७०/२०२६
**रमेशराव व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता.०७.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rameshrao Mahadeorao Lanjewar, Age 70 Yrs. Occu.: Labourer
2. Kavita Avinash Sonvane, Age 44 Yrs. Occu.:Housewife
R/o Pohara Bandi, Tq.Chandur Rly. Dist.Amravati.
3. Vijay Rameshrao Langewar, Aged 42 Yrs. Occu.: Labourer
4. Deepak Rameshrao Lanjewar, Aged 40 Yrs. Occu.: Labourer
Appli.No.1, 3, 4 & 5 R/o Near Nag Baba Mandir, Mahajan Pura, Dattu wadi, Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **गोदावरी रमेशराव लांजेवार** हे दिनांक 12.01.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रमेशराव व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रमेशराव व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.४८४/२०२६
**पुष्पा पोटे अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०९.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. श्रीमती पुष्पा पुरुषोत्तम पोटे, वय ३७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. कु.प्रतिक्षा पुरुषोत्तम पोटे, वय १२ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
३. कु.तन्वी पुरुषोत्तम पोटे, वय १५ वर्षे, व्यवसाय - शिक्षण
अर्जदार नं.२ व ३ करीता अ.पा.क.आई श्रीमती पुष्पा पुरुषोत्तम पोटे,
रा.अकोली रोड, पार्वती नगर नं.१, अमरावती, ता.जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत पुरुषोत्तम श्रीराम पोटे** यांचे दिनांक **२९.१२.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार श्रीमती पुष्पा पुरुषोत्तम पोटे अधिक दोन** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती पुष्पा पुरुषोत्तम पोटे अधिक दोन** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२७.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**मा.सह दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**

किरकोळ (R.M.J.C.) क्र.८८/२०२६ ने.ता.३०.०३.२०२६

**विजय अधिक दोन -- विरुध्द -- निरंक**

**अर्जदार :** १. विजय अंबादास रिठे,
रा.भामटे महाराज मंदिराजवळ, वल्लभ नगर, अमरावती
२. संजय अंबादास रिठे, रा.पिंपरी निपाणी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
३. अनिल अंबादास रिठे, रा.पिंपरी निपाणी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **अंबादास नारायण रिठे** यांचा मृत्यू दि.**२०.०४.२०२०** रोजी राहते घरी पिंपरी निपाणी, रा.पिंपरी निपाणी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. तसेच मयत **अंबादास नारायण रिठे** यांची पत्नी **नामे सुधाताई अंबादास रिठे** यांचा मृत्यू बऱ्याच वर्षापुर्वी झाला. मयत यांचे अर्जदार नं.१ व ३ मुले, आहे. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २५ मार्च २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

(नमुना क्र.०२)

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 1049/2025

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **ज्योती सार्वजनिक वाचनालय, शिंगणापूर, ता. दर्यापूर, जि.अमरावती एफ-२७३६१**

बाबत अर्जदार - **रुपराव शामराव मावंदे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - काही नाही**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) -** मौजा शिंगणापूर ग्रामपंचायत शिंगणापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील संस्थेच्या मालकीची व ताब्यातील प्लॉटनं.४१०, शिट नं.५, एकुण क्षेत्रफळ १८.५८ चौ.मी. (२०० चौ.फुट) जागा व या जागेवर पुर्व-पश्चिम २० फुट व उत्तर-दक्षिण १० फुट एकुण २०० फुट विटा सिमेंट व स्लॅबचे बांधकाम, याची चतुःसिमा-- पुर्वेस - सरकारी जागा, पश्चिमेस - शरद गुलाबराव खलोकार यांचे घर, उत्तरेस - सरकारी जागा, दक्षिणेस - श्री.नागेश्वर संस्थान

स्थावर मालमत्ता अंदाजे किंमत र.१,५०,०००/- (एक लाख पन्नास हजार रु.)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक १३.०२.२०२६ रोजी दिली.

शिक्का

अधीक्षक,(न्याय शाखा)
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**अमरावती**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.४६५/२०२६
**योगेश -विरुध्द- निरंक**
पुढील ता.२३.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. योगेश जयंतीलाल वरु, वय ५० वर्षे, व्यवसाय - व्यापार
रा.गोपाल निवास, बडनेरा रोड, कुथे हॉस्पीटल समोर, मुधोळकर पेठ,अमरावती
२. जितेंद्र कांतीलाल वरु, वय ५५ वर्षे, व्यवसाय - व्यापार
रा.अमरावती कॅन्सर हॉस्पीटलसमोर, शंकर नगर, अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत गोपालभाई नानाजी टांक** यांचे दिनांक **११.०१.१९६४** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार योगेश व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **योगेश व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान २२ वे सह दिवाणी न्यायाधीश(वरिष्ठ स्तर) यांच्या न्यायालयात**

**एम.जे.सी.नं. ४७१/२०२६** **ने.ता. २८.०४.२०२६**

**अर्जदार :** 1. Smt.Tara Wd/o Ramgopal Tapadia,
Age 67 Yrs. Occu.: Household work
R/o C/o Dr.Ramgopal Tapadia, 50, Ganesh Vihar, Behind Swastik Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati-444605

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :**
1. Sapana W/o Sachin Baheti,
R/o Near Khandoba Mandir, Saliwada, Sangamner Dist.Ahmadnagar
2. Shital W/o Sudip Laddha
3. Dr.Sarang S/o Ramgopal Tapadia,
2 & 3 R/o C/o Dr.Ramgopal Tapadia, 50, Ganesh Vihar, Behind Swastik Nagar, Amravati. Tq Dist. Amravati-444605
4. Swastika Investment Limited through its Authorised Officer
R/o 48, Jaora Compound M.Y.H.Road, Indore-452001
Having its Registered Office at : Office No.104, 1st Floor, Keshava Commercial Building Plot No.C-5, E-Block, Bandra Kurla Complex, Oppo.GST Bhavan, Bandra (East), Mumbai-400051 (M.H.)

ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय वारसा कायदा १९२५ च्या कलम ३७२ अन्वये या न्यायालयात उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की, मयत **रामगोपाल धनराजजी तापडीया** यांचे निधन दिनां ११.०३.२०२५ रोजी नागपूर येथे झाले असून वरील अर्जदार हे त्यांचे कायदेशीर उत्तराधिकारी आहेत व ईतर कोणीही मयतास उत्तराधिकारी नाही. सबब उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे.

त्याअर्थी सदर अर्जास कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत वि.दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), अमरावती या न्यायालयामध्ये हजर होवून आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे गृहित धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

आज **दिनांक २४.०३.२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४९४/२०२६
**निर्मला अधिक दोन -विरुध्द- निरंक**
पुढील ता.१०.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Nirmala Ramrao Karale, Age 70 Yrs. Occu.: Housewife
R/o New Friends Colony, Amravati. Tq. Dist. Amravati.
2. Smt.Aparna Sachin Karale, Age 47 Yrs. Occu.:Household
3. Aniruddha Sachin Karale, Aged 17 Yrs. Occu.: Education
(Being Minor through Natural Guaredian Mother)
Appli.2 & 3 R/o Flat No.202, Govind Sankul Apartment, Near Shri Complex, Narendra Nagar, Vivekanand Nagar, Nagpur, Tq.Dist.Nagpur

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Sachin Ramrao Karale हे दिनांक 03.01.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Nirmala Ramrao Karale + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Nirmala Ramrao Karale + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.४४७/२०२६
**रफिका अधिक दोन -विरुध्द- निरंक**
पुढील ता.०७.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Rafika Bano Shaikh Mateen, Age 71 Yrs. Occu.: Household
R/o Patwa Chowk, Itwara Bazar Masanganj, Amravati.
2. Shaikh Mobin Shaikh Mateen Age 41 Yrs. Occu.: Labour
R/o Patwa Chowk, Itwara Bazar Masanganj, Amravati.
3. Sheikh Moin Sheikh Matin Mansuri, Aged 33 Yrs. Occu.: Labour
R/o Near Shakti Collection, Masanganj, Patwa Chowk, Amt.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Shaikh Mateen Shaikh Pyare हे दिनांक 09.05.2020 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Rafika Bano Shaikh Mateen + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Rafika Bano Shaikh Mateen + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५२४/२०२६
**तारा अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.२०.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Tara Ramesh Dudhe, Age 73 Yrs. Occu.: Housewife
2. Seema Ravindra Ambadkar, Age 42 Yrs. Occu.: Housewife
3. Amol Ramesh Dudhe, Age --- Yrs. Occu.: Labour
4. Shrikant Ramesh Dudhe, Age 38 Yrs. Occu.: Labour
All R/o Anjangaon Bari, Tq.Dist.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ramesh Sitaram Dudhe हे दिनांक 09.10.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Tara Ramesh Dudhe + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Tara Ramesh Dudhe + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.२२७२/२०२५
**अमता -वि- निरंक**
पुढील ता.०४.१२.२०२५

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. अमता संदीप पांडे, वय ४० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.सीओ संदीप पांडे, ओल्ड बायपास रोड, आयुर्वेद कॉलेज जवळ, प्रभा कॉलनी, जलाराम नगर, रुक्मिणी नगर, अमरावती
२. भूषण अरुणराव रावळे, वय ४३ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी
अर्चना अरुणराव रावळे, वय ६८ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.ए-००२, योगमुद्रा सीएचएस, पराग नगर, न्यू लिंक रोड आनंद नगर, मुंबई

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत अरुण विठ्ठलराव रावळे** यांचे दिनांक **०४.०३.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार अमता संदीप पांडे व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अमता संदीप पांडे व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०७.१०.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.५४१/२०२६
**कविता कोराम -विरुध्द- निरंक**
पुढील ता.२०.०४.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Smt.Kavita Ganesh Koram
Age 49 Yrs. Occu.: Housewife
R/o Sai Nagar, Amravati , Tq.Dist.Amravati

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ganesh Devrao Koram हे दिनांक 11.05.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Smt.Kavita Ganesh Koram यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Smt.Kavita Ganesh Koram वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६४१/२०२६
**मुदसार व ईतर -विरुध्द- निरंक**
पुढील ता.१०.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Mudassar Nazar Ahmad Mumtaz, Age 46 Yrs. Occu.: Tailor
R/o Old Bypass Near Masjid Chaprasipura Camp Rd.Amravati
2. Maher Daraksha Aqeel Ahemad, Age 45 Yrs. Occu.:Household
R/o Jogdi Fail Shegaon, Dist. Buldhana

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मुमताज अहम शेख जमाल** हे दिनांक 01.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **मुदसार व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **मुदसार व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२७.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २०२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# सीताबाई संगई हायस्कूलचा विद्यार्थी इंडियन टॅलेंट ऑलिंपियाड मध्ये राज्यात ७व्या क्रमांकावर

**अमरावती/का.प्र.**
सीताबाई संगई हायस्कूलमधील विद्यार्थ्यांनी ITO – Indian Talent Olympiad (२०२५-२६ Final Round) मधील Logical Reasoning या विषयात शाळेतील ४२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला असून उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.

या स्पर्धेत इयत्ता ९ वीतील देवांश येवले याने State Rank ७ मिळवत ७०० चे रोख पारितोषिक प्राप्त करून राज्यस्तरीय यश संपादन केले व तो शाळेचा State Topper ठरला आहे. तसेच विविध



वर्गातील विद्यार्थ्यांनीही उत्कृष्ट कामगिरी करत Class Toppers म्हणून स्थान मिळवले आहे. इयत्ता ५ वीमध्ये देवांश प्रदीप राजस, ६ वीमध्ये श्रीरंग सरोदे, ८ वी मध्ये सोहम बेराड, तर ९ वी मध्ये देवांश येवले, पियुष डाहाळे, मिहीर टांक यांनी यश संपादन केले. इयत्ता १० वीमध्ये अर्णव मोपारी, विराज वानखडे व परिक्षित बोर्डीकर यांनी उल्लेखनीय यश मिळवले. इयत्ता ८ वी तील सोहम बेराड याने Excellence Award मिळवत विशेष कामगिरीची नोंद केली आहे. या यशाबद्दल सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. उल्हास संगई, उपाध्यक्ष भरत संगई व विवेक संगई, सचिव प्रसाद संगई, सहसचिव अजय संगई व प्रसन्न संगई, तसेच सर्व संचालक मंडळाने विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेचे प्राचार्य राजेश डोणगावकर, उपमुख्याध्यापक राजेश वैद्य, पर्यवेक्षक निलेश डाहाळे, शिक्षकवृंद व कर्मचारी वर्ग यांनीही विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे आणि मार्गदर्शक शिक्षक नितीन गणोरकर, गीतांजली मेमनकर व कार्तिकी संगई यांचे अभिनंदन केले. या यशाबद्दल सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत. शाळेसाठी हा अभिमानास्पद क्षण असून भविष्यातही असेच यश मिळवत राहावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# अती तापमानामुळे संत्रा उत्पादक शेतकरी हवालदिल


**कुऱ्हा/वार्ताहर**
यावर्षी आंबीया संत्रा बार मोठ्या प्रमाणात फुटल्यामुळे शेतकरी आनंदात होते. परंतू दिवसेंदिवस येणाऱ्या वातावरणामुळे आणि वाढत्या उन्हाच्या तापमानामुळे आलेल्या संत्रा बार तर खाली आला. त्यातून काही वाचले त्यात चन्या एवढे तर काही बोरा ऐवढे संत्रा सुध्दा अति उन्हयाच्या तापमानाने वाळण्यात सुरुवात होवून अखेर शेतकऱ्यांनी लागवड इतक्या प्रमाणात केली की, यावर्षी संत्राचे उत्पन्न चांगले होईल. अशा आशेने खर्च केला.

परंतू यावर्षीचे वातावरण भयानक दिसून येत आहे. संत्रा झाडावर जे काही संत्रा फळं आहे ते राहील किंवा नाही अशी पारीरशती दिसून येत आहे.गेल्या चार पाच वर्षा पासून संत्रा उत्पादक शेतकऱ्यावर कधी निसर्गाची तर भावात अशा अनेक अडचणीचा सामना करून शेतकऱ्यांवर कर्जाचा बोजा वाढत जातो त्यामुळे दरवर्षी संत्र्याचे उत्पादन घेण्याकरिता किती खर्च करावा लागतो. आणि त्यापासून उत्पन्न किती मिळते.

याची बरीच तफावत राहते. त्यामुळे शेतकरी हवालादिल झाला आहे की त्यालाच माहीती आहे. तेव्हा यावर्षी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना जो वाढत्या तापमानाचा फटका बसणार असून त्याची शासनाने आतापासून संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या शेता मध्ये जाऊन संबंधीत विभागाला पाठवून याचा सर्व्हे करावा अशी मागणी तिवसा तालुक्यातील सर्वच संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची आहे.

## संक्षिप्त

### संत गुणवंत बाबा पुण्यतिथी महोत्सवानिमित्त महापुराण




**लेहेगाव**-दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नजीकच्या धामणगाव (काटपुर) येथे संत गुणवंत महाराज यांचे पुण्यतिथी महोत्सवानिमित्त श्रीमद् भागवत महापुरा ज्ञान यज्ञाचे आयोजन केले आहे. सात दिवस चाललेल्या या सप्ताहात भागवत वाचन ह. भ. प. हेमंत महाराज फाटे चांदस वाठोडा) याचे मधुर वाणीतून महापुराण ज्ञान यज्ञाचे वाचन करण्यात आले.२५ मार्च पासून सुरू झालेल्या या भागवत कार्यक्रमात दररोज हरिपाठ प्रार्थना, प्रवचने, ग्रामगीता वाचन, भजने, कीर्तने, आधी सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.३१ मार्च रोजी गावातून पालखी व ग्रंथाची भव्य मिरवणूक निघणार आहे. १ एप्रिल रोजी सकाळी ह.भ.प. हेमंत महाराज फाटे यांच्याच वाणीतून गोपाळ काल्याचे किर्तन होणार असून दुपारी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला आहे तरी सदभक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याची आवाहन केले आहे.

### तळेगाव दाभेरी येथे हनुमान जयंती निमित्त श्रीराम कथा



**लेहेगाव**-दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नजीकच्या तळेगाव दाभेरी येथे हनुमान जयंती निमित्त राम कथा व युग ग्रंथ संगीत ग्रामगीता तत्वज्ञान चिंतन सप्ताहाचे आयोजन केले असून या सप्ताहात ग्रंथाचे वाचन ग्रामगीताचार्य ह.भ.प. अनिल महाराज डवले रा. साखरवाडी ता.अंजनगाव सुर्जी यांचे मधुर वाणीतून वाचले जाणार आहे. राम नवमी पासून चालू झालेल्या या सप्ताहात राष्ट्रसंताचे आणि वैराग्यमूर्ती गाडगे बाबाचे अंधश्रद्धा विरोधी विचार समाजा पर्यंत पोहोचले पाहिजे हा उद्देश ठेवून ग्राम गीतेवर आधारित प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. सोबतच सप्ताहात दररोज ग्रामसफाई, हरिपाठ, कीर्तन, राम चरित्र मानस कथा, भजन संध्या,संगीत संध्या,यासारखे कार्यक्रमाचे आयोजन केले.असून १ एप्रिल रोजी भव्य अशी श्रीची शोभायात्रा निघणार आहे. २एप्रिल रोजी हनुमान जयंतीचे परावर काल्याचे किर्तन ह.भ.प. अनिल महाराज डवले यांचे मधुर वाणीतून होणार असून त्याच दिवशी काल्याचे किर्तना नंतर भव्य असा महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला आहे.तरी या संधीचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा अशी आवाहन उत्सव समितीने केले आहे.



### एस.आय.आर.अंतर्गत मतदार मॅपिंगमध्ये उत्कृष्टांचा गौरव

**अंजनगाव बारी**-एस.आय.आर.अंतर्गत मतदार मॅपिंग उपक्रमात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार अप्पर जिल्हाधिकारी गोविंद दाणेज व उपजिल्हाधिकारी (महसूल) विवेक जाधव यांच्या हस्ते करण्यात आला.९० टक्क्यांपेक्षा अधिक मतदार मॅपिंग पूर्ण करणाऱ्या सुपरवायझर व मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा विशेष गौरव करण्यात आला. सुपरवायझर म्हणून वसीम फरहत, अविनाश देशमुख व जयश्री गजभिये (पर्यवेक्षीय अधिकारी) यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून वृषाली मोहोड (९९.७८%), सारिका काळे (९१.९०%), प्रज्ञा मोकळे (९२.००%), अभय मुळे (९१.००%), शिवलाल बोरकर (९७.००%), वैशाली मोरे (९८.०४%) आणि हर्षल गिरकुंजे (९५.४२%) यांचा गौरव करण्यात आला.मान्यवरांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या परिश्रमाचे कौतुक करत त्यांच्या पुढील कार्याला शुभेच्छा दिल्या.

# जिल्हा परिषद समोर शिशिर साबळे व पुजा मेहरे यांचे साखळी उपोषण सुरु

**अमरावती/क्रा.प्र.**
जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत पेसा क्षेत्रातील सर्व कंत्राटी शिक्षक बेमुदत कामबंद व साखळी धरणे आंदोलन ३०मार्च पासुन अमरावती जिल्हा परिषद कार्यालय समोर सुरु झाले.आंदोलनाच्या पहील्या दिवशी शिशिर साबळे व पुजा मेहरे यांचे साखळी उपोषण सुरु झाले.

जिल्हा परिषद अमरावती पेसा क्षेत्रांतर्गत कार्यरत कंत्राटी शिक्षक अमरावती जिल्ह्यात अतिदुर्गम, आणि अति मागास क्षेत्रात शिक्षकांची पदभरती झालेली नसल्याने शिक्षकांच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त होत्या. त्यामुळे जिल्हा परिषद अमरावती मार्फत महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार शैक्षणिक सत्र २०२४-२५ मध्ये TET /CTET ke TAIT-२०२२ उत्तीर्ण पात्रता धारक उमेदवारांची पेसा क्षेत्राकरिता कंत्राटी शिक्षक म्हणून भरती केलेली होती.त्यानुसार मागील दोन वर्षापासून जिल्हा परिषद अमरावती द्वारा आदेशित पात्रता धारक कंत्राटी शिक्षक अति संवेदनशील, आणि अति मागास क्षेत्रात तुटपुंज्या मानधनावर आणि सहा सहा महिने मानधन न मिळाल्याने आर्थिक समस्येला सामोरे जाऊन सुद्धा हुजर - तक्रार न करता प्रामाणिकपणे कर्तव्य बजावत आहोत. सर्वोच्च न्यायालयाच्या पेसा क्षेत्रातील ५० टक्के खुल्या प्रवर्गातून भरतीच्या मान्यते नुसार जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत शिक्षक पदांच्या जागा पोर्टल वर न देता, कार्यरत TET/CIET ke TAIT २०२२ पात्रता धारक



कंत्राटी शिक्षकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून कायम रुजू करून सेवेत सामावून घ्यावे. व सर्व कंत्राटी शिक्षकांना शिक्षण सेवक पदावर न्याय मिळवून द्यावा.या प्रमुख मागण्या करिता दिनांक ३०मार्च २०२६ सोमवार पासून जिल्हा परिषद अमरावती समोर सर्व कंत्राटी शिक्षक बेमुदत कामबंद व धरणे आंदोलन सुरु केले आहे. या आदोलनात किशोर प्रकाश वानखडे,राहुल अंबादास सोनार, विशाल किशोर हगवणे, अविनाश सुरेश उदापुरे,मंगेश विश्वनाथ आठवले, सागर पद्माकर सूर्यवंशी, शितल गोपाल खडसे, दिपक गजानन मेमनकर,प्राजक्ता गणेश दातीर, अक्षय माणिक गजभिये, सचिन प्रकाश भालकर, संदीप हरिदास देशकर,राहुल दिलीपराव ठाकरे, प्रियंका दामोदर चोपडे,संजीवनी विठ्ठलराव कुकडे,संजीवनी ओंकारराव गायकवाड, निखिल महादेव चव्हाण,ज्योती महादेव मेश्राम, प्रफुल्ल साहेबराव पवार, पुजा सिंडाम यांचा सहभाग आहे.

# प्रा.शुभांगी क्षितिज अभ्यंकर यांना डॉक्टरेट पदवी

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**
प्रा. शुभांगी क्षितिज अभ्यंकर यांच्या शिरपेचात मानाचा प्रथम तुरा रोवला गेला आहे. अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठाकडून त्यांना डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (समाजशास्त्र) या पदवीने सन्मानित करण्यात येणार आहे.

पश्चिम विदर्भातील उच्चमाध्यमिक विद्यार्थिनींच्या सामाजिक आर्थिक परिस्थितीचा -त्यांच्या शालेय प्रदर्शनावर होणारा परिणाम एक समाजशास्त्रीय विश्लेषण हा त्यांचा प्रबंध होता. डॉ.मंगला डी.तांबेकर याचे मार्गदर्शन लाभले.



आता शुभांगी क्षितिज अभ्यंकर यांच्या नावामागे आता डॉक्टर ही पदवी अधिकृतपणे जोडली जाणार आहे. सध्या शुभांगी क्षितिज अभ्यंकर ह्या राहुल व्यायाम प्रसारक मंडळ अमरावतीच्या संचलिका आहेत. त्यांच्या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष मधुकरर अभ्यंकर, कांता अभ्यंकर, प्राचार्य डॉ. राजेश चंदनपाठ, राजेंद्र ढेपे, पद्मा ढेपे, दिलीप तांबेकर, डॉ मंगला तांबेकर, क्षितिज अभ्यंकर, अ‍ॅड शुभांगी थेटे, सुषमा कोंडे, प्राचार्य गजानन वानखडे, मंगला वंजारी, सीमा ठाकरे, प्रशांत ढेपे, धनश्री ढेपे, प्रा.सुधाकर गावंडे, सतीश पुंडकर, अरुण वानखडे, दिनेश मोहोड, अविनाश पवार, उद्धव कोकाटे, दीपक कळसकर, दिनेश थोरात, केतन खिरकर, अमित वानखडे, गोपाल अभ्यंकर, सागरसिंग चव्हाण, मुकुंद चौधरी, प्रमोद अभ्यंकर, रमेश कौतिककर, अनंता मोहोळ, गौरखनाथ पर्वतकर, जीवन फसाटे, विकास फसाटे,आकाश वंजारी समर्थ अभ्यंकर, विहान अभ्यंकर यांनी शुभेच्छा दिल्या.

# आज मालमत्ता कर न भरल्यास कारवाई अटळ

**अमरावती/क्रा.प्र.**
अमरावती महानगरपालिकेकडून मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी जाहीर करण्यात आलेल्या शास्ती/दंड माफी योजनेचा अंतिम टप्पा आला असून नागरिकांनी ३१ मार्च पूर्वी कर भरून सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. निर्धारित मुदतीत कर न भरल्यास कठोर वसुली कारवाई करण्यात येणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या विशेष योजनेअंतर्गत थकबाकीसह मालमत्ता कराची एकरकमी भरपाई करणाऱ्यांना शास्तीच्या रकमेवर २५ टक्के सूट देण्यात येणार आहे. तसेच ऑनलाइन माध्यमातून कर भरल्यास अतिरिक्त ३ टक्के सवलत मिळणार आहे. नागरिकांना घरबसल्या डिजिटल पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असलेल्या मालमत्ता करातून शहरातील रस्ते, स्वच्छता, पाणीपुरवठा, दिवाबत्ती, ओरोग्य सुविधा व इतर विकासकामे राबविली जातात. त्यामुळे कर वसुली वाढविण्यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम सुरू केली आहे.

**आयुक्तांचे आवाहन**

शहर विकासासाठी नागरिकांचा सहभाग आवश्यक असून सवलतीच्या कालावधीत सर्वांनी मालमत्ता कर भरावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्तांनी केले आहे. Paytm, Google Pay, BHIM, PhonePe, QR कोड तसेच डेबिट व क्रेडिट कार्डद्वारे ऑनलाइन कर भरण्याची सुविधा उपलब्ध असून अधिक माहितीसाठी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशासनाने इशारा दिला आहे की, थकबाकीदार मालमत्तांवर जप्ती, सिलिंग, दंडात्मक कारवाई तसेच कायदेशीर प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी शेवटच्या क्षणाची वाट न पाहता त्वरित कर भरणा करावा.

# वाढत्या तापमानाचा संत्रा पट्ट्यावर घालाः पिके धोक्यात

**अंजनगाव/वार्ताहर**
परिसरात गेल्या काही दिवसांपासून तापमानात झपाट्याने वाढ होत असून दुपारची सरासरी उष्णता ३८ ते ४० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचली आहे. या प्रखर उष्णतेचा सर्वाधिक फटका स्थानिक संत्रा बागांना बसला आहे. संत्रा पिकासाठी दिवसा २५–३२ अंश आणि रात्री १५–२० अंश हे आदर्श तापमान मानले जाते. मात्र सध्याच्या हवामानामुळे बागांची तंदुरुस्ती ढासळत असून उत्पादनावर गंभीर परिणाम दिसत आहेत.

उष्णतेच्या झळांनी बागांमध्ये फुलगळ, पानगळ आणि कच्च्या फळांच्या गळतील वाढ नोंदवली जात आहे. जमिनीतील ओलावा वेगाने नष्ट होत असल्याने झाडांच्या वाढीवर थेट परिणाम



होत आहे.अनेक शेतकऱ्यांकडे ड्रिप सिंचन किंवा भरपूर पाण्याचा पुरवठा नसल्याने झाडे कोमेजण्याची शक्यता वाढली आहे. कृषी तज्ज्ञांनी वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर ड्रिप सिंचनाद्वारे कमी मात्रेत पण वारंवार पाणी देणे, झाडांच्या भोवती मल्चिंग करणे, पानांवर कॅल्शियम नायट्रेट-बोरॉन- पोटॅशियमयुक्त द्रव्ये फवारणे यांसारख्या उपाययोजना सुचवल्या आहेत. सूर्यताप कमी करण्यासाठी काओलिन क्ले किंवा पांढरा रंग फवारणी उपयुक्त ठरते. स्थानिक शेतकऱ्यांनी हवामानातील अनिश्चिततेबद्दल चिंता व्यक्त करताना, जर उष्णतेचा हा क्रम कायम राहिला तर पुढील हंगामही धोक्यात येईल, अशी भीती व्यक्त केली आहे.

> या वर्षी वाढत्या तापमानामुळे आमच्या संत्रा बागांना प्रचंड नुकसान झाले आहे.उत्पादन घटल्याने आमचे उत्पन्न दिवसेंदिवस कमी होत आहे. खर्च मात्र तसाच वाढत आहे. सरकारने आणि कृषी विभागाने तातडीने मदत, तांत्रिक मार्गदर्शन आणि आवश्यक उपाययोजना आम्हाला उपलब्ध करून द्याव्यात, ही आमची प्रमुख मागणी आहे. या तापमानात बाग टिकवणे अवघड झाले आहे; स्थिती अशीच राहिली तर पुढचा हंगामही धोक्यात जाईल.
>
> **-रामराम इंगोले,**
> अंजनगाव बारी, संत्रा उत्पादक शेतकरी

# मधुमेही मुलांसाठी मोफत इन्सुलिन

## जिल्हा रुग्णालयात दर महिन्याला मोफत उपचार अन् मार्गदर्शन

**अमरावती/का.प्र.**
महागड्या औषधांअभावी गरिबांच्या घरातल्या मधुमेही मुलांचे उपचार थांबू नयेत, यासाठी अमरावतीत एक कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात 'डायबिटीज असोसिएशन ऑफ अमरावती'च्या मदतीने गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रातील एकमेव मोफत इन्सुलिन केंद्र सुरू आहे. ज्या कुटुंबांना रोजच्या औषधांचा खर्च परवडत नाही, अशा शेकडो मुलांसाठी हा उपक्रम खऱ्या अर्थाने जीवदान देणारा ठरत आहे. आजच्या काळात लहान मुलांमध्ये 'टाईप वन' मधुमेहाचे प्रमाण वेगाने वाढत असून, यात इन्सुलिनचे इंजेक्शन घेतल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नसतो. रक्तातील साखर वाढल्यामुळे हृदय, मूत्रपिंड आणि डोळ्यांवर गंभीर परिणाम होऊ शकतात. मात्र, हे संकट ओळखून राज्यसभा सदस्य डॉ. अनिल बोंडे, माजी पालकमंत्री चंद्रकांत पाटील आणि विद्यमान पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहकार्याने २०२४ पासून जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून हे विशेष केंद्र सुरू झाले आहे. या केंद्रात केवळ मोफत इन्सुलिनच मिळत नाही, तर बाल मधुमेह तज्ज्ञ डॉ. भूषण थोरात यांच्या मार्गदर्श-नाखाली मुलांची नियमित तपासणीही केली जाते. १९९६ मध्ये राजेश पिदडी यांनी या कार्याची मुहूर्तमेढ रोवली होती. डॉ. मिलिंद जगताप आणि सध्याचे अध्यक्ष डॉ. अजय डफळे हे या मोहिमेला पुढे नेत आहेत. येथील उपचारांमुळे गायत्री पापडघाटे, वैभव पवार यांसारख्या तरुणांना सामान्य जीवन जगण्याची उमेद मिळाली आहे, तर भारत तायडे यांसारख्या अनेक पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. लवकरच जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्यात रुग्णांच्या तपासणीसाठी फिरते आरोग्य केंद्र (मोबाईल बस) सुरू होणार असल्याचेही डॉ. अनिल निल बोंडे यांनी सांगितले.

**जिद्दीने जगण्याचा नवा मार्ग**

स्वतः ५० वर्षांपासून मधुमेहाशी झुंज देणारे राजेश पिदडी या केंद्राचे मुख्य प्रेरणास्थान आहेत. वेळेवर औषधोपचार आणि पथ्य पाळल्यास मधुमेह असणारी मुलेदेखील मोठे होऊन लग्न करू शकतात आणि सामान्य माणसासारखे यशस्वी आयुष्य जगू शकतात, हे या केंद्राने सिद्ध करून दाखवले आहे.

# ग्रामीण वडगाव जिरे परिसरातील रस्त्यांची दुरवस्था

## वाहतूक कोंडी वाढली; विद्यार्थ्यांसह नागरिक त्रस्त

**अंजनगाव बारी**
अमरावती तालुक्यांतील अंजनगाव बारी सर्कलमधील वडगाव जिरे-मालखेड रेल्वे परिसर तसेच वाकपूर–दादापूर या महत्त्वाच्या ग्रामीण संपर्क मार्गांची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत चालली आहे. रस्त्यांवरील अडथळ्यांमुळे सर्वसामान्य नागरिक, कामगार, विद्यार्थी, शेतकरी आणि आरोग्य कर्मचारी यांना दररोज मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

वडगाव जिरे–मालखेड रेल्वे मार्गावरील खडीकरणाचे काम पूर्ण झाले असले तरी साधारण १ किमी डांबरीकरण अद्याप रखडले आहे. धरमखेडे



शेतापासून नाल्यापर्यंतचा रस्ता खड्डेमय आणि अरुंद असून या मार्गावरून हजारो नागरिक दररोज ये-जा करतात.

स्थानिकांच्या मते, आसपासच्या चार ते पाच गावांतील वाड्यांमधून येणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठी असल्याने रस्त्यावरील दुरवस्था पाहून वाहतूक कोंडी निर्माण होते. काही ठिकाणी अतिक्रमण, तर काही ठिकाणी खोल खड्ड्यांमुळे वाहनचालकांना संथ गतीनेच प्रवास करावा लागत आहे. वाकपूर–दादापूर मार्गाची अवस्था अत्यंत गंभीर साधारण २.५ किलोमीटरच्या वाकपूर–दादापूर जोडमार्गावर परिस्थिती अधिकच गंभीर आहे. यामुळे शालेय विद्यार्थी वेळेवर शाळेत पोहोचू शकत नाहीत.शेतमाल वाहतुकीसाठी जाणाऱ्या वाहनांना अतिरिक्त खर्च व वेळ लागतो. ग्रामस्थ व कामगार वर्गाचे दैनंदिन हाल वाढले आहेत. स्थानिकांनी या मार्गाला 'प्रवाशांसाठी सर्वात त्रासदायक रस्ता' अशी उपमा दिली आहे.

### ग्रामस्थांची बससेवेची मागणी

वडगाव जिरे व आसपासच्या ग्रामीण परिसराला जोडणाऱ्या मार्गांवरच्या मर्यादित वाहतूक साधनांमुळे नागरिकांची अडचण वाढत चालली आहे. विशेषतः विद्यार्थी, कामगार, शेतकरी आणि महिलांना दररोजच्या प्रवासासाठी बससेवेचा मोठा अभाव जाणवत असून, ग्रामस्थांकडून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे नवीन बससेवेची मागणी होत आहे..

# मेळघाटातील तेंदू वृक्ष नामशेष होण्याच्या मार्गावर

**धारणी/वार्ताहर**
एकेकाळी तेंदू पत्त्याच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेला मेळघाट परिसर आज गंभीर संकटाचा सामना करत आहे. लाखो रुपयांची उलाढाल करणारा तेंदूपत्ता व्यवसाय आणि आरोग्यदायी टेंभू फळांसाठी ओळखला जाणारा हा प्रदेश आता हळूहळू तेंदू वृक्षांच्या अभावाकडे झुकत आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर झालेल्या वृक्षतोडीमुळे तेंदू झाडांची संख्या झपाट्याने घटली आहे. विशेषतः पान संकलनाच्या हव्यासापायी अनेक मोठी, परिपक्व झाडे तोडण्यात आली. परिणामी, जंगलात आता केवळ लहान झुडपांच्या स्वरूपातील तेंदूची रोपेच शिल्लक राहिलेली दिसतात. तज्ञांच्या मते, मोठ्या झाडांच्या अभावामुळे तेंदूचे नैसर्गिक पुनरुत्पादनही कमी झाले आहे. याचा थेट परिणाम स्थानिक आदिवासींच्या उत्पन्नावर होत असून, टेंभ्रूच्या पौष्टिक फळांची उपलब्धताही घटली आहे. जंगलातील जैवविविधतेवरही याचे गंभीर परिणाम होत असल्याचे संकेत आहेत.परिस्थितीची गंभीरता लक्षात घेता पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक नागरिकांकडून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. तेंदू वृक्षांचे संरक्षण, मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण आणि पान संकलनावर नियंत्रण यांसारख्या उपायांची गरज व्यक्त केली जात आहे. जर वेळेत योग्य पावले उचलली नाहीत, तर मेळघाटमधील तेंदू वृक्ष इतिहासजमा होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# त्या पाच आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी;

**भानखेडा रोडवरील अत्याचार प्रकरण**



**अमरावती/प्रतिनिधी:** चांदूर रेल्वे रोडवरील भानखेडा जंगल परिसरात घडलेल्या मारहाण, लूट आणि सामूहिक अत्याचार प्रकरणात अटक करण्यात आलेल्या पाचही आरोपींना सोमवारी (दि.३०) कडेकोट पोलीस बंदोबस्तात स्थानिक न्यायालयात हजर करण्यात आले. सुनावणीनंतर न्यायालयाने सर्व आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळ च्या सुमारास भानखेडा रस्त्याने जात असलेल्या तरुण आणि तरुणीला पाच जणांच्या टोळक्याने अडवून मारहाण केली तसेच त्यांच्याकडील वस्तूंची लूट केली. याच दरम्यान एका युवतीवर अत्याचार झाल्याची गंभीर घटना समोर आली. घटनेनंतर फ्रेजरपुरा पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेच्या पथकाने तातडीने कारवाई करत पाचही आरोपींना अटक केली. तपास यंत्रणांनी आरोपींना न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने पुढील तपासासाठी तीन दिवसांची (२ एप्रिल) पोलीस कोठडी मंजूर केली. न्यायालय परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आरोपींची ओळख गुप्त ठेवत त्यांचे चेहरे माध्यमांपासून झाकण्यात आले. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.


# पोलिसांच्या भीतीने कॅफे चालकाने काढला पळ

## तरुण तरुणीला आत कोंडून लावले कुलूप




**अमरावती/प्रतिनिधी:** गेल्या तीन चार दिवसांपासून भरोसा सेल आणि दामिनी पथकाच्या माध्यमातून शहरातील कॅफेमध्ये चालणाऱ्या असभ्य वर्तनावर कडक कारवाई करण्यात येत आहे. या कारवाईमुळे कॅफे चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अशीच एक धक्कादायक घटना आज सोमवार ३० मार्च रोजी दुपारी गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत समोर आली, जिथे पोलिसांना पाहून एक कॅफे चालक चक्क ग्राहकांना आत कोंडून पळाला. मिळालेल्या माहितीनुसार, भरोसा सेल आणि दामिनी पथकाद्वारे सोमवारी दुपारी गाडगे नगर पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग केली जात होती. पोलिसांची गाडी पाहताच फ्रोजन डिलाईट कॅफेच्या संचालकाची घाबरगुंडी उडाली. कारवाई टाळण्यासाठी त्याने तातडीने कॅफेला बाहेरून कुलूप लावले आणि तो तिथून पसार झाला. मात्र, हे करताना आपल्या कॅफेमध्ये एक तरुण आणि तरुणी बसलेले आहेत, याचे भान तो विसरला. अचानक कॅफे बंद झाल्याने आणि बाहेरून कुलूप लागल्याने आत असलेले तरुण-तरुणी प्रचंड घाबरले. त्यांनी मदतीसाठी आरडाओरडा करण्यास सुरुवात केली. त्यांचा आवाज ऐकून पेट्रोलिंगवर असलेल्या पोलीस निरीक्षक दीप्ती ब्राह्मणे तात्काळ कॅफेजवळ पोहोचल्या. त्यांनी कर्मचाऱ्यांच्या मदतीने कॅफेचे कुलूप उघडून त्या तरुण-तरुणीला सुखरूप बाहेर काढले. भरदिवसा घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. स्वतःचा बचाव करण्यासाठी ग्राहकांचा जीव धोक्यात घालणाऱ्या या कॅफे संचालकावर आता पोलीस काय कारवाई करतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# अमरावतीत अवकाळी पावसाची सर; उकाड्याला मिळाला तात्पुरता ब्रेक



**अमरावती/प्रतिनिधी:** शहरात सोमवारी सायंकाळी साधारण ७ वाजण्याच्या सुमारास अचानक हवामानात बदल होऊन विजांच्या कडकडाटासह हलक्या पावसाने हजेरी लावली. काही मिनिटांतच सुरू झालेल्या या रिमझिम सरींमुळे तापलेल्या वातावरणाला मोठा दिलासा मिळाला.

दिवसभर प्रचंड उकाडा आणि वाढलेले तापमान यामुळे नागरिक हैराण झाले होते. मात्र सायंकाळ होताच आकाशात ढगांची गर्दी झाली आणि विजांसह पावसाच्या हलक्या सरी कोसळू लागल्या. या अचानक झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आणि नागरिकांना उष्णतेपासून काही प्रमाणात दिलासा मिळाला.

पावसामुळे शहरातील काही रस्त्यांवर पाणी साचले नसले तरी वाहनचालकांना काही वेळासाठी सावधगिरी बाळगावी लागली. त्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला. तरीही कोणतीही मोठी अडचण किंवा अपघाताची नोंद झालेली नाही.हवामान विभागाने आधीच पावसाची☞(पान २ वर)

# मनपा अधिकाऱ्यांनी केले सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे उल्लंघन

## पत्रकार परिषदेत माजी नगरसेवक राठोड यांचा आरोप



**अमरावती/प्रतिनिधी:** नवाथे प्लॉट येथील मल्टिप्लेक्स मध्ये कोट्यावधीचा घोटाळा झालेला आहे. या भ्रष्टाचारा बाबत सर्वोच्च न्यायालयमध्ये जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. याचिकेची दखल घेऊन सर्वोच्च न्यायालयाने नवाथे मल्टिप्लेक्स प्रकरणामध्ये जैसे थे स्थिती ठेवण्याचे आदेश दिले आहे , परंतु सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन मनपा अधिकाऱ्यानी काम केले असल्याचा आरोप आज सोमवार ३० मार्च रोजी पत्रकार परिषदेत माजी नगरसेवक मुन्ना राठोड यांनी केला आहे.

त्यांनी सांगितले की, मनपा प्रशासक व अधिकाऱ्यांनी मल्टिप्लेक्स बीओटीचे विकासधारक यांनी सदर आदेशाचे उल्लंघन करून करारनामाचा भंग केला आहे. तसेच विकासधारकाने मोठ्या प्रमाणात मल्टिप्लेक्स जागेवर अतिक्रमण करून टिनाचे शेड उभारण्यात आले आहे. विकास धारकाला आदेश उल्लंघन केल्याबाबत संबंधित मनपा प्रशासकावर व अधिकाऱ्यांवर कंटेम ऑफ कोर्ट बाबतची कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे उच्च न्यायालयाने महानगरपालिका शहर विकास योजनेअंतर्गत आरक्षित असलेले भूखंड नियमबाह्य पद्धतीने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व रचना अधिनियम १९६६ कलम ३७ चे उल्लंघन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे वडाली सर्वे नंबर ९४/१ भूखंडावर विकास योजना आरक्षण क्रमांक १७३ शाळेकरीता आरक्षित ठेवण्यात आले आहे. महानगरपालिका व नगरपालिकेने २ लाख ४९ हजार ४८० रू. मूल्यांकन निश्चित करून याबाबतचा निवाडाही करण्यात आलेला आहे. तत्कालीन मनपा आयुक्त चंद्रकांत गुडेवार यांनी २०१५ च्या विधान परिषद सभागृहा मध्ये तत्कालीन आमदार गोपीकिसन बाजोरीया यांची लक्षवेधी☞(पान २ वर)

# अलहिलाल कॉलनीत घरफोडी

## सुमारे ४ लाखांचा ऐवज लंपास

**अमरावती/प्रतिनिधी:** शहरातील गाडगेनगर पोलीस स्टेशन हद्दीत ३० मार्च रोजी घरफोडीची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांनी सुमारे ३ लाख ९८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची तक्रार दाखल झाली आहे. पोलिस सुत्रानुसार, फिर्यादी जमील बेग आसिफ बेग (वय ५३, रा. अलहीलाल कॉलनी, अमरावती) हे आपल्या कुटुंबासह पांढरकवडा येथे गेले होते. दरम्यान २६ मार्च दुपारी ४ वाजेपासून ते २९ मार्च दुपारी १ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या राहत्या घराचा दरवाजाचा कुलूप तोडून घरात प्रवेश केला. घरातील बेडरूममधील कपाट फोडून चोरट्यांनी रोख रक्कम १ लाख ७५ हजार रुपये तसेच सोन्या-चांदीचे दागिने लंपास केले. यात सोन्याची चेन, अंगठी, कानातील रिंग, टॉप्स, तसेच चांदीची पायल आदींचा समावेश आहे. एकूण चोरी गेलेल्या मुद्देमालाची किंमत सुमारे ३ लाख ९८ हजार ३६० रुपये इतकी आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास गाडगेनगर पोलीस करीत आहेत.

# नमो उद्यानावर नगरसेवकांची 'नौटंकी'

## रामनगर मैदानाला रामभक्तांचा विरोध का?

**चांदूर रेल्वे/प्रतिनिधी:** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त राज्यातील नगरपालिका व नगरपंचायतींना 'नमो उद्यान' उभारण्यासाठी १ कोटी रुपयांचा विशेष निधी दिला आहे. तसेच उत्कृष्ट उद्यान उभारणाऱ्या नगरपालिकांना प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी आणि तृतीय १ कोटी रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणा करण्यात आली आहे. मात्र, चांदूर रेल्वे नगरपालिकेत गेल्या तीन महिन्यांपासून सत्ताधारी व विरोधकांमध्ये उद्यानासाठी जागा निश्चित करण्यावर एकमत होत नसल्याने हा निधी परत जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ३० जूनपर्यंत उद्यान पूर्ण करून जनतेसाठी खुले करणे बंधनकारक असताना, नगरसेवकांकडून सतत बैठका घेऊनही ठोस निर्णय होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. राज्य शासनाच्या निर्देशानुसार कमी वेळेत विकसित होऊ शकणारी योग्य जागा निवडणे आवश्यक होते. त्यासाठी पत्रकार कॉलनी, संताबाई यादव नगर, रामनगर, इंदिरा नगर आदी ठिकाणांची पाहणी मुख्याधिकारी, नगराध्यक्ष, अभियंते व नगरसेवकांनी केली.सत्ताधारी गटाने रामनगर येथील जागा योग्य असल्याचे सांगितले, तर भाजप नगरसेवकांनी संताबाई यादव नगरमधील जागेवरच ठाम भूमिका घेतली.२५ मार्च रोजीच्या सभेत यावर अंतिम निर्णय अपेक्षित होता, मात्र जागा निश्चित करण्याच्या मुद्द्यावरून वाद निर्माण झाला आणि नगराध्यक्षांनी सभा तहकूब केली.या सर्व घडामोडींमुळे रामनगर येथील जागेला काही नागरिकांकडून विरोध होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.नमो उद्यान पूर्ण करण्याची अंतिम मुदत ३० जून असून आता फक्त तीन महिने शिल्लक आहेत. एवढ्या कमी कालावधीत☞(पान २ वर)

# अर्जुन नगरात कचऱ्याच्या ढिगाराला लागली आग



**अमरावती/प्रतिनिधी:**

रहाटगाव मार्गावरील हॉटेल गौरी इनच्या मागे अर्जुन नगर परिसरातील खुल्या मैदानावरील कचऱ्याच्या ढिगाऱ्याला सोमवारी अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली. अग्निशमन दलाच्या वाहनाने घटनास्थळावर पोहोचून आगीवर नियंत्रण आणले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

माहितीनुसार अर्जुन नगर परिसरात खुल्या मैदानावर कचऱ्याच्या ढिगाऱ्याला सोमवारी दुपारी अचानक आग लागली होती. याची माहिती नगरसेवक गुड्डू धर्माळे यांनी अग्निशमन विभागाला दिली. माहिती मिळताच अग्निशमन विभागाचे तीन वाहन घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आग आटोक्यात आणली. वाळलेल्या झाडाच्या फांद्या असल्यामुळे ☞(पान २ वर)

# आमदार प्रविण तायडे यांच्या पाठपुराव्याला यश

## राजुरा बृहद लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेला गती



**अचलपूर/प्रतिनिधी:** गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या राजुरा बृहद लघु पाटबंधारे प्रकल्पाच्या भूसंपादन प्रक्रियेला अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांच्या अथक प्रयत्न आणि शासन स्तरावर केलेल्या पाठपुरावामुळे गती मिळाली असून ही प्रक्रिया पूर्णत्वास नेण्यात आ.प्रवीण तायडे यांना यश आले आहे.यामुळे प्रलंबित हा मुद्दा मार्गी लागल्याने ग्रामस्थानी राज्य शासन आणि आ.प्रवीण तायडे यांचे आभार मानले आहे .

अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर मतदार संघातील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित प्रकल्पाचा मुद्दा सातत्याने रेटून धरला होता. यासंदर्भात राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे,राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या सह संबंधित अधिकाऱ्यांचा उपस्थितीत अनेक बैठका संपन्न झाल्या होत्या .आ.प्रवीण तायडे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याचे फलित आता मिळाल्याचे दिसून येत आहे. गेल्या वर्षी ५ डिसेंबर रोजी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर येथे आमदार प्रवीण तायडे व कार्यकारी संचालक यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली होती. तसेच नागपूर येथील हिवाळी अधिवेशना दरम्यानही या प्रश्नाकडे आ.प्रवीण तायडे यांनी विशेष लक्ष वेधले होते. यामुळे आता भूसंपादन प्रक्रिया गतीमान करण्यात आली आहे. याशिवाय, संबंधित अधिका-यांशी सातत्याने समन्वय साधत आमदार तायडे यांनी अमरावती जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन प्रकरणाचा पाठपुरावा केला. विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली बाधित क्षेत्रातील मोजणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून भूसंपादनासंदर्भातील प्रस्तावास अंतिम मंजुरी देण्यात आली आहे.नुकतेच ११ मार्च २०२६ रोजी या प्रकल्पासंदर्भात अंतिम निर्णय☞(पान २ वर)

# चारचाकी वाहनातून साडे सहा लाख रुपयांची रक्कम लंपास

**परतवाडा शहरात टिळक चौकातील घटना**



**अचलपूर/प्रतिनिधी:** परतवाडा शहरातील एका व्यावसायिकाच्या चारचाकी वाहनात पिशवीत ठेवलेले साडे सहा लक्ष रुपयाची रक्कम अज्ञात व्यक्तीने लंपास केल्याने खळबळ उडाली आहे.परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार सुरेश म्हस्के यांच्या नेतृत्वात पुढील तपास सुरू आहे.परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे सुद्धा तपासले जात आहे .

प्राप्त माहितीनुसार,परतवाडा शहरातील अमित चांडक स्टोन क्रशर चा व्यवसाय करतात . ३० मार्च रोजी कामगारांचे महिन्याचे वेतन व डिझेल चे पेमेंट जमा करण्यासाठी चारचाकी वाहनातून ते आले होते .त्यानंतर सिविल लाइन मधील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेत साडे सहा लाख रुपयांचा चेक जमा केला .त्यानंतर दुपारी तीन वाजताच्या त्या बँकेतून साडे सहा लाख रुपयांची रक्कम काढून कापडाच्या पिशवीसह चारचाकी कॅम्पर वाहनात ठेवली आणि टिळक चौक येथे एका किराणाच्या दुकानात खरेदी साठी गेले असता पार्क केलेल्या त्या वाहनातून अज्ञात व्यक्तीने डाव्या बाजूने खाली ठेवलेली ती साडे सहा लाख रुपये असलेली कापडी पिशवी लंपास केली .त्यांनी त्या वाहनाची तपासणी केली असता ती पिशवी गायब झाल्याचे लक्षात येताच अमित चांडक यांनी परतवाडा पोलीस स्टेशन मध्ये धाव घेतली आणि या संपूर्ण प्रकरणाची ☞(पान २ वर)

# वेगवेगळया घटनेत वृद्ध आणि तरुणाने केली आत्महत्या



**अमरावती/प्रतिनिधी:** गेल्या २४ तासात शहरात वेगवेगळ्या पोलीस ठाणे हद्दीत वृद्ध आणि तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. शेषराव भामराव भोंडे (७०,देवी नगर, वडाळी) आणि गणेश किशनराव अवधाते (३४, अकोली संरक्षण कॉलनी ) असे आत्महत्या केलेल्या दोघांचे नाव आहे. फ्रेजरपुरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या वडाळी, देवी नगर परिसरात राहणारे शेषराव भोंडे गेल्या एक वर्षापासून कॅन्सरच्या आजारमुळे वैतागले होते. त्यांच्यावर उपचार सुरू होता. तीन महिन्यापूर्वी त्यांचे ऑपरेशन ही झाले होते. यामुळे त्यांच्या शरीरात कमजोरी होती आणि आजारामुळे ते मानसिक तणावात होते. अशात त्यांनी शनिवारी उशिरा रात्री जेव्हा कुटुंबातील सर्व लोक झोपले होते, त्यावेळी त्यांनी हॉलमध्ये गळफास घेऊन आत्महत्या केली. याची माहिती शेजाऱ्यांनी पोलिसांना दिली. ☞(पान २ वर)

# भोंदू खरातसह राजकीय नेत्यांवर कारवाई करा

## विविध संघटनांचे राजकमल चौकात निदर्शने



**अमरावती/प्रतिनिधी:** लिंग पिसाट बाबा अशोक खरात व संबंधित राजकीय नेत्यांवर कठोर कार्यवाही करण्याच्या मागणीसाठी आज सोमवार ३० मार्च रोजी विविध संघटनेने राजकमल चौकात निदर्शने केली. भोंदू बाबा अशोक खरात याचे अनेक कारनामे समोर येत आहे. अनेक महिलांच्या सोबत असलेले त्याचे व्हिडिओ समोर येत आहे. अनेक राजकीय पक्षाचे नेते त्याच्याशी जुळलेले आहे. म्हणून त्यांच्यावर कठोर कार्यवाही करण्यात यावी तसेच लोकसंत गाडगेबाबा वर हिन टीका करणारे तथाकथित हभप घुलेवर गुन्हा नोंदवावा अशी मागणी करण्यात आली आहे. निदर्शने करणाऱ्यांमध्ये प्रकाश मानेकर, हरीश केदार ,सुनील घटाळे, राजेंद्र इसाने, गंगाधर नाखले, विवेक वाडेकर, सुरेश दांडगे, प्रभाकरराव अकोटकर, माधव गिरी, सुरेश दहीकर, धर्मेंद्र भांडारकर, विलास मोहाडे, मुकुंद काळे ,माया वाकोडे, सिरीन खान, कुमुदिनी वाडेकर, आशा मेश्राम, पद्मा गजभिये, चित्रा बोरकर, संगमा लोणारे, कांता चौगुले, गीता ठाकरे, सुरेश चोपकर, ऐश्वर्य देशमुख, रमेश सोनुले, हरीश चरपे, विजय चौधरी ,भारत कल्याणकर, ?ड. गणेश हलकारे, ☞(पान २ वर)

# ११ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न

## आरोपींवर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हे दाखल



**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधी:** अंजनगाव सुजी येथे एका ११ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न झाल्याची घटना घडली. आरोपीने मुलीचा हात पकडला, तिच्या शरीरावर हात फिरवला आणि तिला घाणेरडे इशारे केल्याची घटना आहे. दि.२९ ला दु.१ वाजता वेळी मुलगी घरा बाहेर खेळत असताना आरोपी पवन प्र. अनासाने (३४)रा.खानमपूर, ता. अंजनगाव सुर्जी हा दारू पिऊन त्या ठिकाणी आला. त्याने मुलीच्या शरीरावर हात फिरवत तीचा हात पकडला असता अल्पवयीन पिडीत मुलीने मदतीसाठी आरडा ओरडा केला असता शेजारील लोक बाहेर आल्यावर आरोपी त्यांना पाहून पळून गेला.☞(पान २ वर)